CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित




धाराशिव | मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १९३ | पाने १२ | किंमत रु. ८/- | RNI No. MAHMAR/2023/86468 | Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

### विचारपुष्प



कायदे, नियमांच्या आधारावर समाज परिवर्तनाची चळवळ कधीही उभी राहू शकत नाही. या उलट नैतिक मूल्यांवर आधारित चळवळ आणि कृतीमधूनच नवीन नियम, सिद्धांत आणि कायदे निर्माण होतात.

**स्व. बिंदुमाधव जोशी**
संस्थापक अध्यक्ष,
अखिल भारतीय ग्राहक पंचायत

# लेखी कारण न दिल्यास अटक बेकायदेशीर

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, पोलिस अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी



**नवी दिल्ली, २१ सप्टेंबर**

राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(१) मधील तरतुदींनुसार अटकेची कारणे लेखी स्वरूपात दिली गेली नसल्यास, एखाद्या व्यक्तीला केलेली अटक बेकायदेशीर ठरते आणि यासाठी जबाबदार पोलिस अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने एका सुनावणीवेळी दिला. अटक करताना अटकेची कारणे लेखी स्वरूपात कळवणे अनिवार्य आहे. ही माहिती संबंधित व्यक्तीला समजेल अशा भाषेत दिली जाणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

न्या. उज्ज्वल भुयान आणि न्या. अतुल एस. चांदूरकर यांच्या न्यायासनाने सोमवारी केलेल्या सुनावणीत म्हटले की, एखाद्या व्यक्तीला अटक करताना अटकेची कारणे लेखी स्वरूपात कळवणे अनिवार्य आहे. अटकेची कारणे लेखी स्वरूपात न देता एखाद्या व्यक्तीला अटक करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जावी. या निकालाची प्रत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलिस महासंचालकांना पाठवण्यात यावी.

एखाद्या आरोपीची सुरुवातीची अटक रद्द ठरवली गेली, तर पोलिस त्याच प्रकरणात त्या व्यक्तीला थेट पुन्हा अटक करू शकत नाहीत. पुन्हा अटक करण्यासाठी, पोलिसांना प्रथम सक्षम दंडाधिकाऱ्यांकडून लेखी परवानगी आणि मंजुरी घेणे आवश्यक आहे. लेखी कारण न देता उत्तरप्रदेशातील एका व्यक्तीला पोलिसांनी अटक केली होती. कारवाईविरोधात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायासन म्हणाले, अटक केलेल्या व्यक्तीला २४ तासांच्या आत न्यायालयात हजर करावेच लागेल, हा नियम अत्यंत महत्त्वाचा आणि घटनेने दिलेला अधिकार आहे. काळ बदलला, बरेच काही बदलले तरी, हा नियम कधीही न बदलणारा आहे. त्याचे काटेकोरपणे पालन झालेच पाहिजे अशी तंबी पोलिसांना दिली. (वृत्तसंस्था)

### कारवाई रद्द करण्याचा न्यायालयाला अधिकार

पोलिसांनी लेखी कारणे न देता अटक केली, तर ती अटक बेकायदेशीर मानली जाते. ही कारवाई रद्द करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तसेच पोलिसांच्या तांत्रिक त्रुटीमुळे किंवा चुकीमुळे एखादी अटक रद्द ठरवली गेली, तर केवळ ती चूक सुधारून आरोपी तुरुंगातून बाहेर पडताच त्याला पुन्हा अटक करता येणार नाही. अशा प्रकरणांत पुन्हा अटक करण्यासाठी दंडाधिकाऱ्यांची मंजुरी अनिवार्य असल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

### मूलभूत अधिकारांचे उल्लंघन मान्य नाही

नागरिकांना भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन सहन केले जाणार नाही. कोणत्याही प्रकारचे उल्लंघन किंवा पालन न केल्यास अटक केलेल्या व्यक्तीची तत्काळ सुटका केली जाईल, कारण अशी अटक घटनाबाह्य आहे. अनुच्छेद २२ अंतर्गत प्रदान केलेल्या सर्वांत महत्त्वाच्या संरक्षणाशी आपण छेडछाड करू शकत नाही, असे न्यायासनाने निर्णय देताना नमूद केले.

# संवादातून युवांना समजून घेण्याची गरज

## सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांचे प्रतिपादन | राष्ट्रीय संस्थान विद्यार्थी संवाद

**भोपाळ, २१ सप्टेंबर**

नव्या पिढीने प्रश्न विचारणे हा भारतीय परंपरेचाच एक भाग आहे. संवादातून युवांचे प्रश्न ऐकण्याची, समजून घेण्याची आणि त्यांची उत्तरे देण्याची गरज आहे. युवांना त्यांच्या बाह्य स्वरूपावरून किंवा विचारांवरून पारखण्याऐवजी, त्यांच्यातील आंतरिक संवेदना आणि सकारात्मक शक्ती समजून घेतली पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले.

राष्ट्रीय संस्थान विद्यार्थी संवादामध्ये ते बोलत होते. समाज सेवा ट्रस्टने आयोजित केलेल्या या संवादामध्ये सुमारे २५० विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी सहभाग घेतला. मंचावर मध्य भारत प्रांत संघचालक अशोक पांडेय आणि भोपाळ विभाग संघचालक सोमकांत उमाळकर उपस्थित होते.

सोशल मीडिया आणि वैचारिक प्रतिध्वनी कक्षांच्या युगात युवांशी जोडले जाण्याच्या प्रश्नावर दत्तात्रेय होसबळे म्हणाले की, आज पिढ्या 'जेन-झी' आणि 'जेन-अल्फा' यासारख्या नावांनी ओळखल्या जातात, तर स्वामी विवेकानंदांनी युवांना 'युवा भारत' म्हटले होते. स्वामी विवेकानंदांनी नरेंद्रच्या रूपात प्रश्न विचारले होते आणि नचिकेत्याचे प्रश्न विचारणे भारतीय परंपरेत प्रसिद्ध आहे.



त्यामुळे, जर नवीन पिढीने सत्ता, समाज किंवा कोणत्याही संस्थेला प्रश्न विचारले, तर ते चुकीचे मानले जाऊ नये. युवांचे प्रश्न ऐकून घेतले पाहिजेत आणि त्यांच्याशी संवाद साधला पाहिजे. केवळ प्रश्न विचारल्याबद्दल एखाद्याला नाकारण्याऐवजी, त्यांचा दृष्टिकोन समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

विद्यार्थ्यांमधील वैचारिक वातावरण बदलण्याचा एक मार्ग म्हणून, सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी स्वाध्याय मंडळे, गटचर्चा आणि राष्ट्रीय हिताशी संबंधित सर्जनशील उपक्रम सुरू करण्याची सूचना केली. बंगळुरमधील विद्यार्थ्यांसाठीच्या 'नमो भारती' कार्यक्रमाचे उदाहरण देत ते म्हणाले की, लहान उपक्रमांमधूनही सकारात्मक वातावरण निर्माण होऊ शकते.

शिक्षण व्यवस्थेतील भारतीय दृष्टिकोनाबद्दल ते म्हणाले की, इतिहास, पुरातत्त्वशास्त्र, भाषाशास्त्र आणि समाजशास्त्र यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये भारताकडे पाश्चात्त्य दृष्टिकोनातून पाहण्याचे प्रयत्न बऱ्याच काळापासून होत आले आहेत. भारतीय समाजातील दुष्प्रवृत्ती मान्य करून त्या सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असले तरी, समाजाच्या सकारात्मक कामगिरी आणि परंपरांचाही वस्तुनिष्ठ अभ्यास केला पाहिजे.

भ्रष्टाचारावरील एका प्रश्नाला उत्तर देताना सरकार्यवाह म्हणाले की, व्यवस्थेमध्ये सुधारणा आवश्यक आहे,

(शेवटच्या पानावर)

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात जोरदार तेजी

**मुंबई :** आशियाई बाजारातील उत्साहाच्या पृष्ठभूमीवर सोमवारी देशांतर्गत बाजारात खरेदीचे जोरदार वातावरण पाहायला मिळाले. या सकारात्मक वातावरणात दिवसअखेर सेन्सेक्सने ६९२ अंकांची झेप घेतली आणि निफ्टी-५० ने देखील २३४०० चा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला. मात्र, व्यापक स्तरावर विक्रीचा दबाव दिसून आला. त्यामुळे निफ्टी मिडकॅप १०० आणि निफ्टी स्मॉलकॅप १०० हे निर्देशांक घसरणीसह बंद झाले. क्षेत्रीय निर्देशांकांचा विचार करता सोमवारी केवळ रियल्टी आणि फार्मा क्षेत्राचे निर्देशांक प्रत्येकी एक टक्क्यांपेक्षा जास्त वाढीसह बंद झाले. याशिवाय निफ्टी एफएमसीजी निर्देशांकात ०.९५ टक्के वाढ नोंदवली गेली. अंतिम आकडेवारीनुसार, सेन्सेक्स ५६४.०३ अंकांच्या वाढीसह ७४,८५८.९९ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक ६७.९० अंकांच्या वाढीसह २३,४१४.३० वर पोहोचला.

### पारदर्शक भरती प्रक्रियेसाठी शिफारशी

**छ. संभाजीनगर :** राज्यातील शासकीय भरती परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, गुणवत्तापूर्ण, विश्वासार्ह आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनाला समिती शिफारशी सादर करेल. परीक्षा वेळापत्रक, प्रश्नपत्रिकेचा दर्जा, परीक्षा केंद्रे, पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण, पेपर तपासणी, सामान्यीकरण, निकाल, न्यायालयीन प्रकरणे आणि नियुक्ती प्रक्रिया अशा विविध मुद्द्यांचा अभ्यास करून समिती या शिफारशी सुचवणार असल्याची माहिती भरती परीक्षा उच्चस्तरीय टास्क फोर्सच्या अध्यक्षा तथा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी दिली.

**ताज्या घडामोडी** क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सॲप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

# दुष्काळाचा आढावा घेऊन अहवाल द्या

## मुख्यमंत्र्यांचा पालकमंत्र्यांना निर्देश

**मुंबई, २१ सप्टेंबर**

राज्यातील अनेक भागांत पावसाने दीर्घ खंड दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची सरकारने गंभीर दखल घेतली असून, आता प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांना परिस्थितीच्या थेट पाहणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पालकमंत्र्यांनी आपापल्या जिल्ह्यातील शेती, पिकांची स्थिती, पाण्याची उपलब्धता, चारा आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचा सविस्तर आढावा घेऊन अहवाल सादर करावा, असा निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. अहवाल प्राप्त होताच शेतकऱ्यांसाठी तातडीची मदत जाहीर करण्याची भूमिका त्यांनी यावेळी स्पष्ट केली.

महाराष्ट्रात १ जून ते १४ सप्टेंबरदरम्यान पावसाची सुमारे १६ टक्के तूट नोंदली गेली असून, ऑगस्ट-सप्टेंबरमधील पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांवर परिणाम झाला आहे. विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील परिस्थिती गंभीर असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या दौऱ्यानंतर समोर आले आहे. त्यांनी या भागातील परिस्थितीचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे सांगितले आहे. (तभा वृत्तसेवा)

# कर्नाटक अन् तामिळनाडूत दुष्काळ जाहीर; महाराष्ट्र सरकार ५ ऑक्टोबरपर्यंत का थांबतेय?

## माजी खासदार राजू शेट्टी यांचा सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

कर्नाटक अन् तामिळनाडू सरकारने दुष्काळ पडल्याचे जाहीर करत 'एनडीआरएफ'कडे मदतही मागितली आहे. मात्र महाराष्ट्र सरकार म्हणते ५ ऑक्टोबरपर्यंत थांबावे लागेल. म्हणजे आपली पात्रता काय आहे? असा सवाल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी उपस्थित केला.

सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेल्या 'कायद्याने हात बांधले, लगेच दुष्काळाची घोषणा करता येणार नाही' या वक्तव्याचा समाचार घेताना माजी खासदार राजू शेट्टी पुढे म्हणाले, परिस्थिती गंभीर होत चाललेली असली तरी कायदा आणि नियमाने हात बांधले आहेत, असे म्हणणे सर्वार्थाने चुकीचे आहे.



दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाला आलेला घास हिरावला आहे. सोलापुरातही ८० टक्केच्या पुढे पिके वाया गेल्याचा अहवाल गेला आहे. यासाठी शेतकरी, शेतमजूर आणि दुष्काळावर विशेष अधिवेशन घ्यावे आणि केवळ वांझोटी चर्चा, अधिवेशन आणि दौरे कशासाठी? असाही सवालही त्यांनी उपस्थित केला.

सोलापूर जिल्ह्यातील अनेक साखर कारखानदार ऊस तोडणी वेळी मध्यस्थी उभा करत आहेत. मध्यस्थी उभा राहिल्यास शेतकऱ्यांना कारखानदारांना जाब विचारता येणार नाही. त्यामुळे असा ऊस माफिया खपवून घेणार नाही. १५ ऑक्टोबरला गाळप हंगाम सुरु करण्यासाठी आमचा ठाम विरोध राहील, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

# सोनियांविरोधातील पुनर्विचार याचिका स्वीकारली

**नवी दिल्ली, २१ सप्टेंबर**

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी भारतीय नागरिक होण्यापूर्वी त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासंदर्भात दंडाधिकारी न्यायालयाच्या आदेशाविरोधात दाखल केलेली पुनर्विलोकन याचिका विशेष न्यायाधीशांनी स्वीकारली आहे.

सत्र न्यायालयाने अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांनी २०२५ मध्ये दिलेला आदेश रद्द केला आहे. या प्रकरणाची नव्याने सुनावणी घेण्यासाठी आणि त्यामागील कारण स्पष्ट करणाऱ्या आदेशासाठी प्रकरण परत पाठवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, दंडाधिकारी न्यायालयाने काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्याची मागणी करणारी तक्रार फेटाळली होती.

सत्र न्यायालयाने म्हटले की, ही तक्रार केवळ एका पुष्टी न झालेल्या दस्तऐवजाच्या छायाप्रतीवर आधारित एक तथ्यात्मक दावा म्हणून फेटाळण्यात आली होती. त्यामुळे हा आदेश रद्द करण्यास पात्र आहे. नागरिकत्वाशी संबंधित प्रकरणांवरील अधिकारक्षेत्राबाबत दंडाधिकारी न्यायालयाचे निरीक्षण सत्र न्यायालयाने चुकीचे ठरवले. याप्रकरणी पुढील सुनावणी २९ सप्टेंबर रोजी होणार असल्याचे न्यायालयाने सांगितले. (वृत्तसंस्था)

# राज्यात ६५ हजारांपेक्षा जास्त पदांची मेगा भरती!

## ४६,४६४ पदे एमपीएससीमार्फत भरण्याच्या हालचालींना वेग

**मुंबई, २१ सप्टेंबर**

राज्यातील सरकारी नोकरीच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो तरुणांसाठी राज्य सरकारने मोठी भरती प्रक्रिया हाती घेतली आहे. विविध शासकीय विभागांमधील तब्बल ६५,८६६ रिक्त पदे भरण्याच्या हालचालींना वेग आला असून त्यापैकी ४६,४६४ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) भरण्याची तयारी सुरू झाली आहे. संबंधित विभागांनी आपल्या रिक्त पदांची मागणीपत्रे तातडीने सादर करावीत, असा निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व विभागांना दिला आहे.

एमपीएससीच्या परीक्षांमध्ये पेपरफुटीच्या प्रकरणामुळे उमेदवारांमध्ये निर्माण झालेला असंतोष आणि त्यानंतर विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनाच्या पृष्ठभूमीवर सरकारकडून भरती प्रक्रियेला गती देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी रिक्त पदांचा आढावा घेत संबंधित विभागांकडून भरतीसाठी आवश्यक मागणीपत्रे तातडीने मागविली आहेत. काही विभागांकडून अद्याप मागणीपत्रे सादर झालेली नसल्याने त्याबाबतही प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील पाणीपुरवठा, वैद्यकीय शिक्षण, कृषी, महसूल, वित्त, गृह, सहकार यांसह विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याचे समोर आले आहे. विभागांकडून प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रांची एकत्रित माहिती घेऊन पदनिहाय आणि विभागनिहाय रिक्त जागांचा अंतिम आकडा निश्चित केला जाणार आहे. त्यामुळे सध्या जाहीर झालेला ६५,८६६ पदांचा आकडा हा भरती प्रक्रियेचा व्यापक आराखडा मानला जात असून, अंतिम जाहिरातींमध्ये पदसंख्या, संवर्ग, आरक्षण, शैक्षणिक पात्रता आणि परीक्षेचे वेळापत्रक स्पष्ट होणार आहे.

या मेगा भरतीमुळे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या राज्यातील तरुणांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. मात्र, प्रत्यक्ष अर्ज प्रक्रिया संबंधित विभाग आणि एमपीएससीकडून अधिकृत जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतरच सुरू होणार असल्याने उमेदवारांनी अधिकृत अधिसूचनांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. दरम्यान, भरती प्रक्रिया पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्याचे आव्हान सरकारसमोर राहणार आहे. रिक्त पदांची संख्या मोठी असल्याने विभागांकडून मागणीपत्रे किती वेगाने प्राप्त होतात आणि त्यानंतर जाहिराती, परीक्षा व नियुक्तीची प्रक्रिया कितपत गतिमान होते, याकडे राज्यातील लाखो इच्छुकांचे लक्ष लागले आहे. (तभा वृत्तसेवा)

| विभाग | एकूण रिक्त पदे |
|---|---|
| पाणीपुरवठा विभाग | ८,६५२ |
| वैद्यकीय शिक्षण विभाग | ७,८६८ |
| कृषी विभाग | ६,००० |
| महसूल विभाग | ४,७७० |
| वित्त विभाग | ३,१८४ |
| कायदा व न्याय विभाग | २,००० |
| सार्वजनिक बांधकाम विभाग | १,५०० |
| उच्च व तंत्रशिक्षण विभाग | १,५०० |
| गृह विभाग | २,१५० |
| सहकार विभाग | १,२४७ |
| राज्यातील एकूण रिक्त पदे : ६५,८६६ | |

# महाराष्ट्रात वादळी पाऊस बरसणार पुढील ७२ तास महत्त्वाचे

**मुंबई, २१ सप्टेंबर**

मॉन्सूनच्या परतीला सुरुवात झाल्याचे संकेत मिळत असतानाच महाराष्ट्रावर वादळी पाऊस बरसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघाड दिल्याने अनेक भागांत उन्हाचा चटका वाढला असताना आता वातावरणात अचानक बदल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने सोमवारी राज्यातील अनेक भागांत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता व्यक्त केली असून, पुढील ७२ तास राज्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.



कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता आहे. नाशिक, मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर, पुणे, सातारा, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांमध्येही विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा अंदाज आहे. पश्चिम राजस्थानमधून मॉन्सूनच्या माघारीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

### शेतीवरील संकट कायम

पावसाच्या लहरीपणामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतीसमोरील संकट कायम आहे. काही भागांत पावसाने उसंत दिल्याने, तर काही ठिकाणी अल्पावधीतीलजोरदार पावसामुळे पिकांचे नुकसान झाले आहे.

# आशियाई स्पर्धेत भारताला रौप्य पदक; सोलापूरच्या पार्थ मानेचा समावेश

## 'सिध्देश्वर गड्डा यात्रेत' फुगे फोडल्यानंतर पार्थच्या नेमबाजाची चुणूक

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

जपानमधील आयची-नागोया येथे सुरू असलेल्या आशियाई खेळ २०२६ मध्ये पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात सोमवारी भारताच्या संघाने रौप्य पदक पटकावले असून, यामध्ये सोलापूरचा १८ वर्षीय प्रतिभावान नेमबाज पार्थ राकेश माने याचा समावेश आहे. १० मीटर एअर रायफलच्या वैयक्तिक पात्रता फेरीत पार्थ मानेने ६२८.३ गुण मिळवले. तो ११ व्या क्रमांकावर राहिल्याने त्याची वैयक्तिक अंतिम फेरी गाठण्याची संधी अवघ्या फरकाने हुकली.



सोलापूरच्या विजापूर रोड परिसरातील आदित्यनगर भागात मूळचे राहणारे पार्थचे वडील राकेश माने हे चेंबूर मुंबईमध्ये सीआयडी खात्यात सहायक पोलिस निरीक्षक म्हणून सेवेत आहेत. वडिलांची नोकरीमुळे सतत होणाऱ्या बदल्यांमुळे पार्थचे शिक्षण विविध ठिकाणी झाले; त्याने पहिली ते चौथी पुणे आणि पाचवी ते आठवीपर्यंतचे शिक्षण सोलापूरच्या केंद्रीय विद्यालयात घेतले.

पार्थचे वडील जेव्हा सोलापूरच्या वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्समध्ये शिकत होते. तेव्हा 'एनसीसी'मध्ये भाग घेतल्यानंतर त्यांना शूटिंगच्या तांत्रिक गोष्टींची माहिती होती. पण सोलापुरात शूटिंग रेंज असल्याची माहिती नव्हती. त्यामुळे सुरुवातीला वडिलांनी त्याला बास्केटबॉल व स्विमिंगमध्ये घातले. परंतु वजन जास्त असल्यामुळे ते खेळ त्याला सूट झाले नाहीत. एकेदिवशी सोलापुरातील सिध्देश्वर यात्रेच्या 'गड्डा' जत्रेत त्याने रंगीत फुगे अचूकपणे फोडल्यानंतर, त्याच्यातील नेमबाजाची चुणूक वडिलांच्या लक्षात आली.

(यासंदर्भातचे वृत्त पान नंबर ६ वर...)

### घरातच १० बाय ५ फुटांची रेंज, साधला अचूक टार्गेट

सोलापुरातील इंडियन मॉडेल स्कूलमध्ये सुरु असलेल्या शूटिंग रेंजमध्ये अविनाश गोसावी यांच्याकडे त्याने ५-६ महिने बेसिक प्रशिक्षण घेतले. त्यानंतर वडिलांनी त्याला पुण्यात पिंपळे सौदागर येथील शूटिंग रेंजमध्ये दाखल केले, जिथे सौरभ सलावणे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने तंत्रशुध्द प्रशिक्षण घेतले. सराव खंडित होऊ नये म्हणून त्याच्या घरातच (१० बाय ५ फूट जागेत) वडिलांनी शूटिंग रेंज तयार केली होती. यादरम्यान त्याचे प्रशिक्षक व्हिडिओ कॉलवरुन त्याचा सराव पाहून मार्गदर्शन करत असत. त्याच्या या प्रवासासाठी वडिलांनी त्याला सुमारे तीन लाखांची रायफल घेऊन दिली.

### पार्थचे आशियाई स्पर्धेतील पहिलेच पदक

इयत्ता नववीपासून पनवेल येथे राहत असलेला पार्थ सध्या रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील म हात्मा फुले महाविद्यालयात बीएससी भाग-दोनमध्ये शिक्षण घेत आहे. आशियाई स्पर्धेतील पदार्पणातील त्याचे हे पहिलेच पदक आहे. तो २०२१ पासून मुंबईत माजी ऑलिम्पियन सुमा शिरुर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. याआधी त्याने पेरु येथील ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक पटकावले होते.

# धनंजय बापट यांची 3 वर्षांसाठी प्रबंध संचालकपदी फेरनिवड

### श्री नरकेसरी प्रकाशन लि.ची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**नागपूर, २१ सप्टेंबर**

श्री नरकेसरी प्रकाशन लि. ची ७६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार २१ सप्टेंबर रोजी रामदासपेठ येथील संस्कृती सेलिब्रेशन सभागृहात सायंकाळी ५ वाजता संपन्न झाली. यावेळी १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करण्यात आला. या सभेत विद्यमान प्रबंध संचालक धनंजय बापट यांची पुढील तीन वर्षांसाठी फेरनिवड करण्यात आली. सभेत त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

सभेच्या अध्यक्षस्थानी श्री नरकेसरी प्रकाशन लि. चे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विलास डांगरे उपस्थित होते. तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष अनिल दांडेकर, प्रबंध संचालक धनंजय बापट आणि संचालक मंडळातील उदयभास्कर नायर, समीर गौतम, आशिष बडगे, अशोक मानकर, श्रीकर सोमण, प्रदीप काळेले आणि संदीप पोशट्टीवार व्यासपीठावर उपस्थित होते. संचालक मंडळातील अशोक मानकर, समीर गौतम आणि श्रीकर सोमण यांच्या पुनर्नियुक्तीचा ठरावही या सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्याचबरोबर पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांचीही संचालक मंडळाने एका वर्षासाठी अध्यक्षपदी फेरनिवड केली.

सभेच्या प्रारंभी दिवंगतांना आणि नेपाळ येथील जलप्रलयात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर भागधारकांच्या वतीने सतीश देशमुख, दत्ताजी टेकाडे, पद्माकर खरे, सुधाकर अत्रे, प्रदीप पहाडे यांनी विविध विषयांवर विधायक सूचना केल्या. मनोगतात प्रबंध संचालक धनंजय बापट यांनी सर्वांच्या सूचनांचे स्वागत केले.

याप्रसंगी विनोद जोशी, राजीव हडप, प्रमोद पेंडके, चंदू पेंडके, विष्णू देशपांडे, जयंत कहू, भालचंद्र देशपांडे, जयंत देव, गिरीश देशमुख, मनोहर देव, किरण नाईक, ॲड. विवेक सोनटके, विलास देशपांडे, अविनाश संगवई, महेंद्र आकांत, डॉ. दिलीप देशपांडे, मधुकर आपटे आदी भागधारक उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)



प्रबंध संचालकपदी फेरनिवड झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन धनंजय बापट यांचे स्वागत करताना श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विलास डांगरे. सोबत कार्याध्यक्ष अनिल दांडेकर आणि संचालक मंडळातील सदस्य सर्वश्री आशिष बडगे, समीर गौतम, संदीप पोशट्टीवार, श्रीकर सोमण, अशोक मानकर आणि उदयभास्कर नायर

### पुणे आवृत्ती ही मोठी उपलब्धी : धनंजय बापट

शताब्दी वर्षात तरुण भारतच्या पुणे आवृत्तीचा शुभारंभ होणे ही आपल्यासाठी मोठी उपलब्धी असल्याचे प्रबंध संचालक धनंजय बापट यांनी यावेळी सांगितले. ते म्हणाले की, संघाची शताब्दी, तरुण भारतची शताब्दी आणि श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचा अमृत महोत्सव असा त्रिवेणी योग जुळून आला. त्यानिमित्ताने तरुण भारत परिवाराने संघाने दिलेल्या पंचसूत्रीनुसार विविध उपक्रम आयोजित केले. अमृतयोग आणि समर्पण हे दोन विशेषांक या प्रवासात उल्लेखनीय असून, या वर्षी पुणे आवृत्ती सुरू झाली. तिला वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. संचालक मंडळ आणि सर्व कर्मचारी यांचे सहकार्य आपल्यासाठी मोलाचे ठरले. भविष्यातही आपल्याला असेच सहकार्य मिळेल, असा विश्वास धनंजय बापट यांनी व्यक्त केला.

### आत्मनिर्भर भारताची स्वर्णिम भारताकडे वाटचाल : डॉ. डांगरे

आत्मनिर्भर भारताची स्वर्णिम भारताकडे वाटचाल सुरू असून, जगात शांतता प्रस्थापित करण्याची क्षमता केवळ भारतात असल्याचे श्री नरकेसरी प्रकाशन लि.चे अध्यक्ष पद्मश्री डॉ. विलास डांगरे यांनी अध्यक्षीय मनोगतात सांगितले. भारतीय नेतृत्वाकडून जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारताची संस्कृती असून, तीच देशाची ताकद आहे. या संस्कृतीच्या बळावर आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार होईल, असा विश्वास डॉ. डांगरे यांनी व्यक्त केला.

## विदर्भातील अष्टविनायक

# पवनीचा पंचमुखी सर्वतोभद्र भक्तांना पावणारा !

विजय निचकवडे

**भंडारा, २१ सप्टेंबर**

विदर्भाची काशी किंवा मंदिरांचे नगर म्हणून पवनी शहराची ओळख आहे. या शहराच्या धार्मिक वारशात भर घालणारे महत्त्वाचे मंदिर म्हणजे विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक असलेले पंचमुखी गणेशाचे मंदिर. पंचमुखी, पंचानन, सर्वतोभद्र, धुंडीराज अशा विविध नावांनी ओळखला जाणारा येथील गणेश विदर्भातील भक्तांचे श्रद्धास्थान आहे.

भंडाऱ्याच्या पवनीमध्ये वसे सर्वतोभद्र,
पंचानन तो पंच प्रतिमा नसे कुठे इतरत्र,
उत्खननातून नागलोगीचा स्तंभ इथे गवसला,
अष्टगणेशा भावभक्तीने वंदन करतो तुजला

विदर्भातील अष्टविनायकांपैकी सहाव्या क्रमांकाचा गणपती म्हणून पवनी येथील सर्वतोभद्र गणपतीचे हे वर्णन सर्वकाही सांगून जाते. चहू बाजूने शुभ आणि मंगल करणारा असा हा सर्वतोभद्र पाच मुखांचा आहे. प्राचीन काळात झालेल्या उत्खननातून सापडलेला स्तंभ या भूमीचे महत्त्व सांगणारा आहे.

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगेच्या तीरावरील पवनी म्हणजेच विदर्भाच्या काशीत हे बाप्पा विराजमान आहे. या मंदिरातील गणेशाची मूर्ती शमी वृक्षात कोरलेली असल्याचे मानले जाते. मात्र, ही मूर्ती दहाव्या शतकातील असून, ती दगडावर कोरलेली असल्याचे काही इतिहासतज्ज्ञ सांगतात. एकाच शिळेवर चारही बाजूने श्रीगणेशाची प्रतिमा कोरलेली आहे व पाचवी प्रतिमा नैऋत्य दिशेला आहे. या मूर्तीची उंची ३२ इंच आहे व पूर्व-पश्चिम लांबी १७ इंच, उत्तर-दक्षिण रुंदी १५ इंच आहे. उत्तर-पूर्व व दक्षिण दिशेला असणाऱ्या गणेशाची सोंड डाव्या बाजूला आहे. त्याच्या हातामध्ये लाडू, परशू असल्याचे स्पष्ट दिसते. डोक्यावर मुकुट धारण केलेला आहे. नैऋत्य व पश्चिम दिशेच्या मूर्तीच्या प्रतिमा सरळ असून, सोंडही सरळ आहे. मूर्तीचा वरील भाग ११ इंच उतरता आहे. चतुर्भुज स्वरूपातील ही मूर्ती जमिनीपासून दीड फूट खोल असल्याचे सांगितले जाते. सर्वांगाला शेंदूर लेपल्यामुळे मूर्तीचे मूळ स्वरूप स्पष्ट दिसत नाही. कवेतूच्या घरात स्थापन असलेली ही मूर्ती असंख्य भक्तांच्या श्रद्धेचे स्थान आहे. याच पवनी शहरात गणपती बाप्पांची अनेक मंदिरे आहेत. पण आलेला प्रत्येक भक्त धुंडीराज अर्थात सर्वतोभद्र याचे दर्शन घेऊनच पवनीचा निरोप घेतो, हे विशेष !



पवनी येथील अष्टविनायकांमधील एक गणपती

## महत्त्वाचे

### 'काँग्रेस बनला माओवादी मुस्लिम लीग पक्ष'

**नवी दिल्ली :** आजची काँग्रेस अतिडावी झाली आहे आणि काँग्रेस नेते राहुल गांधी साम्यवादात बुडाले आहेत. राहुल यांनी केलेली वक्तव्ये ही एक कौटुंबिक परंपरा आहे, हे स्पष्ट आहे. काँग्रेस पक्ष माओवादी मुस्लिम लीग पक्ष बनला असून, अस्तित्वाशी सुरू असलेल्या संघर्षामुळे त्यांच्या नेत्यांवर ही नामुष्की ओढवली असल्याची टीका भाजपा खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी सोमवारी पत्रपरिषदेतून केली. हमीद अन्सारी यांच्या हिंदू राष्ट्रवादावरील वक्तव्याचा समाचार घेत त्रिवेदी यांनी राहुल यांना लक्ष्य करत म्हटले की, अन्सारी यांनी स्पष्ट केले की, काँग्रेस आता माओवादी मुस्लिम लीग पक्ष बनली आहे.

### सणासुदीत वीज संकटाचे सावट

**नवी दिल्ली :** गणरायाच्या आगमनापासून देशात सुणासुदीचा काळ सुरू झाला. दिवाळीच्या सणाला दीड महिन्याचा काळ असताना, देशातील विजेची मागणी वाढत आहे. अशातच वीज निर्मिती क्षेत्रासमोर कोळशाच्या साठ्याचे संकट निर्माण झाल्याचे सरकारी आकडेवारीतून देशातील सुमारे ४० टक्के कोळशावर आधारित वीज प्रकल्पांमध्ये अत्यंत कमी साठा शिल्लक असल्याची माहिती समोर आली. 'सेंट्रल इलेक्ट्रिसिटी अथॉरिटी'च्या (सीईए) आकडेवारीनुसार देशातील ७४ वीज प्रकल्पांमध्ये त्यांच्या क्षमतेच्या ३५ टक्क्यांपेक्षाही कमी कोळसा साठा शिल्लक आहे. या साठ्यातून संबंधित प्रकल्पांना तीन दिवसांपेक्षा कमी काळ वीज निर्मिती करता येऊ शकते.

# यवतमाळ अर्बन बँकेबाबतचे वृत्त भ्रामक व तथ्यहीन

### बँकेकडून पोलिसांत तक्रार दाखल

**यवतमाळ, २१ सप्टेंबर**

एका वृत्तपत्रात यवतमाळ अर्बन बँकेबाबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या वृत्तात बँकेचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांबाबत गंभीर आरोप करण्यात आले होते. हे वृत्त वस्तुस्थितीशी विपरित, अपूर्ण माहितीवर आधारित, एकतर्फी व तथ्यहीन आहे. बँकेची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने हे वृत्त प्रसारित करण्यात आल्याचे बँकेने स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात यवतमाळ अर्बन बँकेने संबंधित पोलिस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली असून, तक्रारीच्या अनुषंगाने पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. या प्रकरणातील सर्व बाबींची कायदेशीरदृष्ट्या सखोल चौकशी करून आवश्यक कारवाई करण्यात येईल. बँक नियमानाधीन कार्यरत सहकारी संस्था असून, कामकाजात लागू असलेले कायदे, नियम व नियामक संस्थांच्या (रिझर्व्ह बँक इत्यादी) निर्देशांचे पालन केले जाते. संबंधित प्रकरणात बँकेने आवश्यक सर्व माहिती व कागदपत्रे संबंधित यंत्रणांना उपलब्ध करून दिली आहेत. पोलिस तपासाला बँक पूर्ण सहकार्य करीत आहे.

बँकेची व्यवस्था सर्व नियम, नियमन व सहकार कायद्यानुसार पारदर्शकपणे चालविली जाते. बँकेच्या कामकाजात कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. सर्व व्यवहार, ठेवी, कर्जवाटप व प्रशासकीय निर्णय रीतसर नोंदी व प्रक्रियेनुसारच होतात. बँकेचे अधिकारी व कर्मचारी ग्राहकांच्या हितासाठी कटिबद्ध असून, बँकेची आर्थिक स्थिती स्थिर व सक्षम आहे.

या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत एकतर्फी, अपूर्ण व तथ्यहीन बातम्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन बँकेने केले आहे. अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी बँकेच्या अधिकृत कार्यालयाशीच संपर्क साधावा, अशी विनंती बँकेने केली आहे.

बँकेच्या सर्व सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक व सर्वसामान्य जनतेने कोणत्याही चुकीच्या बातम्यांवर विश्वास न ठेवता, बँकेच्या कामकाजावर विश्वास ठेवावा, असे आवाहन बँक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. (तभा वृत्तसेवा)

# इराणवर लवकरच अंतिम निर्णय घेणार

### ट्रम्प यांची माहिती, अमेरिकन सैन्य कोणत्याही परिस्थितीसाठी सज्ज

**वॉशिंग्टन, २१ सप्टेंबर**

इराणसंदर्भात अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे आणि त्यासाठी पूर्णपणे मनाचा निश्चय केला आहे. इराणी राजवटीच्या वर्तनात सुधारणा झाली नाही, तर काहीही होऊ शकते. आम्ही मनात आणले तर उद्याच त्यांच्या भूभागात प्रवेश करून उद्ध्वस्त करू शकतो. अमेरिकेला धमक्या देणे त्यांना महागात पडू शकते, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एका वृत्तवाहिनीली दिलेल्या मुलाखतीत म्हटले.

इराणने मध्यस्थी राष्ट्रांमार्फत अमेरिकेला एक प्रस्ताव पाठवला आहे, त्यात सात अटी नमूद करण्यात आल्या. त्याची पूर्तता झाल्यावरच होर्मुझ जलमार्ग खुला करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय संघर्षाशिवाय इराणी सैन्य सज्ज असल्याचा इशाराही त्यांनी दिला होता. यावर विचारले असता ट्रम्प म्हणाले, इराणवर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे. अमेरिकन सैन्य कोणत्याही परिस्थितीसाठी सज्ज आहे. संघर्ष संपवण्यासाठी मी तीन पर्याय दिले आहे. पहिला इराणला नष्ट करणे, दुसरा इराणच्या अर्थव्यवस्थेला नुकसान पोहोचवणे आणि तिसरा इराणने अमेरिकेशी करार करावा. पहिल्या पर्यायावर अद्याप निर्णय घेतला नाही, मात्र त्यांनी करारासाठी टाळाटाळ केल्यास आम्हाला अंतिम निर्णय घ्यावा लागेल. आम्ही येमेनमधील हुथींच्या संपर्कात आहे. त्यांनी अमेरिकन सैन्यावर हल्ला न करण्याचे आश्वासन दिले आहे. संयुक्त राष्ट्र महासभेत सहभागी होण्यासाठी राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियन न्यू यॉर्क येथे येणार आहे. त्यावर ट्रम्प म्हणाले, त्यांनी अमेरिकेचा प्रस्ताव स्वीकारल्यास मला भेटायला आवडेल. (वृत्तसंस्था)

# चिन्ह गोठवण्याच्या निर्णयाला तृणमूलचे आव्हान

### सर्वोच्च न्यायालयात होणार तातडीची सुनावणी

**नवी दिल्ली, २१ सप्टेंबर**

तृणमूल काँग्रेसचे नाव आणि निवडणूक चिन्ह गोठवण्याच्या निर्णयाला आव्हान देत माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत तातडीची सुनावणी करण्याची मागणी केली.न्यायालयाने त्यांची याचिका मंजूर केली आहे. ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या न्यायासनासमोर तृणमूल काँग्रेसची बाजू मांडली.



सिब्बल म्हणाले, निवडूक आयोग एक अधिसूचना जारी करतात आणि अधिसूचनेच्या मध्यातच निवडणूक चिन्ह गोठवतात. हा काय प्रकार आहे? या प्रकरणात न्यायालयाने तत्काळ सुनावणी करावी, अशी आमची विनंती आहे.त्यानंतर न्यायासनाने हे प्रकरण तत्काळ सुनावणीसाठी घेण्याचा निर्देश दिला.

विशेष म्हणजे, निवडणूक आयोगाने शुक्रवारी ममता बॅनर्जी आणि ऋतब्रता बॅनर्जी या प्रतिस्पर्धी गटांना वेगवेगळी नावे आणि निवडणूक चिन्हे दिली होती.

एक दिवस आधी आयोगाने या वादावर अंतिम निर्णय होईपर्यंत दोन्ही गटांना 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव वापरण्यास मनाई करणारा आणि निवडणूक चिन्ह गोठवणारा अंतरिम आदेश जारी केला होता.

**शेवटपर्यंत लोकशाही व कायदेशीर मार्गाने लढणार**

सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेत ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोग आणि पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते ऋतब्रता बॅनर्जी यांना प्रतिवादी केले आहे. निवडणूक चिन्ह गोठवण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयावर टीका करत त्या म्हणाल्या, पक्षाची ओळख गमावण्याचे दुःख आपले मूल गमावलेल्या आईच्या वेदनेसारखेच आहे. आम्ही ही अंतरिम व्यवस्था तडजोड म्हणून स्वीकारणार नाहीत. पक्षाची मूळ ओळख व निवडणूक चिन्ह परत मिळवण्यासाठी शेवटपर्यंत राजकीय, लोकशाही आणि कायदेशीर मार्गाने लढू, असेही त्यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# डीजेविषयी आज तातडीची सुनावणी

### उच्च न्यायालयाने घेतली स्वतःहून दखल

**मुंबई, २१ सप्टेंबर**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात सण आणि उत्सवांच्या काळात चर्चेचा मुद्दा ठरलेल्या ध्वनिप्रदूषणाच्या समस्येची दखल स्वतःहून मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे. न्या. जी. एस. कुळकर्णी आणि न्या. नीला गोखले यांच्या खंडपीठाने डीजेमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाविषयी मंगळवारी तातडीने सुनावणी करण्याचा निर्णय घेतला आहे.

ध्वनिप्रदूषणाचे नियम आणि अंमलबजावणीचा अहवाल उद्या सादर करावा, असा आदेश न्यायालयाने सरकारला दिला आहे. आमचा कोणत्याही धर्माच्या सणाला विरोध नाही; मात्र इतरांना त्रास होऊ नये, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. नियम मोडणाऱ्यांची साऊंड सिस्टिम जप्त करून गुन्हे दाखल करण्याचा आदेशही पोलिसांना देण्यात आला. हा आदेश वर्षभरातील सर्व धर्मांच्या मिरवणुकांना लागू राहणार असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, नागपूर खंडपीठाकडून क्षमतेपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या डीजेंवर बंदी घालण्यात आली असून, हा निर्णय १ नोव्हेंबरपर्यंत लागू राहणार आहे. मंगळवारी होणाऱ्या सुनावणीत न्यायालयाच्या टिप्पणी आणि निर्णयाकडे सर्वांचे विशेषतः डीजे व्यावसायिकांचे लक्ष लागले आहे. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळा आज

### एकता नगरमध्ये राष्ट्रपतींच्या हस्ते होणार वितरण

**नवी दिल्ली, २१ सप्टेंबर**

भारतीय चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट कलाकृती, अभिनय आणि तांत्रिक कौशल्याचा गौरव करणाऱ्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्याची तयारी पूर्ण झाली आहे. मंगळवारी गुजरातमधील केवडिया येथील एकता नगरमध्ये हा दिमाखदार सोहळा पार पडणार आहे. २०२४ मधील भारतीय चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत राष्ट्रपतींच्या हस्ते विविध पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.



राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांना भारतीय चित्रपटसृष्टीतील अत्यंत प्रतिष्ठेचा सन्मान मानले जाते. १९५४ मध्ये या पुरस्कारांची सुरुवात झाली. त्यानंतर कथानकप्रधान चित्रपट, कथाबाह्य चित्रपट तसेच चित्रपटविषयक लेखन अशा विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीचा गौरव या पुरस्कारांच्या माध्यमातून केला जातो. देशातील विविध भाषा, प्रदेश आणि चित्रपटनिर्मितीच्या विविध शैलींचे प्रतिनिधित्व या पुरस्कारांमधून होत आले आहे. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते अनंत नाग यांना २०२४ चा दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांची या सन्मानासाठी निवड झाली आहे. मंगळवारी होणाऱ्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात राष्ट्रपतींच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करणार आहे. (वृत्तसंस्था)

# ग्रीनलँड-अंटार्क्टिकातून २.५ लाख कोटी टन बर्फ नाहीसा

■ ईएसए, नासाच्या शास्त्रज्ञांची माहिती ■ समुद्र पातळीत ३.१ सेंटिमीटरची वाढ ■ किनारी भागांना धोका

**वॉशिंग्टन, २१ सप्टेंबर**

हवामान बदलामुळे पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवीय प्रदेशांतील बर्फ झपाट्याने कमी होत असल्याचे नव्या वैज्ञानिक अभ्यासातून समोर आले आहे. १९७९ पासून ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकामधून १२.५ ट्रिलियन टन अर्थात् सुमारे १२.५ लाख कोटी टन बर्फ कमी झाला आहे. यामुळे जागतिक समुद्रपातळीत सुमारे ३.१ सेंटिमीटरने वाढ झाल्याची माहिती युरोपियन अंतराळ संस्था (ईएसए) आणि नासाच्या विविध शास्त्रज्ञांनी दिली.

उपग्रहांकडून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून दोन्ही संस्थांच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या संयुक्त अभ्यासातून उपरोक्त माहिती समोर आली.

गेल्या ४७ वर्षांत बर्फ वितळण्याचा वेग सातत्याने वाढत गेला असून, विशेषतः २०१० नंतर ही प्रक्रिया अधिक वेगवान झाल्याचे अभ्यासात दिसून आले. १.५ मीटर जाडीच्या



वितळलेल्या बर्फाचे प्रमाण किती प्रचंड आहे, याची कल्पना यावरून येते की, हा संपूर्ण बर्फ एका ठिकाणी जमा केला तर, संपूर्ण अमेरिकेच्या भूभागावर सुमारे १.५ मीटर जाडीचा बर्फाचा थर तयार होऊ शकतो. हा बर्फ वितळल्यामुळे झालेले पाणी सुमारे तीन ट्रिलियन गॅलन अर्थात् अंदाजे १.१३ लाख कोटी लिटर असल्याचा अंदाज आहे. या पाण्यामुळे समुद्राच्या पातळीत झालेली वाढ जगभरातील किनारपट्टीच्या भागांसाठी धोकादायक आहे. समुद्र पातळीत झालेली वाढ किनारी शहरांमध्ये पूर, समुद्राचे पाणी नागरी भागांत शिरणे आणि किनारपट्टीची धूप यांचा धोका वाढला आहे. (वृत्तसंस्था)

### समुद्राचे ऊबदार पाणीही कारणीभूत

बर्फ कमी होण्यामागे केवळ तापमान वाढणे हेच कारण नाही, तर समुद्रातील तुलनेने उबदार पाणी बर्फाच्या थराखाली पोहोचून त्याची झीज वाढवत आहे. त्यामुळे बर्फ खालून आणि बाजूंनीही वितळत आहे. १९७० ते १९९० या काळात ध्रुवीय बर्फाच्या नुकसानीचा वेग तुलनेने कमी होता. मात्र, त्यानंतर परिस्थिती बदलली आणि २०१० नंतर बर्फ कमी होण्याचा वेग लक्षणीयरीत्या वाढल्याचे अभ्यासातून समोर आले.

# संवादातून युवांना समजून घेण्याची गरज

(पान १ वरून)

परंतु त्याची सुरुवात व्यक्तीच्या स्वतःच्या जीवनातून झाली पाहिजे. व्यक्तीने प्रथम भ्रष्टाचारापासून मुक्त राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि समाजात त्याविरोधात जागरूकता निर्माण केली पाहिजे.

**३०,००० स्वयंसेवकांचे एकत्रीकरण**

भोपाळ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमांचा एक भाग म्हणून, रविवारी भोपाळमधील लाल परेड मैदानावर स्वयंसेवकांचे भव्य एकत्रीकरण झाले. शिस्त, संघटन आणि राष्ट्रभावाने ओतप्रोत असलेल्या या एकत्रीकरणात सुमारे ३०,००० स्वयंसेवकांसह ५,००० मातृशक्ती आणि मान्यवर सहभागी झाले होते.

मुख्य अतिथी म्हणून एम्स भोपाळचे संचालक लेफ्टनंट जनरल डॉ. नरेंद्र कोतवाल यांच्यासह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, मध्य भारत प्रांताचे संघचालक अशोक पांडेय आणि भोपाळ विभागाचे संघचालक सोमकांत उमाळकर व्यासपीठावर उपस्थित होते.

लेफ्टनंट जनरल डॉ. नरेंद्र कोतवाल म्हणाले की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रवास समाज उभारणीपासून राष्ट्र उभारणीपर्यंत आहे. संघाचे कार्य व्यक्तीपासून सुरू होते आणि कुटुंब, समाज व राष्ट्रापर्यंत पोहोचते. कोणत्याही राष्ट्राची शक्ती केवळ त्याच्या भौतिक उपलब्धीनेच ठरत नाही, तर तेथील नागरिकांचे चारित्र्य, सामाजिक एकता, कर्तव्यभावना आणि परस्पर सहकार्य यावरही अवलंबून असते.

दत्तात्रेय होसबळे म्हणाले की, भारत वेगाने प्रगती करत असून ही प्रगती अनेक क्षेत्रांमध्ये दिसून येत आहे. भारतीय शास्त्रज्ञांनी विज्ञान, अंतराळ आणि इतर क्षेत्रांमध्ये देशाचे नाव उंचावले आहे. यासोबतच, भारताबद्दलची उत्सुकता, सन्मान, श्रद्धा आणि अभिमानही जगाच्या अनेक भागांमध्ये दिसून येतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भारताला परम वैभव प्राप्त करून देण्यासाठी कार्यरत आहे. हा प्रवास कोणत्याही एका उपलब्धीने संपत नाही. समाजाचे संघटन आणि व्यक्तींच्या चारित्र्यनिर्मितीचे कार्य अविरत सुरू राहणार असल्याचे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानचा अफगाणवर हवाई हल्ला

**२८ नागरिकांचा मृत्यू, ५० हून अधिक जखमी** | **कुनार प्रांतात अनेक निवासी इमारती उद्ध्वस्त** | **तालिबान सरकारचा प्रत्युत्तराचा इशारा**

**काबुल, २१ सप्टेंबर**

पाकिस्तानी वायुदलाने सोमवारी पहाटे अफगाणिस्तानच्या पूर्वेकडील भाग असलेल्या कुनार आणि पक्तिका प्रांतात हवाई हल्ले चढवले. यात २८ नागरिकांचा मृत्यू, तर ५० हून अधिक जखमी आहे. या हल्ल्यात अनेक निवासी इमारती उद्ध्वस्त झाल्या असून, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. पाकिस्तानने मारलेले गेलेले लोक दहशतवादी असल्याचे म्हटले आहे, तर दुसरीकडे तालिबान सरकारने प्रत्युत्तराचा इशारा देत हल्ल्याचा सूड घेणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे दोन्ही देशांत पुन्हा युद्धाचा भडका उडण्याची शक्यता वाढली आहे.



पाकिस्तानच्या हवाई हल्ल्यात कुनार प्रांतात उद्ध्वस्त झालेल्या इमारती

कुनार प्रांतात झालेल्या हवाई हल्ल्यात अनेक नागरी इमारतींचे नुकसान झाले, यात एकाच कुटुंबातील पाच नागरिकांसह १६ जण ठार झाले, यात महिला, मुलांचा समावेश आहे, तर पक्तिका प्रांतात १२ नागरिकांचे मृतदेह ढिगाऱ्यांतून काढण्यात आल्याची माहिती तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी सांगितले. हवाई हल्ल्यात अमेरिकेत निर्मित एमके ८२ बॉम्बचा वापर करण्यात आला. अफगाण सरकारने बॉम्बच्या मार्गदर्शन प्रणालीचा एक तुकडाही जारी केला आहे. पाकिस्तानी लष्कराने आरोप केला की, अफगाणिस्तानच्या भूमीवरून दहशतवादी हल्ले करत आहे. नुकत्याच कोहाट येथील मशिदीवर झालेल्या हल्ल्याचा कट अफगाणिस्तानात रचला होता. मात्र, तालिबान सरकारने त्यांचे आरोप फेटाळला आहे. फेब्रुवारीमध्ये पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात अनेक वर्षांतील सर्वात गंभीर लष्करी संघर्ष झाला होता. कोणत्याही पाकिस्तानी लष्करी कारवाईविरोधात अफगाण भूभागाचे रक्षण करण्याचा इशारा तालिबानने दिल्यानंतर काही दिवसांतच पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यामुळे तणाव वाढला आहे.

**सार्वभौमत्वाचे उल्लंघन महागात पडेल**

मुजाहिद म्हणाले, पाकिस्तानने कराराच्या कलम ५१ चा वापर करून अफगाण भूमीवर हल्ले केले, सार्वभौमत्वाच्या उल्लंघनाची त्यांना किंमत चुकवावी लागेल. अफगाणिस्तानला आपल्या देशाचे रक्षण करण्याचा अधिकार आहे आणि आम्ही ते करू. अफगाणिस्तानच्या हद्दीतील कोणतीही पाकिस्तानी लष्करी कारवाई सहन केली जाणार नाही. तालिबान प्रशासन तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानला (टीटीपी) अफगाण भूमीचा वापर करू देत नाही. पाकिस्तानने आपल्या अंतर्गत सुरक्षा समस्यांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

**लष्करी दबावापुढे झुकणार नाही**

२०२१ मध्ये तालिबान सत्तेवर येण्यापूर्वीपासूनच टीटीपी आणि बलुच सशस्त्र गटांशी संबंधित हिंसाचार अस्तित्वात होता. आम्ही वाटाघाटी करण्यासाठी तयार आहे, याचा अर्थ आम्ही दबावापुढे झुकलो असा होत नाही. पाकिस्तानने आमच्या भूभागाला लक्ष्य करून आक्रमकता दाखवली, ज्याला प्रत्युत्तर देण्याचा अधिकार आम्हाला आहे. कुनार आणि पक्तिका प्रांतांमधील नागरी भागांवर बॉम्बचा मारा करणे हे दहशतवादी कृत्य असून, याचा सूड घेतल्याशिवाय शांत बसणार नाही असे तालिबान सरकारच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

### आंतरराष्ट्रीय समुदायाने निषेध करावा

पाकिस्तानच्या वायुदलाने महिला आणि मुलांना लक्ष्य करत हल्ला चढवला आणि दहशतवादी कृत्याचा आंतरराष्ट्रीय समुदायाने निषेध करावा. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या देशच इतरांवर आरोप करत आहे, हे हास्यस्पद आहे. आम्ही या आक्रमणाचा आणि अन्यायाचा निषेध करतो आणि याला गुन्ह्यांची पुनरावृत्ती मानतो. अफगाण जनता या आक्रमणाला योग्य प्रत्युत्तर देईल असे कुनार प्रांताच्या माहिती आणि संस्कृती विभागाचे प्रमुख नजीबुल्लाह हनीफ म्हणाले. ■

# सौदीचा प्रवास टाळा, मायदेशी परता

**अमेरिकेचे नागरिकांना आवाहन**

## हुथीविरुद्ध संघर्षाने तणाव वाढल्याने निर्णय

**रियाध /वॉशिंग्टन, २१ सप्टेंबर**

सौदी अरब आणि येमेनमधील हुथी बंडखोर यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाच्या पृष्ठभूमीवर अमेरिकेने आपल्या नागरिकांना सौदीचा प्रवास टाळण्याचा आणि शक्य तितक्या लवकर मायदेशी परतण्याच्या सूचना दिल्या आहे. सौदीची राजधानी रियाधवर नुकत्याच झालेल्या हल्ल्यावर चिंता व्यक्त करताना अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने नागरिकांसाठी सूचना जारी केल्या.

अमेरिकेने आपल्या सरकारी कर्मचाऱ्यांना ताईफ आणि यान्बू येथे प्रवास करण्यासाठी विशेष परवानगी घेणे अनिवार्य केले आहे. सौदी आणि लाल समुद्रात सुरू असलेल्या संघर्षाची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे अमेरिकन नागरिकांनी दूतावासाच्या सूचनांचे पालन करावे, अनिवार्य नसल्यास सौदीचा प्रवास टाळावा आणि शक्य तितक्या लवकर मायदेशी परतण्याची तयारी करावी असेही निवेदनात म्हटले आहे. सध्याची सुरक्षा परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. अमेरिकन नागरिकांनाही सतर्क राहण्यास आणि सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यास सांगितले आहे. अमेरिकेने लोकांना निदर्शने आणि मोठ्या गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळण्याचे आणि अमेरिकेशी संबंधित मानल्या जाणाऱ्या ठिकाणी अधिक सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले.

हुथी गटाकडून सौदीवर होणाऱ्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांच्या मालिकेच्या पृष्ठभूमीवर अमेरिकेने हा इशारा दिला आहे. यामध्ये राजधानी रियाधच्या दिशेने डागलेल्या एका बॅलिस्टिक क्षेपणास्त्राचाही समावेश आहे.

**सामुद्रधुनी बंद करण्याचा उद्देश नाही**

हुथींची लष्करी मोहीम बाब अल-मंदेब सामुद्रधुनी बंद करण्याच्या उद्देशाने नसून, या सागरी मार्गातून सर्वांसाठी नौकानयनाचे स्वातंत्र्य सुनिश्चित करणे आहे. सामान्य परिस्थितीत, जागतिक व्यापारापैकी अंदाजे १२ टक्के व्यापार बाब अल-मंदेब सामुद्रधुनीतून होतो. ◂ (वृत्तसंस्था)



### रियाधमधील विमानतळाजवळ स्फोट

हुथीने रविवारी रात्री बिश, ताईफ, फरासान आणि यान्बू येथील नागरी आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करत ड्रोनचा मारा केला. यातील एक ड्रोन रियाधमधील विमानतळाजवळ कोसळल्याने विमानसेवा स्थगित करण्यात आली. तथापि सौदी अधिकाऱ्यांनी कोणतीही जीवितहानी किंवा नुकसान झाल्याचे सांगितले नाही. सोमवारी सकाळपासून परस्परांवर हल्ल्याची मालिका सुरूच असून, लाल समुद्राला लागून असलेल्या शहरांत तणाव वाढला आहे. ■

### सौदीला मदत करणारे देश आमचे लक्ष्य : बुखैती

हुथी नेते मोहम्मद अल बुखैती यांनी पुन्हा सोमवारी समाज माध्यमावर प्रसारित निवेदनात म्हटले की, सौदीला मदत करणारे देश आमचे लक्ष्य आहे. संघर्षात सौदीला मदत केल्यास विविध आघाड्यांवर संघर्ष सुरू करण्याची आमची तयारी आहे. मात्र, आम्ही अमेरिकन सैन्याला लक्ष्य करणार नाही.आज येमेन केवळ अंतर्गत संघर्षच नाही, तर आंतरराष्ट्रीय युद्ध लढण्यासही सक्षम आहे. ■

## दिल्लीत तीन शाळांना बॉम्बची धमकी

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीतील तीन शाळांना सोमवारी बॉम्ब ठेवल्याची धमकी मिळाली, त्यामुळे एकच खळबळ उडाली व प्रशासनाने शोधमोहीम सुरू केली आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. दिल्ली अग्निशमन सेवेनुसार, यामध्ये हौझ खास येथील मदर इंटरनॅशनल स्कूल, चाणक्यपुरी येथील नेव्ही चिल्ड्रन्स स्कूल व बाल भारती स्कूलचा समावेश आहे. शोधमोहीम सुरू असून, आतापर्यंत काहीही संशयास्पद आढळलेले नाही, असे अधिकाऱ्याने सांगितले. पुढील तपास सुरू आहे. ■

# पुतिन यांच्या पक्षाचा विजय

**युनायटेड रशियाला ५७.५४ टक्क्यांपेक्षा जास्त मते**

**मॉस्को, २१ सप्टेंबर**

रशियात तीन दिवस चाललेल्या संसदीय निवडणुकीनंतर रविवारी रात्रीपासून मतमोजणीला सुरुवात झाली. मतमोजणीत सत्ताधारी पक्ष, युनायटेड रशियाने ५७.५४ टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळवत विजय मिळवला. प्राथमिक निकालांच्या आधारे, राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवले आहे.

पुतिन यांचा पक्ष पुन्हा एकदा सत्तेवर कायम राहणार असल्याचे निकालातून स्पष्ट होत आहे. निवडणुकीत पक्षाच्या समर्थकांनी मोठ्या संख्येने मतदान केले. केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, पुतिन यांच्या युनायटेड रशिया पक्षाला ५७ टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळाली आहेत. अंतिम आकडेवारी जाहीर झाल्यावर मतांच्या टक्केवारीत बदल होऊ शकतो. मतदानात घोळ झाल्याचा आणि इलेक्ट्रॉनिक मतदानात समस्या आल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने रविवारी रात्री उशिरा निवेदनात म्हटले की, निवडणुकीचे प्राथमिक निकाल जाहीर झाले आहेत. सत्ताधारी पक्ष, युनायटेड रशियाला ५७.५४ टक्केपेक्षा जास्त मते मिळाली आहेत. ११.१ कोटी पात्र मतदारांसाठी शुक्रवारपासून मतदानास सुरुवात झाली. यामध्ये युक्रेनच्या चार प्रदेशांतील रहिवाशांचा समावेश होता. पक्षीय यादीनुसार वाटप केलेल्या २२५ खासदारांपैकी युनायटेड रशियाला सर्वाधिक मते मिळाली. विरोधी पक्षांना निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली होती आणि सोव्हिएत काळापासून रशियात स्वतंत्र आणि सुरक्षित वातावरणात निवडणूक पार पडली आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# पुरात बुडून सहा मुलांचा मृत्यू

**भागलपूर :** भागलपूर जिल्ह्यातील सुलतानगंज ब्लॉकच्या भिरखुड पंचायतीमधील तारेटा गावात सोमवारी पुराच्या पाण्यात बुडून सहा मुलांचा मृत्यू झाला. ही घटना एका गॅस गोदामाजवळ घडली. माहिती मिळताच, गावकरी घटनास्थळी धावून गेले आणि त्यांनी मुलांना वाचवण्याचा प्रयत्न केला.परंतु, त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही.घटनास्थळी दाखल गावकऱ्यांनी अथक प्रयत्नांनंतर सर्व सहा मुलांना पाण्यातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना सुलतानगंज रेफरल रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सर्व मुलांचे वय अंदाजे १० ते १५ वर्षांच्या दरम्यान आहे. ते जवळच्या विष्णू टोला आणि दुधाइलाचे रहिवासी आहेत. ■

## चित्रपट वार्ता

### आमिर खानने कमी केले वजन

**मुंबई :** वयाची साठी गाठल्यानंतर शरीराला अधिक विश्रांतीची गरज भासते, असा सर्वसाधारण समज आहे. मात्र, आमिर खानने १८ किलो वजन कमी करून पुन्हा एकदा लक्ष वेधून घेतले आहे. विशेष म्हणजे, कठीण वर्कआऊट किंवा वजन कमी करण्यासाठीच्या कठोर डाएटवर भर न देता त्याने आपल्या आहारासह झोप आणि दैनंदिन सवयींमध्ये बदल केल्याचे सांगितले जात आहे. आमिर खानला मायग्रेनचा त्रास होत असल्याने त्याच्या आहारातही बदल करण्यात आला. मायग्रेनपासून आराम मिळवण्यासाठी त्याने अँटी-इन्फ्लेमेटरी डाएटचा अवलंब केल्याची माहिती समोर आली आहे. या आहारपद्धतीमध्ये शरीरातील दाह किंवा अंतर्गत सूज कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करण्याबरोबरच काही पदार्थ टाळण्यावर भर दिला जातो. या बदलाचा परिणाम म्हणून आमिरचे वजनही कमी झाल्याचे सांगितले जाते. ■




### आजही स्वतःला माफ करू शकलो नाही : अनिल कपूर

**मुंबई :** दमदार अभिनयासोबतच फिटनेस आणि कुटुंबाशी असलेल्या घट्ट नात्यासाठी ओळखले जाणारे ज्येष्ठ अभिनेते अनिल कपूर यांनी आपल्या आयुष्यातील एका हळव्या प्रसंगाची आठवण नुकतीच सांगितली. मुलगी रिया कपूर हिच्या जन्मावेळी आपण रुग्णालयात वेळेवर पोहोचू शकलो नाही, याची खंत आजही त्यांच्या मनात असल्याचं त्यांनी सांगितले. त्या प्रसंगासाठी आपण स्वतःला अद्याप माफ करू शकलो नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अनिल कपूर सध्या 'इंडिया के टॉप-१ पर्सेंट' या क्विझ शोचे सूत्रसंचालन करत आहेत. १९ सप्टेंबर २०२६ पासून सुरू झालेल्या या कार्यक्रमातील एका स्पर्धकाशी संवाद साधताना त्यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्यातील हा अनुभव शेअर केला. करिअर आणि कामाच्या जबाबदाऱ्या महत्त्वाच्या असल्या तरी कुटुंबासाठी वेळ देणेही तितकंच आवश्यक आहे, हा धडा आपण आयुष्यातून शिकत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. ■

### जॉनी डेपने खरेदी केले संपूर्ण गाव

**वॉशिंग्टन :** हॉलिवूड अभिनेता जॉनी डेप पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. यावेळी त्याच्या कोणत्याही चित्रपटामुळे नव्हे, तर फ्रान्समधील त्याच्या खाजगी मालमत्तेमुळे त्याची चर्चा होत आहे. जॉनी डेपने २००१ मध्ये फ्रान्समधील सेंट ट्रोपेजजवळ तब्बल ३० एकरांवर पसरलेले एक संपूर्ण गाव खरेदी केले होते. प्रोव्हेन्शल शैलीतील या ठिकाणी जुन्या इमारती, निवासस्थाने, उद्याने आणि अनेक आलिशान सुविधा आहेत. त्यामुळे डेपची ही मालमत्ता सामान्य घर किंवा फार्महाऊस न राहता एका स्वतंत्र प्रकल्पासारखीच विकसित झाली आहे. सेंट ट्रोपेजपासून सुमारे १७ मैल अंतरावर असलेल्या या गावासाठी डेपने ५.५० कोटी अमेरिकन डॉलर मोजल्याचे एका वृत्तात नमूद करण्यात आले आहे. गाव खरेदी केल्यानंतर त्याच्या नूतनीकरणासाठी त्याने आणखी सुमारे एक कोटी अमेरिकन डॉलर खर्च केले. जुन्या इमारतींना नवा लूक देताना त्यांचे ऐतिहासिक स्वरूप आणि आकर्षण कायम ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला. ■



# सोमनाथ मंदिरावर बॉम्बहल्ल्याची धमकी

**अहमदाबाद, २१ सप्टेंबर**


गुजरातमधील सार्वजनिक आणि धार्मिक स्थळांवर बॉम्बहल्ल्याच्या धमकीमुळे संतापाची लाट उसळली आहे. एका अज्ञात व्यक्तीने पाठवलेल्या ईमेलमध्ये म्हटले आहे की, सोमनाथ मंदिर, मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, भाजपाचे केंद्रीय कार्यालय, खानपूरमधील भाजपा कार्यालयासह पोलिस आणि 'रॉ' एजन्सीला लक्ष्य करण्यात आले असून बॉम्ब ठेवण्यात आले आहेत.

आरोपीने पाकिस्तान-समर्थक घोषणा पोस्ट करून भीती पसरवण्याचा प्रयत्न केला तसेच पाकिस्तान आणि खलिस्तानच्या समर्थनातही घोषणा लिहिल्या होत्या. धमकी मिळाल्यानंतर, राज्यातील सर्व सुरक्षा यंत्रणा आणि पोलिस हाय अलर्टवर असून, सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. पंजाब पोलिसांना सर्वप्रथम धमकीचा ई-मेल प्राप्त झाला, अशी माहिती सूत्रांनी दिली.

या ई-मेलमध्ये गुजरातमधील अनेक महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य करण्याची धमकी देण्यात आली होती. ई-मेलमध्ये विशेषतः सोमनाथ मंदिराचा उल्लेख होता. या मंदिराला अगोदरच 'झेड-प्लस' सुरक्षा कवच असल्याने, सुरक्षा यंत्रणेची तिथे कडक व्यवस्था असते. यापूर्वीही मंदिराला धमकीचे ई-मेल प्राप्त झाले आहेत. मंदिराचा वारंवार उल्लेख झाल्यामुळे सुरक्षा आणि दक्षता वाढवण्यात आली आहे. ◂ (वृत्तसंस्था)



हुथी बंडखोरांनी येमेनमधील सना येथे रॅली काढत इस्लामचे पवित्र स्थळ मक्केला लक्ष्य केल्याचा सौदी अरबने केलेला आरोप फेटाळला. या वेळी रायफली आणि शस्त्रे हवेत उंचावताना बंडखोर



# पाण्याचाही 'डीएनए' ओळखणे आता शक्य

## शास्त्रज्ञांचे अनोखे संशोधन, जटिल गणितीय गणना करणारे तंत्रज्ञान शोधले

**लंडन, २१ सप्टेंबर**

शास्त्रज्ञांनी एका अत्यंत नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करून पाण्याच्या थेंबात किंवा टेस्ट ट्यूबमध्ये जटिल गणितीय गणना अर्थात आकडेमोड करू शकणारा डीएनए कॉम्प्युटर तयार केला आहे. यामुळे पाण्याचा डीएनए शोधणे शक्य होणार आहे. जगात विविध भागांतील पाणी वेगवेगळे असून, पाण्याची तपासणी करताच ते पाणी कोणत्या भागातील आहे, याची माहिती मिळणार आहे. आयर्लंडच्या मेनूथ विद्यापीठातील संशोधकांनी केलेल्या अभ्यासातून ही माहिती समोर आली.



पारंपरिक सिलिकॉन चिप्स आणि सततच्या विजेच्या पुरवठ्याशिवाय चालणारा हा एक 'प्रोग्रामेबल डीएनए कॉम्प्युटर' आहे. या कॉम्प्युटरमध्ये अब्जावधी डीएनए रेणूंचा वापर केला जात असून, इतर जैविक संगणकीय प्रणालींप्रमाणे गणना सुरू ठेवण्यासाठी पारंपरिक संगणकांप्रमाणे सतत ऊर्जेचा पुरवठा करण्याची आवश्यकता नसल्याची माहिती विद्यापीठाच्या संशोधकांनी वृत्तसंस्थेला दिली. यामध्ये डीएनएच्या स्टँड्सचा (ए, टी, सी, जी बेस जोड्या) वापर करून प्रक्रिया केली जाते. पाण्याच्या थेंबात आणि मिठाच्या द्रावणात हे डीएनए स्वतःहून एकत्र येतात आणि उष्णता दिल्यानंतर रासायनिक प्रक्रिया होऊन रेणू स्वतःहून सर्वात स्थिर संरचनेच्या दिशेने सरकतात, त्यामधून गणिताचे उत्तर बाहेर येते आणि पाण्याचा डीएनए शोधता येते. ◂ (वृत्तसंस्था)

### शरीराच्या पेशींचाही अभ्यास

डीएनए प्रणालीने १० वेगवेगळ्या अणू-रेणूंचे निरीक्षण केले. यामुळे भविष्यात शरीराच्या पेशींचा बारकाईने अभ्यास करणे शक्य होणार आहे. प्रयोगांमध्ये या प्रणालीच्या मदतीने ७०० हून अधिक गणना करण्यात आल्या. बेरीज, तीनने गुणाकार, दोनने भागाकार तसेच आठ-बिट पॅरिटी डिटेक्शन यांसारख्या गणनांचा त्यात समावेश होता. मात्र, मोठ्या गणनांना बराच वेळ लागला असून, सुमारे १.१ कोटी ते ३.४ कोटींच्या श्रेणीतील एका गणनेला तब्बल १४ तास लागले. ■

## शाळेत शिक्षिकेची गोळी झाडून हत्या

**लखीमपूर खेरी :** उत्तरप्रदेशातील लखीमपूर खेरी जिल्ह्यात शाहपुरा कोठी येथील चिल्ड्रन्स अकादमीमध्ये एका तरुणाने शिक्षिकेची गोळ्या झाडून हत्या केली.त्यानंतर त्याने आत्महत्या केली. दोघांचे प्रेमसंबंध होते असे म्हटले जात आहे.

या घटनेपूर्वी आरोपीने समाज माध्यमावर स्वतःच्या मृत्यूविषयी पोस्ट केली होती, असे समोर आले आहे. पोलिसांनुसार, शाहपुरा कोठी येथील चिल्ड्रन्स अकादमीमध्ये सोमवारी सकाळी गोळीबार झाला. आरोपी सौद अन्सारी वर्ग सुरू असताना शस्त्र घेऊन शाळेत घुसला. त्यावेळी शिक्षिका निशात फातिमा वर्गात मुलांना शिकवत होत्या. त्यांच्यात थोडा वेळ वाद झाला. त्यानंतर सौदने शिक्षिकेवर गोळी झाडन तिला ठार केले. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# राजनीतीवर टवाळांची टोळधाड!

सर्वसामान्य माणसे ज्याकडे राजनीती म्हणून पाहतात, त्यामधील नैतिकतेचा केव्हाच अस्त झाला असून राजकारणाची संस्कृतीदेखील आता लयास चालल्याने भविष्यात देशातील राजकारण कोणती वळणे घेणार याची चिंता करण्याची वेळ येऊ लागली आहे. एके काळी राजकारणाची संस्कृती जपली जात होती. विरोधाच्या राजकारणातही सभ्यतेची पातळी सांभाळली जात होती. त्यामुळेच, राजकारणाविषयी सर्वसामान्यांच्या मनात कुतूहल, उत्सुकता आणि आपुलकीदेखील होती. काळ बदलत चालला, तसतसा सामान्यांच्या मनातून राजकारणाविषयीचा आदर उतरत चालला आणि राजकारण किंवा राजकारण्यांकडे पाहण्याची दृष्टीदेखील बदलत गेली. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर किंवा सत्ताधाऱ्यांनी विरोधकांवर आरोप करणे, कुरघोडीचे राजकारण करणे ही राजकारणाची नीतीच असली तरीही त्या नीतीने आपल्या मर्यादा ओलांडल्या की रसातळाला कोणता थर गाठला जातो, याचे ताजे उदाहरण लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे सर्वेसर्वा राहुल गांधी यांनी त्यांच्या ताज्या विद्यार्थी संवाद कार्यक्रमातून देशासमोर उघड केले. गेल्या काही महिन्यांपासून 'जेन-झी'ची मने जिंकण्यासाठी आणि त्याद्वारे मतांची बेगमी करण्यासाठी राहुल गांधींच्या माध्यमातून 'छात्रों की गूंज' नावाचा कार्यक्रम काँग्रेसद्वारे राबविला जात आहे. या कार्यक्रमात गोळा केल्या जाणाऱ्या गर्दीला 'जेन-झी' वयोमर्यादेची अट असतेच असे नाही. त्यामुळे केवळ गर्दीसाठी जमविल्या जाणाऱ्या सरसकट जमावासमोर राहुल गांधी यांनी संवादाच्या नावाखाली जे काही विचार मांडले, त्याचा फारसा प्रभाव तरुणाईच्या मनावर पडलेला दिसत नाहीच, उलट त्यांच्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमांच्या मालिकेनंतरही काँग्रेसच्या सावलीतील विद्यार्थी संघटनांनाच नाकारण्याची मानसिकता जेन-झी मध्ये बळावत असल्याचे अलिकडेच पार पडलेल्या दिल्ली विद्यापीठातील निवडणुकांच्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे, राहुल गांधींना तरुणांसमोर आणून काँग्रेस मतांची बेगमी करते, की काँग्रेसपासून तरुणांनी दूर राहावे यासाठी आटापिटा करते, याचे उत्तर भविष्यात मिळणार आहे.

राजकीय विरोधाला विनोदाची फोडणी देणे ही लोकशाहीने दिलेली मोकळीक आहे की राजकारणातील गांभीर्याचा ऱ्हास आहे, हा प्रश्न मध्य प्रदेशातील इंदूर येथे राहुल गांधी यांच्या छात्रों की गूंज कार्यक्रमानंतर स्टँडअप कॉमेडियन पुलकित मणी याच्यासोबत झालेल्या 'हास्यजत्रे'मुळे ऐरणीवर आला आहे. एकमेकांचा अवमान आणि एखाद्याच्या पदाचा उपहास यांच्यामध्ये एक सूक्ष्म सीमारेषा असते. ती सीमारेषा पुसली गेली की राजकीय टीका अखेरीस तमाशाचा फड बनतो आणि व्यंगांची मर्यादा भंग होऊन ते केवळ स्वस्त विनोदाच्या पातळीवर उतरतात. इंदूरच्या राहुल गांधींच्या कार्यक्रमात नेमके हेच झाले, असा सत्ताधाऱ्यांचा आरोप आहे. ज्यांनी राहुल गांधी यांचा तो विनोदी कार्यक्रम पाहिला, प्रत्यक्ष अनुभवला, त्यांच्या मनातही याहून वेगळी भावना उमटली असेल असे नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लकबी, परदेशी नेत्यांसोबतच्या संवादाची शैली आणि काही शब्दांची खिल्ली यांचा आधार घेत इंदूरच्या कार्यक्रमात राहुल गांधी यांनी पुलकित होऊन सहभाग घेतला, तेव्हा लोकसभेतील विरोधी पक्षनेता या पदाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न निश्चितच ऐरणीवर आला असेल. याआधीही एका जाहीर कार्यक्रमात राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी आणि इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांच्या संदर्भात अत्यंत घृणास्पद विनोद करून टीका केली तेव्हा जनतेमधील नापसंतीचा सूर बहुधा काँग्रेसपर्यंत पोहोचला नसावा. तसे असते, तर पुन्हा तसाच पांचट विनोद करून विद्यार्थ्यांना हसविण्याचा पोरकट प्रयत्न करण्याचा सल्ला राहुल गांधींच्या सल्लागारांनी त्यांना दिला नसता. आजची जेन-झी पिढी प्रगल्भ आहे, या पिढीच्या मनात व्यवस्थेविषयी काही स्पष्ट भावना आहेत आणि त्यामध्ये बदल घडविण्याचे ठोस मार्गदेखील त्यांच्यासमोर आहेत. अशा प्रगल्भ पिढीविषयी असे तिसऱ्या दर्जाचे हलके विनोद सादर करून त्याद्वारे त्यांना आपलेसे करून घेण्याच्या प्रयत्नांत राजनीतीचे पतन आणि पक्षाच्या प्रतिमेवरील अविश्वासास हातभार लावण्यापलीकडे फारसे काही काँग्रेसच्या हाती लागण्याची शक्यता कमीच असतानाही, त्याच प्रकारांची पुनरावृत्ती करण्याचा अट्टहास ही विनाशकालातील विपरीत बुद्धी म्हणावी लागेल. काँग्रेसने राजनीतीची परंपरा जपली पाहिजे, त्या परंपरेला पोरकटपणाचा स्पर्श होऊ देऊ नये आणि सभ्यतेच्या मर्यादा सांभाळल्या पाहिजेत, अशी भावना असलेले अनेक निष्ठावंत काँग्रेसजन राहुल गांधींच्या या स्टँडअप कॉमेडीमुळे नाराज झालेले पाहावयास मिळतात. त्यांची भावना पक्षापर्यंत पोहोचेल किंवा नाही, याबाबत काहीच स्पष्टता नाही. तशी काही यंत्रणा काँग्रेसकडे असेलच असे दिसत नाही.

मुळात, राहुल गांधींच्या त्या वादग्रस्त मिमिक्रीचा वाद तेवढ्यापुरता मर्यादित नाही. राजकीय अभिव्यक्तीच्या बदलत्या संस्कृतीचा प्रश्न त्यामुळे ऐरणीवर आला आहे. राजकारणात विनोदास थारा नाही असे नाही. उलट सत्तेवर विनोद करणे हे राजकीय संस्कृतीच्या आणि लोकशाहीच्या आरोग्याचे लक्षण मानले जाते. व्यंग हा तर सत्तेला दाखविला जाणारा आरसा असतो. राजकारणातील व्यंगाची परंपरा फार प्रगल्भ आणि जुनी आहे. व्यंगचित्रकार, साहित्यिक, कवी, लेखक आणि विनोदी कलावंतांनी आपल्या उच्च दर्जाच्या विनोदातून राजकीय व्यंगावर बोट ठेवणारे सुसंस्कृत विचार मांडले आहेत. त्यामुळे, नव्या जमान्यातील मिमिक्री हा प्रकार राजकारणास निषिद्ध नसला, तरी व्यंगाचे सामर्थ्य त्याच्या साधनावर असते, याचा विसर पडणे योग्य नाही. केवळ एखाद्याची देहबोली, आवाज किंवा लकबीतून त्यास हिणविणे म्हणजे विनोद नाही. धोरणांवर, निर्णयांवर, सत्तेच्या कार्यपद्धतीवर किंवा सार्वजनिक भूमिकांवर विनोद वा व्यंगाच्या माध्यमातून प्रहार झाले, तर ते धारदार शस्त्राप्रमाणे प्रभावी ठरतात. मात्र, व्यक्तीची थट्टा हाच विनोदाचा गाभा असेल, तर त्यातून दिल्या जाणाऱ्या राजकीय संदेशाविषयी संदेह निर्माण होतात. गेल्या काही वर्षांत अशा प्रकारच्या थट्टेचे प्रकार वाढीस लागले असून त्यामध्ये काँग्रेसने आघाडीवर राहण्याचा आटापिटा चालविला असावा असे दिसते. सुमारे तीन वर्षांपूर्वी तत्कालीन उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांच्या देहबोलीची थट्टा करणारी मिमिक्री तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी संसद परिसरातच सादर केली, तेव्हा त्यास भरभरून दाद देणाऱ्या काँग्रेस नेत्यांना या नीतीचे अनुकरण करण्याची कल्पना सुचली असावी. एखादे वैचारिक बौद्धिक किंवा धोरणात्मक चर्चा ऐकण्यासाठी लोकांना फारसा रस नसतो, मात्र काही सेकंदांचा विनोदी व्हिडीओ वेगाने समाजमाध्यमांवर व्हायरल होतो आणि लाखो लोकांपर्यंत पोहोचतो. डिजिटल राजकारणाने या बदलामुळे विनोद, व्यंग आणि मीमसारख्या प्रकारांचा राजकारणातील प्रभाव वाढत चालला असला, तरी अशा विनोदास तरुणांकडून फारशी दाद मिळत नाही, असे गेल्या वर्षी झालेल्या एका सर्वेक्षणात स्पष्ट झाले होते. कारण आजच्या करमणुकीला किंवा मनोरंजनालादेखील माहितीचा आधार असावा लागतो, हे तरुणाईच्या मानसिकतेतून स्पष्ट झाले आहे. यामुळेच, केवळ 'एन्टरटेन्मेंट' किंवा करमणूक एवढेच आजच्या विनोदाचे अंग पुरेसे नाही. त्याला 'इन्फोटेन्मेंट' असे स्वरूप असले पाहिजे. म्हणजे, मनोरंजनास माहितीचा सज्जड आधार असावा अशी आजच्या माध्यमविश्वकडून तरुणाईची अपेक्षा आहे. राजकारणासमोरील हे एक मोठे आव्हान असताना, काँग्रेस मात्र राहुल गांधींच्या माध्यमातून तरुणाईच्या माथी केवळ मनोरंजन मारणार असेल, तर त्याचे राजकीय परिणाम त्यांना दिसतील यात शंका नाही. ■

## प्रासंगिक

# जल समन्वयासाठी भारताचे आवाहन

**सी. आर. पाटील**

इतर काही मोजक्या संसाधनांप्रमाणेच पाणीही आपल्याला परस्परांशी जोडते. नद्यांना प्रशासकीय सीमा समजत नाहीत, जलसाठ्यामुळे अनेक समुदायांचे भरण-पोषण होते आणि आज जो पाऊस पडतो, तो उद्या आपल्यासाठी पिण्याचे पाणी, सिंचनाचे स्त्रोत, भूजल पातळी किंवा नदीचा प्रवाह यापैकी काहीतरी एक बनतो. हीच नैसर्गिक जगरहाटी आपल्याला अत्यंत साधे मात्र महत्त्वाचे तत्त्व सांगते : पाणी हे एक सामायिक संसाधन असून ते सुरक्षित ठेवणे, ही आपल्या पुढच्या पिढ्यांसाठीची आपली सामूहिक जबाबदारी आहे. याच भावनेने, भारताने नवी दिल्लीत होणाऱ्या नवव्या आंतरराष्ट्रीय जल सप्ताहासाठी जगभरातील जल समुदायाला भारतात येण्याचे निमंत्रण दिले आहे. केंद्रीय जल शक्ती मंत्रालयाने २२ ते २६ सप्टेंबर २०२६ या काळात ही परिषद आयोजित केली असून त्याची संकल्पना 'हवामान बदलात टिकून राहू शकेल, असे जल व्यवस्थापन' अशी आहे. आज जेव्हा हवामान बदलामुळे जलचक्र अनिश्चित होत चालले आहे, अशावेळी ही संकल्पना अधिकच यथोचित ठरली आहे.

भारतीय आंतरराष्ट्रीय जल सप्ताह, ही केवळ एक परिषद नाही, तर, हा एक असा मंच आहे, जिथे सरकारे, तज्ज्ञ लोक, उद्योग क्षेत्र, समुदाय आणि आंतरराष्ट्रीय भागीदार एकत्र येऊन आपले अनुभव, तंत्रज्ञान आणि कल्पना यांचे आदानप्रदान करू शकतात आणि भविष्यासाठी एक भागीदारी निर्माण करू शकतात. तसेच, पाण्याविषयी अलिकडेच झालेल्या विभागीय परिषदेत मांडली गेलेली तत्त्वे आणि शिकवण पुढे घेऊन जाण्याचाही या परिषदेचा उद्देश असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या संकल्पनेनुसार, भारतीय राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी एकत्र येऊन, जल क्षेत्रातील आव्हानांवर चर्चा केली; त्यातून काय मार्ग काढता येईल, यावर चर्चा केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, जल जीवन अभियानांतर्गत, १५.९ कोटी ग्रामीण घरांपर्यंत नळाने पाणीपुरवठा सुरू केला आहे, २०१९ मध्ये हे प्रमाण केवळ ३.२३ कोटी एवढेच होते. जल जीवन मिशनच्या दुसऱ्या टप्प्यात (२.०) पाणी-पुरवठ्यासाठीच्या पायाभूत सुविधांचे रूपांतर, अवलंबून राहण्यासारख्या, सार्वजनिक सेवा वितरण प्रणालीमध्ये करण्यावर भर देण्यात आला आहे. ग्राम पंचायत, ग्रामीण पाणीपुरवठा आणि स्वच्छता समित्या यासाठी सक्षम करण्यात आल्या. 'जल सेवा आकलन' या अंतर्गत, ग्राम पंचायतीच्या नेतृत्वाखाली, डिजिटल पेयजल सेवाकार्याचे मूल्यमापन केले जाते. 'हर घर जल' गावांमध्ये पिण्याच्या पाणीपुरवठ्याची नियमितता, पुरेसेपणा, गुणवत्ता व शाश्वतता यांचे मूल्यांकन करण्यावर या उपक्रमाचा भर आहे. 'नमामि गंगे' अभियानाच्या माध्यमातून भारताने गंगा आणि तिच्या उपनद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. यामध्ये सांडपाणी व्यवस्थापनासाठी पायाभूत सुविधा उभारणे आणि प्रदूषण कमी करण्यासोबतच पर्यावरणीयदृष्ट्या पुनरुज्जीवन, जैवविविधतेचे संवर्धन आणि लोकसहभाग या मांडणीचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत ५२७ हून अधिक प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. पैकी ३६७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. या माध्यमातून दररोज ४,२६३ दशलक्ष लिटर सांडपाणी प्रक्रिया करण्याची क्षमता निर्माण झाली आहे.

स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण योजनेतूनही तितकाच महत्त्वाचा धडा मिळतो. ग्रामीण भागात १२ कोटींहून अधिक शौचालये बांधण्यात आली आहेत. हिमालयीन प्रदेशातील राज्यांच्या गरजा आणि कोरड्या प्रदेशातील गरजा वेगळ्या असतात. वाढत्या शहरांसमोरील आव्हाने आणि ग्रामीण समुदायांसमोरील आव्हानेही भिन्न असतात. ही विविधताच, आपली राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना भूजल पुनर्भरण, सिंचनाची कार्यक्षमता, पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेचे सामुदायिक व्यवस्थापन आणि सांडपाण्याचा पुनर्वापर याबाबतच्या अनुभवांचा समृद्ध स्त्रोत बनवते. जलसुरक्षेबाबत सर्वच प्रश्नांची उत्तरे कोणत्याही एका देशाकडे नाहीत आणि प्रत्येक देशाकडे योगदान देण्यासाठी तसेच इतरांकडून शिकण्यासाठी काही ना काही अनुभव आहे. त्यामुळे भारतीय आंतरराष्ट्रीय जल सप्ताह हा कोणावर उपाय लादण्याऐवजी भागीदारीच्या भावनेचे प्रतीक आहे.

जलसुरक्षा, अन्नसुरक्षा, सार्वजनिक आरोग्य, उपजीविका, पर्यावरणीय सुरक्षा आणि शाश्वत विकासाशी अविभाज्यपणे जोडलेली आहे. त्यामुळे भारतीय आंतरराष्ट्रीय जल सप्ताहात, नदीखोरे आणि जलसाठ्याचे व्यवस्थापन, सांडपाण्याचा पुनर्वापर, पाण्याचा कार्यक्षम वापर, हवामानाचा अंदाज वर्तविण्याची यंत्रणा, पूर्वसूचना प्रणाली आणि पर्यावरणीय प्रवाह यांसारख्या विविध विषयांवर चर्चा केली जाते. या सगळ्या परिवर्तनात, तंत्रज्ञान अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडणार आहे. तंत्रज्ञानाचा खरा उपयोग तेव्हाच होतो, जेव्हा सरकार, स्थानिक संस्था आणि समुदाय त्यामुळे, अधिक चांगले निर्णय घेण्यास सक्षम होतात. त्यामुळे या प्रक्रियेत क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारे तज्ज्ञ, स्टार्ट-अप्स आणि युवकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. जल जीवन मिशनच्या संस्थात्मक सुधारणांच्या अंतर्गत 'सुजलाम भारत' ही डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा व्यवस्था, माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर करून नियोजन, जलस्त्रोतांची शाश्वतता, कामगिरीचे निरीक्षण आणि नागरिककेंद्रित प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी कार्यरत आहे.

आव्हांनाची व्याप्ती जेवढी मोठी, तेवढा वित्तपुरवठा देखील असणे आवश्यक आहे. सार्वजनिक गुंतवणूक तर मूलभूत गोष्ट असेलच; मात्र, हवामान-बदलाशी सुसंगत अशा पायाभूत सुविधांची उभारणी, करण्यासाठी वित्तपुरवठ्याचे काही अभिनव मार्ग शोधावे लागतील, जबाबदार असा खाजगी सहभाग आणि भागीदारी, जी सार्वजनिक उद्दिष्ट मध्यवर्ती स्थानी ठेवून, स्त्रोत एकत्रित आणू शकेल, त्याची गरज आहे. त्याचवेळी, निर्मळ स्वच्छ नद्या, पाणथळ प्रदेश, जलसाठे आणि परिसंस्था हे देखील आपल्या जल विषयक पायाभूत सुविधांचाच एक भाग आहेत. हवामान बदलामुळे पर्जन्यमानातील अनिश्चितता वाढत असताना, अतिवृष्टी, दीर्घकाळ टिकणारा कोरडा कालावधी, पूरस्थिती आणि भूजलावरील वाढता ताण यांसारख्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी जलस्त्रोतांची शाश्वतता, अधिक सक्षम विज्ञान आणि हवामानाचा अंदाज, परिस्थितीनुसार बदल करता येणाऱ्या पायाभूत सुविधा, सक्षम संस्थात्मक व्यवस्था आणि जाणकार समुदाय आवश्यक आहेत. २२ ते २६ सप्टेंबरदरम्यान भारत मंडपम हे भारताच्या जलक्षेत्रातील अनुभव आणि जगभरातील जलविषयक ज्ञानाचे केंद्र बनेल. मोठ्या प्रमाणावर विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी करताना आम्ही जे शिकलो आहोत, ते अनुभव सामाईक करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत; तसेच इतरांचे अनुभव ऐकून त्यातून शिकण्यासही आम्ही उत्सुक आहोत. पुढील पिढ्यांसाठी पाण्याचा प्रत्येक थेंब सुरक्षित ठेवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केले पाहिजे आणि पंतप्रधानांनी दिलेल्या 'विकसित भारत@२०४७'च्या संकल्पपूर्तीसाठी आपले योगदान सुनिश्चित केले पाहिजे. ■


(लेखक केंद्रीय जल शक्ती मंत्री आहेत)

## वेध

**नितीन शिरसाट**

# शक्तिपीठ महामार्गाला विरोध कशासाठी?

शक्तिपीठ महामार्ग नागपूर-गोवा द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्र शासनाचा अत्यंत महत्त्वाकांक्षी राज्यातील सर्वात लांब प्रस्तावित हा महामार्ग विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या प्रदेशांना थेट गोव्याशी जोडणार आहे. रोजगार निर्मिती, दळणवळण सुविधा, औद्योगिक क्षेत्रांना जोडून शेतकऱ्यांची आर्थिक शक्ती वाढविणारा हा महामार्ग असल्याने मागास भागांच्या विकासाला गती मिळेल. कृषी समृद्धी केंद्रे, औद्योगिक पट्टे विकसित केले जातील, ज्यामुळे स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळेल. कृषी उत्पादनांची जलद वाहतूक होऊन महामार्गाने थेट गोव्याच्या बंदरांना जोडणार असल्याने कोकणातील प्रसिद्ध हापूस आंबा, काजू तसेच पश्चिम महाराष्ट्र मराठवाड्यातील शेतीमाल बाजारात पोहोचविणे शक्य होईल. या महामार्गासाठी महाराष्ट्र शासनाने भूसंपादनासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली असून ग्रामीण भागात बाजारमूल्याच्या चार पट आणि शहरी भागात दोन पट मोबदला दिला जाणार आहे. तथापि, यात सुपीक शेती जमीन जाणार असल्याने मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातील शेतकऱ्यांचा या प्रकल्पाला विरोध होत आहे. पर्यावरण क्षेत्रातील संवेदनशील गावांबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादन भरपाईसाठी शासनाने मार्गदर्शक नियमावली नुकतीच जाहीर केली आहे. त्यात बाधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देताना भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना कायदा आणि महाराष्ट्र महामार्ग अधिनियममधील लागू तरतुदींचा आधार घेतला जाणार आहे. २०१३ च्या कायद्यानुसार ग्रामीण भागातील भरपाई बाजारमूल्याच्या भावाप्रमाणे मिळणार असल्याचे सध्या तरी स्पष्ट झाले आहे.



शासनाच्या दृष्टिकोनातून शक्तिपीठ महामार्ग हा मोठ्या पायाभूत सुविधांच्या आराखड्याचा भाग आहे. सरकारचा युक्तिवाद असा आहे की, या मार्गामुळे राज्याच्या वाहतूक जाळ्याला बळ मिळेल, विविध प्रदेशांतील संपर्क वाढेल, गुंतवणुकीला चालना मिळेल आणि आर्थिक विकासाला वेग येईल. आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर टप्प्याटप्प्याने काम सुरू करण्याची भूमिका सरकारने मांडली. भूसंपादन, पर्यावरण व वनविषयक मंजुरी, वैधानिक परवानग्या निविदा प्रक्रिया समांतरपणे सुरू असल्याचेही सांगण्यात आले.

शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन संपादन करताना प्रथम संबंधित जमिनीचे बाजारमूल्य निश्चित केले जाणार आहे. प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी संबंधित जमिनीत प्रवेश करण्याची तरतूदही नियमांमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे शक्तिपीठ महामार्गासाठी जमीन जाणाऱ्या शेतकऱ्यांना प्रत्यक्षात किती मोबदला मिळणार, याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे. शेतकऱ्यांची मागणी आहे की, बागायती जमिनीऐवजी पडीक किंवा कमी सुपीक जमिनीचा वापर केला जावा. योग्य भरपाई जमिनीचा मोबदला चालू बाजारभावापेक्षा जास्त पटीने एकरकमी मिळावा; जेणेकरून शेतकरी पर्यायी जमीन किंवा उपजीविकेचे साधन शोधून ज्या शेतकऱ्यांची संपूर्ण जमीन-घर जात आहे, त्यांच्या कुटुंबातील किमान एका सदस्याला शासकीय नोकरी कायमस्वरूपी रोजगाराची हमी मिळावी. शेतकरी हितासाठी काय उपाययोजना करता येतील यासाठी संबंधित शेतकऱ्यांशी थेट संवाद प्रशासनाने साधला पाहिजे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाप्रमाणे याही प्रकल्पात शेतकऱ्यांना जमिनीचा चांगला परतावा आणि भागीदारी दिली पाहिजे. भुयारी मार्ग, सर्व्हिस रोडची सुविधा निर्माण करून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी तसेच शेतीमाल वाहून नेण्यासाठी पुरेशा प्रमाणात रस्ते दिले पाहिजेत; जेणेकरून महामार्गामुळे शेतीचे दोन तुकडे होणार नाहीत. विकास हा राज्यासाठी गरजेचा आहेच, परंतु तो करताना अन्नदात्यांचे नुकसान होणार नाही; त्यांना त्यांच्या हक्काचा योग्य मोबदला मिळेल हाच खऱ्या अर्थाने शेतकरी हिताचा विचार ठरेल. ■

९८८१७१७८२८

## आंतरराष्ट्रीय

# भारताच्या ऊर्जासुरक्षेची कसोटी

**प्रा. जयसिंग यादव**

अमेरिकेने रशियावर आर्थिक दबाव वाढविण्याच्या उद्देशाने 'लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अ‍ॅण्ड इराण अ‍ॅक्ट ऑफ २०२६' हा कायदा केला आहे. रशियाच्या ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रांवर निर्बंध अधिक कडक करण्याबरोबरच रशियन तेल आणि नैसर्गिक वायूची मोठ्या प्रमाणावर खरेदी करणाऱ्या देशांवर अतिरिक्त शुल्क लावण्याचे अधिकार या कायद्यामध्ये आहेत. या निर्णयाचे सर्वाधिक थेट परिणाम भारत आणि चीनसारख्या देशांवर होऊ शकतात. भारत सध्या रशियन कच्च्या तेलाचा जगातील प्रमुख आयातदार आहे. त्यामुळे अमेरिकेने शुल्काचा पर्याय प्रत्यक्षात वापरल्यास भारताच्या व्यापारावर आणि विशेषतः अमेरिकेला निर्यात करणाऱ्या उद्योगांवर परिणाम होण्याची शक्यता आहे; मात्र सध्याच्या स्थितीत 'भारतावर शंभर टक्के शुल्क लागू झाले' असे म्हणणे अचूक ठरणार नाही. कायदा असे शुल्क लावण्याचा अधिकार देतो. प्रत्यक्ष निर्णय अमेरिकी प्रशासनाकडून होणे बाकी आहे. याच ठिकाणी भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे, की देशाच्या १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. बदलत्या बाजारपेठेच्या परिस्थितीनुसार आणि विविध स्त्रोतांमधून ऊर्जा मिळवण्याच्या धोरणानुसार भारत आपली ऊर्जा गरज भागवत राहील, अशी भूमिका सरकारने मांडली आहे.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेचा मोठा हिस्सा आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्या, पुरवठा विस्कळीत झाला किंवा एखाद्या एका देशाकडून तेल घेण्यावर निर्बंध आले, तर त्याचा परिणाम थेट भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. पेट्रोल-डिझेलच्या किमतीपासून वाहतूक खर्चापर्यंत आणि उत्पादन खर्चापासून महागाईपर्यंत अनेक घटकांवर त्याचे पडसाद उमटतात. भारताने मध्यपूर्व, आफ्रिका, लॅटिन अमेरिका, युरेशिया आणि अमेरिकेसह विविध भागीदारांकडून ऊर्जा खरेदी करण्याचे धोरण कायम ठेवले आहे. म्हणूनच अमेरिकी दबावाला भारताने भावनिक प्रतिक्रिया देण्यापेक्षा आर्थिक आणि सामरिक गणितातून उत्तर देणे आवश्यक आहे. ऊर्जा पुरवठ्यासाठी कोणत्याही एका देशावर अवलंबून राहणे धोकादायक आहे; परंतु केवळ दबावाखाली स्वस्त आणि उपलब्ध ऊर्जा स्त्रोत सोडणेही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सहज पचणारे ठरणार नाही. अमेरिकेच्या नव्या कायद्यामागील उद्देशही समजून घ्यावा लागेल. मात्र रशियावर दबाव आणताना भारतासारख्या मोठ्या अर्थव्यवस्थेवर शुल्काचा दबाव आणण्याचे व्यापक परिणामही होऊ शकतात. भारत हा केवळ रशियाकडून तेल घेणारा देश नाही. तो अमेरिकेसाठी मोठी बाजारपेठ आणि महत्त्वाचा व्यापार भागीदारही आहे. त्यामुळे ऊर्जा व्यापार आणि द्विपक्षीय व्यापार याकडे एकाच चौकटीत पाहिल्यास प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होतो. अमेरिकेतील काही विश्लेषकांनीही अशा शुल्काच्या संभाव्य परिणामांबाबत चिंता व्यक्त केली आहे. गेल्या काही दशकांमध्ये संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार, इंडो-पॅसिफिक आणि चीनसंबंधी धोरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढले आहे. त्यामुळे एका मुद्यावर निर्माण झालेला तणाव संपूर्ण संबंधांवर परिणाम करणार नाही, यासाठी दोन्ही बाजूंना मुत्सद्देगिरीची गरज आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एच. आर. मॅकमास्टर यांनीही भारत-अमेरिका संबंधांच्या दीर्घकालीन महत्त्वावर भर देत, भारताने रशियाविरोधात भूमिका घेण्यासाठी किंवा ब्रिक्ससारख्या समूहांपासून दूर जाण्यासाठी दबाव आणणे टाळावे, असे मत व्यक्त केले आहे. भारतासाठी खरी अडचण 'अमेरिका की रशिया' अशी निवड करण्याची नाही. भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर आज अनेक केंद्रांशी एकाच वेळी संबंध ठेवण्याचे आव्हान आहे. रशियाशी संरक्षण आणि ऊर्जा संबंध आहेत. अमेरिकेशी तंत्रज्ञान, व्यापार आणि संरक्षण सहकार्य आहे. मध्यपूर्व भारतासाठी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, तर चीन हा मोठा व्यापारी आणि सामरिक घटक आहे. त्यामुळे कोणत्याही एका समीकरणाला सर्व काही समर्पित करणे भारताच्या हिताचे ठरणार नाही. या पृष्ठभूमीवर ऊर्जा स्त्रोतांचे विविधीकरण हा दीर्घकालीन उपाय आहे. भारताने मध्यपूर्वेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी रशियन तेलाचा वापर वाढवला. आता रशियावरील संभाव्य अमेरिकी दबावामुळे पुन्हा स्त्रोतांचे संतुलन साधावे लागेल. अमेरिकेकडून ऊर्जा आयात वाढवणे, मध्यपूर्वेतील पुरवठा सुरक्षित ठेवणे, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील पर्याय शोधणे आणि देशांतर्गत अक्षय ऊर्जा क्षमता वाढवणे या उपायांचा एकत्रित विचार आवश्यक आहे. यासोबतच देशाच्या तेल शुद्धीकरण क्षमतेचा आणि धोरणात्मक पेट्रोलियम साठ्याचा विस्तारही महत्त्वाचा ठरतो. कारण जागतिक बाजारात कोणत्याही कारणाने पुरवठा कमी झाला, तर कच्च्या तेलाची किंमत वाढते आणि त्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो.

एखाद्या राष्ट्राचे ऊर्जा सुरक्षा धोरण केवळ तेल कुठून खरेदी करायचे एवढ्यापुरते मर्यादित नसते, तर संकटाच्या काळात किती काळ पुरवठा सुरक्षित ठेवता येतो, याचाही प्रश्न आहे. नव्या कायद्याने अमेरिकी अध्यक्षांना मोठे अधिकार दिले असले, तरी त्यांचा प्रत्यक्ष वापर कोणत्या देशावर, किती प्रमाणात आणि कोणत्या अटींवर केला जाईल, हे पुढील निर्णयांवर अवलंबून आहे. त्यामुळे तातडीने निष्कर्ष काढण्यापेक्षा घटनाक्रमावर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. भारताने या परिस्थितीत दोन गोष्टी स्पष्टपणे साध्य करायला हव्यात. पहिली म्हणजे देशातील ग्राहक आणि उद्योगांना परवडणारी ऊर्जा उपलब्ध राहणे. दुसरी म्हणजे कोणत्याही बाह्य दबावामुळे भारताच्या व्यापक व्यापार आणि परराष्ट्र धोरणाच्या पर्यायांवर अनावश्यक मर्यादा येऊ नयेत. या दोन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणे सोपे नाही; पण हाच मुत्सद्देगिरीचा कस आहे. रशियन तेलाचा मुद्दा हा आता केवळ भारत-रशिया किंवा भारत-अमेरिका संबंधांचा विषय राहिलेला नाही. तो जागतिक ऊर्जाबाजार, युद्धाचे अर्थशास्त्र, निर्बंधांचे राजकारण आणि बदलत्या बहुध्रुवीय जगाचा भाग बनला आहे. अमेरिकेने रशियावर आर्थिक दबाव वाढवण्याचा मार्ग निवडला आहे. भारताला मात्र आपल्या ऊर्जा गरजा आणि राष्ट्रीय हित लक्षात घेऊन पुढची पावले उचलावी लागतील. भारताने या संकटाकडे एका देशाविरुद्ध दुसऱ्या देशाची निवड म्हणून पाहण्याऐवजी ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने आणखी एक इशारा म्हणून पाहिले पाहिजे. स्वस्त तेल मिळत असताना त्याचा लाभ घेणे आवश्यक होते; परंतु त्याच वेळी पर्यायी ऊर्जा स्त्रोत, अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहतूक, ऊर्जा कार्यक्षमता आणि धोरणात्मक साठे यांना वेग देणेही तितकेच आवश्यक आहे. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### आध्यात्मिक रूपक आणि त्यातील बोध

बुद्धी शुद्ध अर्थात आत्मज्ञान प्राप्त करणे शुभ विचारांना अडवू शकत नाही, बुद्धी स्वतःच्या अहंकारातून पहारेकऱ्याचे मूर्त रूप निर्माण करते. अहंकार चांगल्या विचारांना अडवतो आणि शुभ विचार अहंकाराचा नाश करतात. अशावेळी दूरदृष्टी, तीक्ष्ण नजर, वाईटाचा त्याग व चांगल्याचा स्वीकार करणारे हे सर्व फक्त गजमुखात असल्यामुळेच आणि बुद्धिमान माणसातच हे सर्व गुण असल्यामुळे श्री गणेशच बुद्धीची देवता ठरते, हे समजण्यासाठीची गणेशाला हत्तीचे शीर का? या आध्यात्मिक रूपकाची बोधकथा कथापुराणांमधून प्रबोधित झालेली आहे. श्री गणेश हे बुद्धी, विवेक, मूलाधार चक्र, ध्वनी व वैश्विक चेतनेचे अधिष्ठान आहेत. परा, पश्यन्ति, मध्यमा व वैखरी या चारही अवस्थांचे नियमन श्री गणेश करतात. मानवीय जाणीव ईश्वरी सत्ता यांचा दुवा म्हणजेच श्री गणेश आहेत. विवेकाला बाह्य सौंदर्याच्या दर्पाचा उपहास सहन होत नाही हे सांगण्यासाठी गणेशांनी चंद्राला शाप दिला हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. चंचल मनाने विवेकावर केलेले हास्य आणि त्याचे परिणाम याचाही विचार करणे गरजेचे आहे. संशय आणि चंचल तर्क हा मूषकच्या रूपाने प्रकट आहे. शुद्ध स्वरूपातील क्लोरोफिल म्हणजेच दूर्वा ज्या मज्जासंस्था व हिमोग्लोबीन वाढविण्याला मदत करतात. या सर्वांचा मनापासून अभ्यास केला तरच श्री गणेश म्हणजे कोण हे समजेल.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

■■

### अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे अवमानाची मोकळीक नव्हे!

भारतीय राज्यघटनेने देशातील नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य अधिकार दिलेले आहेत. या अधिकाराच्या माध्यमातून देशातील प्रत्येक नागरिकाला आपले मत, विचार, भावना व्यक्त करण्याचा अधिकार आहे. अन्याय-अत्याचाराविरुद्ध संविधानाच्या अधीन राहून न्याय मागण्याचाही अधिकार आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ इतरांचा अवमान करणे, इतरांच्या वैयक्तिक जीवनात ढवळाढवळ करणे, त्यांचे चारित्र्य हनन करणे, त्यांच्या वागण्याची टिंगल-टवाळकी करणे, त्यांच्यावर व्यंगात्मक बोलणे असे नाही, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे संविधानिक मूल्ये, मानवी मूल्ये, नैतिक मूल्ये, सामाजिक मूल्ये यांचे भान राखत सदरील व्यक्ती किंवा लोकप्रतिनिधींविषयी मान-सन्मान राखत आपले मत व्यक्त करणे होय. मात्र, आज या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे पदोपदी उल्लंघन होत आहे. कोणाचीही मानमर्यादा न राखता तसेच त्या व्यक्तीच्या घटनात्मक दर्जाचा मान न राखता, उच्चपदस्थ अधिकारी यांचाही मान न राखता त्यांचा अपमान कसा होईल?अभिव्यक्ती स्वातंत्र्य काय आहे हे आधी समजून घेणे व मगच बोलणे योग्य वाटते. अन्याय-अत्याचार दूर करण्यासाठी कायदेशीर मार्ग असताना या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरशब्दांनी वापर हा घटनात्मक गुन्हा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### आपत्काळासाठी आध्यात्मिक सिद्धता महत्त्वाची

इंडोनेशियामध्ये झालेला 'अनाक क्राकाटोआ' ज्वालामुखीचा भीषण उद्रेक हा पृथ्वीच्या पोटातील खदखद किती प्रलयकारी असू शकते, याची जाणीव करून देणारा आहे. या उद्रेकात जीवितहानी झाली नसली, तरी त्याचे अत्यंत भीषण आणि थरारक परिणाम झाले आहेत. या उद्रेकाचा आवाज इतका प्रचंड होता की, तो शेकडो किलोमीटर दूरपर्यंत ऐकू गेला.माणसाच्या चुकीच्या कृतींमुळे आणि वाईट विचारांमुळे वातावरणात 'रज-तम' म्हणजेच अशुद्धता वाढते; त्यामुळे निसर्गाचा समतोल बिघडतो. आज पर्यावरणाचा ऱ्हास, जलप्रदूषण, वायूप्रदूषण, जंगलतोड आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा अनिर्बंध वापर यांमुळे पृथ्वीसमोरील संकटे वाढत आहेत. त्यासाठी सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे, गोपालन करणे, पाणी, वीज आणि अन्न वाया न घालवणे, वृक्षांचे संवर्धन करणे, प्रदूषण टाळणे आदी कृतींद्वारे निसर्गाच्या संवर्धनासाठी योगदान देऊ शकतो. पाणी, वीज आणि अन्न वाया न घालवणे हीदेखील एक प्रकारची निसर्गसेवा किंवा साधनाच आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या कृतींमधूनही निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करता येते. निसर्गाच्या सूक्ष्म स्तरावरील शुद्धीसाठी भारतीय संस्कृतीत विविध आध्यात्मिक उपाय सांगितले आहेत. सनातन संस्थेच्या वतीनेही 'अग्निहोत्रा'सारख्या आध्यात्मिक उपायांविषयी प्रबोधन केले जाते. संकटे येण्याची वाट पाहण्यापेक्षा त्यांना सामोरे जाण्यासाठी मानसिक, शारीरिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्तरांवर सिद्ध असणे आवश्यक आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी निसर्गाच्या महाशक्तीपुढे आपले उपाय तोकडे पडतात. त्यामुळे पर्यावरण रक्षणाबाबत अधिक सजग राहणे ही काळाची खरी गरज आहे. भविष्यातील संकटांना सामोरे जाण्यासाठी बाह्य सिद्धतेसोबतच अंतर्मनाची सिद्धताही आवश्यक आहे. आपत्कालीन परिस्थितीत काय काळजी घ्यावी, कोणती पूर्वसिद्धता करावी आणि संकटाच्या काळात स्वतःचे, कुटुंबाचे आणि समाजाचे संरक्षण कसे करावे, याविषयी मार्गदर्शन करणारे सनातन संस्थेचे 'आपत्काळाची सिद्धता' हे पुस्तक महत्त्वपूर्ण ठरते. ■

**वर्षा आवदे**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### बंद घराचा फायदा घेत दागिने लांबवले; शेजाऱ्यांविरुद्ध गुन्हा

**बार्शी, दि. २१ सप्टेंबर-**

महालक्ष्मी दर्शनासाठी घर बंद करुन गेलेल्या महिलेच्या घरातील कपाटातून सुमारे ७४ हजार १७३ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची घटना अलिपूर रोड परिसरात घडली. याप्रकरणी शेजारी राहणाऱ्या संशयिताविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अलिपूर रोड मोहिते पीठाच्या गिरणीजवळ राहणाऱ्या सुप्रिया अभिजित तुरपे या १८ सप्टेंबरला सायंकाळच्या सुमारास आपल्या घराला कडी लावून खाली राहणाऱ्या घरमालकीण सुरवसे यांच्याकडे महालक्ष्मीच्या दर्शनासाठी गेल्या होत्या. दर्शन घेऊन त्या परत येत असताना, त्यांच्या शेजारील अंकुश काकडे हा त्यांच्या बंगल्याचे गेट उघडून घाईघाईत बाहेर पडताना दिसून आला. त्यानंतर सुप्रिया तुरपे यांनी घरात जाऊन पाहिले असता, कपाटाचे एक दार उघडे असल्याचे आणि लोखंडी दरवाजाबाहेर त्यांची पर्स उघडी असल्याचे आढळले. पर्सची पाहणी केली असता, त्यात ठेवलेले ४.७७० ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील रिंग आणि ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा ७४ हजार १७३ रुपयांचा ऐवज गायब असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी सुप्रिया तुरपे यांच्या तक्रारीवरुन बार्शी शहर पोलीस ठाण्यात संशयित अंकुश काकडे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

### देणगी पैशाच्या वादातून मंदिरासमोर मारहाण

**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

मंदिरातील देणगीच्या पैशाच्या वादातून लोखंडी रॉड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत मंदिराचा पुजारी जखमी झाला. ही घटना अक्कलकोट तालुक्यातील रुद्धेवाडी येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. भूताळी अमोग पुजारी (वय ५०, रा.अक्कलकोट) असे जखमी पुजाऱ्याचे नाव आहे. रविवारी सकाळच्या सुमारास त्यांना पैशाच्या वादातून अजित अमोगी पुजारी आणि नागनाथ भुताळी पुजारी आदींनी लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली . त्यामुळे त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### शेतकऱ्याची झाडाला गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

अज्ञात कारणावरून ५३ वर्षीय शेतकऱ्याने स्वतःच्या शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना विजापूर रोडवरील सोरेगाव येथे सोमवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. धानप्पा विरप्पा म्हेत्रे (वय ५३ रा. सोरेगाव) असे मयताचे नाव आहे. आज सोमवारी सकाळच्या सुमारास त्यांचा मृतदेह सोरेगाव येथील कुंभार हॉस्पिटलच्या मागे असलेल्या त्याच्या स्वतःच्या शेतातील लिंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला होता. फासातून सोडवून शिवप्पा (भाऊ) यांनी त्यांना येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

# घर मालकीणचा विनयभंग; नोकरास ३ वर्षे सक्तमजुरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

घर मालकीणचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपी राजू हनुमंत भंडारे यास न्यायालयाने विविध कलमांखाली दोषी ठरवत ३ वर्षांपर्यंतची सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा आज रोजी सुनावली आहे. राजू हनुमंत भंडारे (वय ४७ वर्षे, रा. बापुजी नगर, सोलापूर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.

गुन्ह्याची थोडक्यात पार्श्वभूमी -यातील आरोपी हा फिर्यादी महिला (वय ४० वर्षे, रा. बापुजी नगर, सोलापूर) यांच्या घरी मागील ४ वर्षांपासून घरगडी (नोकर) म्हणून काम करत होता. दिनांक २६/०८/२०२५ रोजी दुपारी सुमारे १:३० ते १:५० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी स्वयंपाकघरात असताना आरोपीने त्यांच्याशी अश्लील संभाषण करून विनयभंग केला होता.याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. न्यायालयात सादर करण्यात आलेले पुरावे व साक्षीदारांची साक्ष ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीस खालीलप्रमाणे शिक्षा सुनावली आहे:

सदर गुन्ह्याचा तपास सपोनि सारिका जगताप यांनी करून दोषारोप पत्र कोर्टात सादर केले. तसेच सदर प्रकरणात सरकारी पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदिपसिंग राजपूत यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. कोर्ट पैरवी म्हणून महिला पोलीस हवालदार नदाफ यांनी काम पाहिले व दोषसिद्धी कक्षाकडील सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेश डाकेवाड, महिला पोलीस हवालदार मैदाड व बेटकर यांनी कामकाज पाहिले.

## आत्मविशुद्धीचा महामार्ग: उत्तम तप




जैन धर्मातील दशलक्षण पर्व हा केवळ कर्मकांडांचा सण नसून आत्म परीक्षण आणि आत्मशुद्धीचा महाउत्सव आहे. या पर्वातील अत्यंत महत्त्वपूर्ण आणि आचरणास कठीण मानला जाणारा धर्म म्हणजेच उत्तम तप धर्म. तप म्हणजे केवळ शरीराला क्लेश देणे किंवा उपाशी राहणे नव्हे, तर मनातील वासना, इच्छा आणि विकारांवर विजय मिळवून आत्म्याला शुद्ध करणे होय. तप धर्माचे महत्त्व सांगताना संस्कृतमध्ये असे म्हटले आहे: इच्छा निरोधः तपः। अर्थात: मनातील अनंत इच्छा आणि वासनांचा निरोध (नियंत्रण) करणे म्हणजेच खरे तप होय. तसेच, तपाच्या प्रभावाने कर्मांचा कसा क्षय होतो, याचे वर्णन करताना ग्रंथांमध्ये म्हटले आहे तपसा निर्जरा च। अर्थात: तपाच्या माध्यमातूनच आत्म्याला चिकटलेल्या पूर्वकर्मांची निर्जरा (विनाश) होते आणि आत्मा पवित्र बनतो. तपाचे दोन मुख्य प्रकार आहेत. बाह्य तप: यामध्ये उपवास, उनोदर (भुकेपेक्षा कमी जेवणे), रसपरित्याग (गोड, तिखट इत्यादी जिभेच्या चवींचा त्याग करणे) आणि कायक्लेश यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो. हे तप शरीराला शिस्त लावण्यासाठी उपयुक्त ठरते. अंतरंग तप: यामध्ये प्रायश्चित्त, विनय, वैयावृत्य (सेवा भाव), स्वाध्याय (सद्ग्रंथांचे वाचन), व्युत्सर्ग (मम त्वाचा त्याग) आणि ध्यान यांचा समावेश होतो. बाह्य तपापेक्षा अंतरंग तप अधिक श्रेष्ठ मानले गेले आहे, कारण ते थेट मनावर आणि विचारांवर संस्कार करते. आजच्या उपभोगवादी युगात माणसाच्या गरजा आणि इच्छा अनिर्बंध वाढल्या आहेत. भौतिक सुखाच्या मागे धावताना माणसाचे मानसिक आरोग्य आणि शांतता ढासळत आहे. अशा वेळी उत्तम तप धर्म आपल्याला संयम आणि समाधानाचा मार्ग दाखवतो. जिभेवर ताबा: आहारावर नियंत्रण ठेवल्याने आरोग्य उत्तम राहते. इच्छांवर नियंत्रण: अमर्याद उपभोग वृत्तीला आळा घातल्याने मानसिक शांतता लाभते. डिजिटल डिटॉक्स: आजच्या काळात सततच्या स्क्रीन आणि सोशल मीडियाच्या वापरावर नियंत्रण ठेवणे हेदेखील एक आधुनिक अंतरंग तपच आहे. तप ही एक अशी अग्नी आहे, ज्यामध्ये विचार आणि भाव जळून शुद्ध होतात आणि आत्मा सुवर्णासारखा उजळून निघतो. जेव्हा आपण आपल्या इच्छांवर विजय मिळवतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने उत्तम तप धर्माचे पालन होते. या दशलक्षण पर्वात आपण सर्वांनी केवळ शारीरिक उपासापुरते मर्यादित न राहता, मनातील क्रोधादी विकारांचा त्याग करून अंतरंग तपाची साधना करूया आणि आपले जीवन सन्मार्गावर नेऊया.

**-प्रा.अजित देवसाळे, सोलापूर.**
**९८५००९२९७५**

# मंगळवेढा तालुक्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करावा : काँग्रेसचे धरणे आंदोलन सुरु

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २१ सप्टेंबर-**



मंगळवेढा तालुक्यात पावसाची सर्वच नक्षत्रे जवळपास कोरडी गेल्याने पाणी टंचाई, चारा टंचाई, मजूरांच्या हाताला काम नसणे आदी प्रश्न गंभीर बनले असून शासनाने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करुन विविध उपाययोजना कराव्यात या मागणीसाठी सोमवार दि.२१ रोजी मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने येथील तहसिल कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले आहे.

मंगळवेढा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रशांत साळे, ॲड.रविकिरण कोळेकर,ॲड.राहुल घुले, शेखर पाटील यांच्यासह अन्य काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते, शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते.

जून महिन्यापासून मंगळवेढा तालुक्यात पावसाचा पत्ताच नसल्यामुळे सर्वत्र दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकेही जळून जमिनदोस्त झाली आहेत. तसेच शेतकरी यामुळे मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

---


**नगर पंचायत कार्यालय, शिरुर अनंतपाळ, जि. लातूर**

जा.क्र.२०२६/नपंशिअ/पा.पु.वि.-५३६ दिनांक : २१/०९/२०२६

**दरपत्रक सुचना सन २०२६-२७**

मुख्याधिकारी, नगर पंचायत शिरुर अनंतपाळ, जि. लातूर यांच्यावतीने अनुभवी तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या सक्षम शासकीय निमशासकीय खात्यातील तत्सम कामाचा अनुभव असलेल्या कंत्राटदार/एजन्सीकडून न.प.निधी, १५ वित्त आयोग व इतर निधी अंतर्गत पाणीपुरवठा विभागास ब्लिचिंग पावडर व तुरटी पुरवठा करणे करिता दि. २२/०९/२०२६ पासून दि. २९/०९/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत ऑफलाईन पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर कामाच्या अटी व शर्ती नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी,
नगर पंचायत शिरुर अनंतपाळ



**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि. अर्ज नं. ५६/२०२६
नि. ५

**बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. साहेब यांचे कोर्टात**

१) **श्रीमती श्रध्दा अक्षय गुळवे**
वय - २८ वर्षे धंदा - घरकाम,
रा. येडाई विहीर, परदेशी प्लॉट, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापूर
(अ.पा.क आई म्हणून अर्जदार नं. २ व ३ साठी)
२) **श्रेया अक्षय गुळवे,**
वय - १० वर्षे धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **स्वरा अक्षय गुळवे,**
वय - ०८ वर्षे धंदा - शिक्षण, रा. सदर
४) **हनुमान त्रिंबक गुळवे,**
वय - ६१ वर्षे धंदा - शेती, रा. सदर
५) **कल्पना हनुमंत उर्फ हनुमान गुळवे,**
वय - ५७ वर्षे धंदा - घरकाम, रा. सदर — **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ चे वडील तसेच अर्जदार नं. ४ व ५ चा मुलगा अक्षय हनुमंत गुळवे हे ता. १८/०६/२०२६ रोजी येडाई विहीर प्लॉट बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. मयत अक्षय हनुमंत गुळवे यांचे पश्चात त्यांचे वारस प्रमाणपत्र अर्जदारांकडे असावे तसेच त्यांना त्यांच्या मृत्युनंतर शासकीय कामासाठी सोयीचे व्हावे याकरीता अर्जदार यांना मयत अक्षय हनुमंत गुळवे यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच अर्जदारांशीवाय मयतास अन्य कोणीही वारस नसल्याने त्यांना त्याबाबतचा वारस दाखला मिळणे साठी यातील अर्जदार यांनी या मे.कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमुद अर्जदार यांचे शिवाय मयत अक्षय हनुमंत गुळवे यांचेबाबत इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. २३/१०/२०२६ रोजी या कामी मे.कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिंशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचीही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदार यांना मयत अक्षय हनुमंत गुळवे यांचे वारस असलेबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता. २१/०९/२०२६

सही/- क. लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी



**अपर तहसिल कार्यालय, नळदुर्ग**
**ता. तुळजापूर, जि. धाराशीव**
Email id:- apartahsilnaldurg@gmail.com

जा.क्र.२०२६/महसुल/जन्म-मृत्यू/कावि- दिनांक ०९/०९/२०२६

**जाहिरनामा**

**जन्म-मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२५ मधील कलम ११ अन्वये व सुधारित शासन निर्णय महाराष्ट्र शासन निर्णय क्र. सार्वजनिक आरोग्य विभाग - जमृनो-२०२५ ईआ-९९११८१/प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२/०३/२०२५ अन्वये.

सर्व जनतेस मौजे सराटी, ता. तुळजापूर यांनी जाहिर केले जाते की. अर्जदार श्री. ओमकार मल्लिनाथ चिकणे, रा. सराटी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांनी त्यांचे नाते आजोबा नामे कै. रामचंद्र सिद्रमाप्पा चिकणे मृत्यू दिनांक १४/०५/२०२१ रोजी मौजे सराटी, ता. तुळजापूर येथे झाला असून अर्जदारास सदरहु मृत्यूची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करित सदरहु अर्जदार यांचे कायदेशीर मृत्यूचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून १५ दिवसांच्या आत त्यांनी या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरच असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागतीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे मृत्यूची नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ०९/०९/२०२६

सही/-
(प्रमोद गायकवाड)
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी
अपर तहसील कार्यालय, नळदुर्ग



**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी की.अ.नं. ५१/२०२६
नि. ६

**बार्शी येथील मे. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात**

**शर्मिला विजय पालके व ४** - **अर्जदार**

विरुध्द

**कोणी नाही** - **सामनेवाले**

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी, अर्जदार या मयत विजय साहेबराव पालके यांची कायदेशीर पत्नी शर्मिला विजय पालके हे असून, मयत विजय साहेबराव पालके यांचे दि. ११/११/२०२१ रोजी निधन झाले आहे. अर्जदार सर्व संबंधित व्यक्ती, नातेवाईक, हितसंबंधी व सर्वसामान्य जनतेस याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील अर्जदारांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ चे कलम ३७२ अन्वये मयत श्री. विजय साहेबराव पालके, रा. ३८११/५७, दत्त नगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर, यांचे दिनांक ११/११/२०२१ रोजी निधन झाल्यानंतर त्यांच्या नावावरील Family Pension, Mutual Funds, Provident Fund (PF), Gratuity, इतर सेवा लाभ व आर्थिक देयके याबाबत अर्जदारांच्या संयुक्त नावे उत्तराधिकार प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळण्यासाठी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी, सदर मयत विजय साहेबराव पालके यांना अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणताही कायदेशीर वारस असल्यास अथवा कोणाचा वारस हक्क, हितसंबंध किंवा हरकत असल्यास, त्यांनी ही जाहीर प्रसिध्दीकरण झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. सि.ज.जु.डि. बार्शी यांच्या न्यायालयात लेखी म्हणणे / हरकत दाखल करावी.

अन्यथा, कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वारसाचा दाखला देण्याबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. ता. २१ /०९/ २०२६

सही/- लिपिक | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा. अधीक्षक



**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि.कि. अर्ज क्र. २४/२०२६.
पुढील नेमलेली तारीख :- ०७/१०/२०२६
निशाण क्र. ६

**बार्शी येथील मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश साहेब, यांचे न्यायालयात**
**(कोर्ट - आर.एस. रोटे सो.)**

१) **सौ. पुष्पांजली कृष्णा अनपट - विवाहानंतरचे नांव**
**पुष्पावती विठ्ठल रानमाळ - विवाहापुर्वीचे नाव,**
वय - ४५ वर्षे, धंदा - शेती व गृहिणी,
रा. बेंबळे, ता. माढा, जि. सोलापूर
२) **सौ. स्वाती संतोष जाधव - विवाहानंतरचे नाव**
**चमेली विठ्ठल रानमाळ - विवाहापुर्वीचे नाव,**
वय - ४१ वर्षे, धंदा - शेती व गृहिणी,
रा. भोईजे, ता. माढा, जि. सोलापूर.
३) **सौ. प्रेमा बळीराम जाधव - विवाहानंतरचे नाव**
**प्रेमा विठ्ठल रानमाळ - विवाहापुर्वीचे नाव,**
वय - ३९ वर्षे, धंदा - शेती व गृहिणी,
रा. जळोली, ता. पंढरपुर, जि. सोलापूर
**प्रस्तावित पालक अ.पा.क. भाऊ**
**कु. महेश्वर उर्फ महेश विठ्ठल रानमाळ,**
वय - १५ वर्षे, धंदा - शिक्षण
रा. शेवरे, ता. माढा, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन** - **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार क्र. १ ते ३ या अज्ञान महेश्वर उर्फ महेश विठ्ठल रानमाळ याच्या विवाहीत सख्ख्या बहिणी असून, त्यांचे वडील विठ्ठल नरहरी रानमाळ दि. ०१/०८/२०२५ रोजी व आई शकुंतला विठ्ठल रानमाळ या दि. १४/११/२०२४ रोजी मौजे - शेवरे, ता. माढा येथे मयत झालेले आहेत व त्यांना विवाहीत मुली अर्जदार क्र. १ ते ३ व अज्ञान मुलगा महेश्वर उर्फ महेश यांच्याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. तसेच अर्जदारांचे वडीलांचे नावे मौजे - शेवरे येथे घरजागा ग्रामपंचायत मालमत्ता नं. २२१, शेतजमीन गट क्र. १४/१/ब, १४२/२/अ व आई शकुंतला विठ्ठल रानमाळ यांच्या नावे मौजे शेवरे, ता. माढा येथील शेतजमीनी गट क्र. १४/१/अ/४, गट क्र. १४/१/क, गट क्र. १४२/२/ब, १४२/३/ब स्थावर मिळकती आहेत. तसेच अज्ञान महेश उर्फ महेश्वर विठ्ठल रानमाळ याचे व मयत शकुंतला यांचे नावे एकत्रीत मौजे - शेवरे, ता. माढा येथील गट क्र. १४२/२/ब असून, मयत विठ्ठल नरहरी रानमाळ व मयत शकुंतला विठ्ठल रानमाळ यांचे भारतीय स्टेट बँक, शाखा- टेंभुर्णी येथे संयुक्त खाते असून, त्यामध्ये रक्कम रु. १०,५०,१४९/- एवढी रक्कम असून, त्यांचे संयुक्त व विभक्त असे सोलापूर डी.डी.सी. बँक, माढेश्वरी अर्बन डेव्हलपमेंट को. ऑप. बँक लि., माढा, जयवंत मल्टिस्टेट क्रेडीट को. ऑप. सोसायटी लि., विदर्भ कोकण ग्रामीण बँक येथे खाते असून, सदर खात्यामध्ये त्यांचे नावे रक्कम जमा आहे. अज्ञान महेश उर्फ महेश्वर विठ्ठल रानमाळ याचा मयत आई-वडीलांचे शेतजमीन व बँक खातेतील रक्कमांमध्ये अविभक्त १/४ हिस्सा आहे व तो त्याचे नावे असणाऱ्या वर नमुद शेत मिळकतींची देखभाल करण्यास व बँक खात्यातील रक्कमेचे व्यवहार करण्यास अज्ञान असल्याकारणाने असमर्थ असल्याने अर्जदार क्र. ३ हे अज्ञान महेश्वर उर्फ महेश विठ्ठल रानमाळ याचे व त्याचे नावे असलेल्या सर्व स्थावर व जंगम मालमत्तेचे कायदेशीर पालक असल्याचे जाहीर होऊन मिळणेकरीता वा कायदेशीर पालक म्हणुन नियुक्ती होऊन मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाची कसलीही हरकत, तक्रार असल्यास त्यांनी सदर प्रकरणात प्रसिध्दीपासून ३० दिवसांच्या आत किंवा पुढील नेमलेल्या दि. ०७/१०/२०२६ या तारखेस न्यायालयात हजर राहुन कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची कसलीही हरकत नाही असे समजुन सदर प्रकरणी न्यायालय पुढील योग्य ते निर्णय पारीत करतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. २१/०९/२०२६.

सही/- कनिष्ठ लिपीक, जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी | कोर्टाचा शिक्का | सही/- सहाय्यक अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी



**अुत्तम सेवा — मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ — नोकरीच्या शोधात**

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB | | | |
| १ | नर्सिंग सुपरिटेंडेंट (३६५ पदे) | GNM किंवा B.Sc (नर्सिंग) उत्तीर्ण | ४० पर्यंत | १४/१०/२६ |
| २ | फार्मासिस्ट (११८ पदे) | पदवी (फार्मसी) उत्तीर्ण असावे | ३५ पर्यंत | |
| ३ | लॅब असिस्टंट (३१ पदे) | बारावी व DMLT उत्तीर्ण असावे | ३३ पर्यंत | |
| ४ | एक्स-रे टेक्नि. (२५ पदे) | बारावी व संबंधित डिप्लोमा उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| २) | स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC | | | |
| १ | कनिष्ठ लिपीक/ डेटा एंट्री ऑपरेटर (२५३९ पदे) | बारावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २७ पर्यंत | ०७/१०/२६ |
| ३) | युनायटेड इंडिय इन्शुरन्स कं.लि. | | | |
| १ | ॲडमिन ऑफिसर (२०० पदे) | पदवी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | ३० पर्यंत | २८/०९/२६ |
| ४) | स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC | | | |
| १ | उपनिरीक्षक पुरुष (२०५ पदे) | पदवी व LMV वाहन परवाना | २५ पर्यंत | ३०/०९/२६ |
| २ | उपनिरीक्षक महिला (११२ पदे) | पदवीधर स्त्री उमेदवार असावे | २५ पर्यंत | |
| ३ | उपनिरीक्षक GD (१३२० पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | २५ पर्यंत | |
| ४ | उपनिरीक्षक फायर (२३४ पदे) | B.Sc किंवा डिप्लोमा इंजिनियरींग | ३० पर्यंत | |

**✲ मोफत सरकारी अपडेट ✲**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्ॲप करावा.**

**सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.**
**२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)**
**३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा.४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.**

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिध्देश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. — www.uttamseva.org



**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर**

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

ज्याअर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर. प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदरची नोटिसीत नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटिसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

ताबा सूचना
सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१ परिशिष्ट IV प्रमाणे

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| १ | कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता | १) बसवेश्वर विश्वनाथ पाटील प्रोपः बसवेश्वर विश्वनाथ पाटील (कर्जदार) राः २३, ऋषिकेश नगर, दहिटणे, हैदराबाद रोड, सोलापूर ४१३००६<br>२) शुभांगी बसवेश्वर पाटील (जामीनदार) राः २३, ऋषिकेश नगर, दहिटणे, हैदराबाद रोड, सोलापूर ४१३००६<br>३) अथर्व बसवेश्वर पाटील (जामीनदार) राः २३, ऋषिकेश नगर, दहिटणे, हैदराबाद रोड, सोलापूर ४१३००६ |
| | कर्ज खाते क्र. | ००४००३२०२००००००२ |
| | थकीत कर्ज रक्कम | एकूण रक्कम रुपये ८३,८९,२५७.३३ (रु. त्र्याऐंशी लाख एकोणनव्वद हजार दोनशे सत्तावन्न रुपये तेहतीस पैसे) अधिक दि. ०१/०७/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च |
| | मागणी नोटीस दिनांक | ०३/०७/२०२६ |
| | प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक | १९/०९/२०२६ |
| | तारण मालमत्ता तपशील | डी. व सब डी. सोलापूर, ता. उत्तर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिका हद्दीतील मौजे दहिटणे येथील ऋषिकेश नगर सह. गृहनिर्माण संस्था येथील सर्व्हे नं. ३२/अ/२ व ३३/२ पैकी प्लॉट नं. १६ याचे क्षेत्र १७७.६६ चौ. मी. व प्लॉट नं. २३ याचे क्षेत्र १९७.९८ चौ. मी., यापैकी प्लॉट नं. १६ या मिळकतीचे चतुःसिमा :- पूर्वेस - संस्थेचा सार्वजनिक रस्ता, पश्चिमेस - शासकीय ४० फुटी रस्ता, उत्तरेस - २० फुट रस्ता, दक्षिणेस - ओपन प्लॉट, तसेच प्लॉट नं. २३ या मिळकतीचे चतुःसिमा :- पूर्वेस - १२ मीटर रुंद रस्ता, पश्चिमेस - सर्व्हे नं. ३३ पैकी जागा, उत्तरेस - प्लॉट नं. २२, दक्षिणेस - प्लॉट नं. २४ या दोन्ही प्लॉटजागा व त्यावरील बांधकामासहित. |

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पुवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को. ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

दिनांक : १९/०९/२०२६
स्थळ : सोलापूर

सील

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर





## महत्त्वाचे

### बॅडमिंटन : पुरुष, महिला संघ उपांत्यपूर्व फेरीत

**इचिनोमिया :** भारतीय पुरुष बॅडमिंटन संघाने सोमवारी येथे बांगलादेशला ३-० ने हरवून आशियाड क्रीडा स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. लक्ष्य सेन, आयुष शेट्टी आणि किदाम्बी श्रीकांत या त्रिकुटाने वर्चस्वपूर्ण कामगिरी करत एकही गेम गमावला नाही आणि मंगळवारी यजमान जपानशी सामना निश्चित केला. महिलांचा संघही उपांत्यपूर्व फेरीत जपानविरुद्ध खेळणार आहे. सोमवारी लक्ष्य सेनने इब्न अयमान जमनविरुद्ध मैदानात उतरणारा पहिला खेळाडू ठरला व त्याने अर्ध्या तासापेक्षा कमी वेळात २१-४, २१-१२ असा विजय मिळविला, ज्यामुळे भारतासाठी सामन्याची दिशा निश्चित झाली. त्यानंतर आयुष शेट्टीचा सामना गौरव सिंगशी झाला व त्यानेही २५ मिनिटांतच २१-४, २१-१३ असा विजय मिळवत भारतासाठी आणखी एक सोपा विजय नोंदविला. त्यानंतर श्रीकांतने २३ मिनिटांच्या लढतीत जुमार अल अमीनवर २१-१५, २१-९ असा दणदणीत विजय मिळवून दुहेरीचे सामने होणार नाहीत हे निश्चित केले.

### श्रीहरी शेवटच्या स्थानी

**टोकियो :** आशियाड क्रीडा स्पर्धेतील ५० मीटर बॅकस्ट्रोकच्या अंतिम फेरीत श्रीहरी नटराज निराशाजनक शेवटच्या अर्थात दहाव्या स्थानी राहिला. दोन वेळा ऑलिम्पिकमध्ये सहभागी झालेल्या नटराजने अंतिम फेरीत २५.५२ सेकंदांची वेळ नोंदवून शेवटचे स्थान पटकावले. दिवसाच्या सुरुवातीला हीट फेरीत त्याने नोंदवलेल्या २५.३७ सेकंदांच्या वेळेपेक्षा ही वेळ अधिक होती.

# भारताला नेमबाजीत आणखी तीन पदके

**■ सांघिक प्रकारात पार्थ, हिमांशू, रुद्रंशला रौप्य ■ वैयक्तिक प्रकारात हिमांशूला रौप्य, रुद्रंक्षला कांस्य**

**आयची-नागोया, २१ सप्टेंबर**

पार्थ माने, हिमांशू ढिल्लन आणि रुद्रंक्ष पाटीलने शानदार सांघिक रौप्यपदक जिंकून गौरव प्राप्त केला.

सोमवारी आशियाड क्रीडा स्पर्धेत भारताने पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक प्रकारात रौप्य पदक पटकाविले, तर १० मीटर एअर रायफल वैयक्तिक अंतिम फेरीत हिमांशूने रौप्य, तर रुद्रंक्ष पाटीलने कांस्यपदक मिळविले.

रुद्रंक्ष, हिमांशू व पार्थ माने या त्रिकुटाने सांघिक एकूण १८९०.१ गुणांसह स्पर्धा पूर्ण केली. महिलांच्या १० मीटर एअर रायफल सांघिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकून भारताने स्पर्धेची सुरुवात केली होती, त्यानंतर या निकालामुळे भारताच्या नेमबाजी मोहिमेत आणखी तीन पदकांची भर पडली. भारताने आतापर्यंत ४ रौप्य व २ कांस्यपदके मिळविले असून गुणतालिकेत १२ व्या स्थानी आहे.



पदक विजेते हिमांशू ढिल्लन, रुद्रंक्ष पाटील व पार्थ राकेश माने

चीनने १८९९.० गुणांच्या विश्वविक्रमी सांघिक एकूण गुणांसह सुवर्णपदक पटकावले. यजमान संघाने आपला मागील विक्रम ०.६ गुणांनी सुधारला. दक्षिण कोरियाने जोरदार पुनरागमन केले, परंतु त्यांना १८८४.२ गुणांसह कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. रुद्रंक्ष, हिमांशू आणि पार्थ यांच्यामुळे भारताने १८९०.१ गुणांसह दुसरे स्थान पटकावले.

रुद्रंक्ष ६३१.८ गुणांसह वैयक्तिक पात्रता क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर राहिला. हिमांशूने ६३०.० गुणांसह सातवे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. पार्थ ६२८.३ गुणांसह दहाव्या स्थानावर राहिल्याने अंतिम फेरीत पोहोचू शकला नाही.

**वैयक्तिक प्रकारात हिमांशू, रुद्रंक्ष ने मारली बाजी**

पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल वैयक्तिक अंतिम फेरीत हिमांशू ढिल्लन व रुद्रंक्ष पाटीलने भारतासाठी एक शानदार निकाल नोंदविला. हिमांशूने रौप्यपदक, तर रुद्रंक्षने कांस्यपदक पटकावले. एकाच आशियाई क्रीडा स्पर्धेत या प्रकारात भारताने प्रथमच वैयक्तिक पदकांवर दोन पदके जिंकली आहेत.

विद्यमान ऑलिम्पिक विजेता (पॅरिस २०२४) शेंग लिहाओ याने २५४.२ गुणांसह त्याने स्वतःचाच विक्रम मोडला आणि सुवर्णपदक जिंकले. शेंगने यापूर्वी हॅंग्झोऊ आशियाडमध्ये २५३.३ गुणांचा विक्रम आपल्या नावावर केला होता. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला सुवर्णपदक जिंकणार

**निशिन, २१ सप्टेंबर**

२० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेत हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघ आणि चामरी अथापथूच्या नेतृत्वाखालील श्रीलंका यांच्यादरम्यान अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. भारतीय संघ आपले विजेतेपद कायम राखण्यास उत्सुक आहे. अंतिम सामन्यापूर्वी बांगलादेश आणि पाकिस्तान संघादरम्यान कांस्यपदकासाठीचा सामना होणार आहे. हा सामना म्हणजे २०२३ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील अंतिम सामन्याची ही पुनरावृत्ती आहे, जिथे पुन्हा एकदा सुवर्णपदकासाठी भारत आणि श्रीलंका आमने-सामने येत आहेत. दोन्ही संघांनी सहजपणे अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. भारताने उपांत्यपूर्व आणि उपांत्य फेरीत अनुक्रमे जपान आणि बांगलादेशला सहज हरवले, तर श्रीलंकेने मलेशिया आणि पाकिस्तानविरुद्ध तेच केले. भारताची विजयी घोडदौड रोखण्यासाठी श्रीलंकेचा सामना शेफाली विरुद्ध अथापथू असा होणार आहे. दोन्ही सलामीवीर आक्रमक लयीत आहेत आणि निशिनच्या मैदानाचे आकारमान पाहता, त्या दोघींपैकी कोणीही सामना लवकरच आपल्या बाजूने झुकवू शकते. या दोन्ही संघांमध्ये बरीच ओळखही आहे, कारण दहा दिवसांपेक्षा कमी कालावधीपूर्वी महिला आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात ते एकमेकांसमोर आले होते.

**भारत-श्रीलंका अंतिम सामना आज**

**स्थळ :** आयची प्रीफेक्चरल कोरोगी स्पोर्ट्स पार्क, निशिन
**वेळ :** सकाळी १०.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** सोनी स्पोर्ट्सवर

# सुचिका तारियालने घडविला इतिहास

**नागोया, २१ सप्टेंबर**

वजनावर आधारित वादग्रस्त उपांत्य फेरीच्या निर्णयाला न जुमानता, सुचिका तारियालने आशियाड क्रीडा स्पर्धेत भारतासाठी मिश्र मार्शल आर्ट्समधील पहिले कांस्य पदक जिंकून इतिहासात आपले नाव कोरले आहे. सोमवारी येथे झालेल्या आशियाड क्रीडा स्पर्धेतील महिलांच्या पारंपरिक ६० किलो मिश्र मार्शल आर्ट्स प्रकारात सुचिका तारियालला कांस्य पदकावर समाधान मानावे लागले, कारण दोन्ही खेळाडूंमधील अत्यंत चुरशीची लढत बरोबरीत सुटल्यानंतर, कमी वजनाच्या आधारावर सिंगापूरच्या हुई हून टेओला उपांत्य फेरीचे विजेतेपद देण्यात आले.



या स्पर्धेच्या २० व्या आवृत्तीत पदार्पण करणाऱ्या या क्रीडा प्रकारातील भारताचे हे पहिले पदक होते. तथापि, टेओच्या बाजूने अंतिम निर्णय जाहीर होताच तारियाल या निकालाने पूर्णपणे खचून गेली आणि मॅटवरच ढसाढसा रडली. भारताची ऐतिहासिक कामगिरीया कांस्य पदकामुळे या खंडीय स्पर्धेत भारताच्या एकूण पदकांची संख्या सहा झाली आहे. नेमबाजांनी आतापर्यंत चार रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले आहे. हरियाणाच्या रोहतक जिल्ह्यातील किलोई गावची रहिवासी असलेली ३६ वर्षीय सुचिका, २०२४ मध्ये ज्यू-जित्सूची विश्वविजेती आहे.

# पाकिस्तानवर वर्चस्व गाजवून भारत उपांत्यपूर्व फेरीत

**टोयोटा, २१ सप्टेंबर**

भारताच्या महिला आणि पुरुष टेबल टेनिस संघांनी सोमवारी येथे आपआपल्या पाकिस्तानी प्रतिस्पर्ध्यांवर ३-० असा समान विजय मिळवून आशियाड क्रीडा स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. महिला संघाने एकतर्फी सामन्यात पाकिस्तानचा ३-० असा धुव्वा उडवत 'गट फ' मध्ये सलग तिसरा विजय मिळवत अव्वल स्थान पटकावले, तर पुरुष संघानेही त्याच गुणसंख्येने पुनरागमन केले. भारतीय महिला संघाचे गट साखळी फेरीत वर्चस्वनागोया येथील स्काय हॉलमध्ये, हॅंगझोऊ येथे झालेल्या मागील स्पर्धेत महिला दुहेरी प्रकारात कांस्यपदक



जिंकणाऱ्या सुतीर्था मुखर्जीने, अलीना खानला अवघ्या १० मिनिटांत ११-३, ११-३, ११-४ असे हरवून भारताला दमदार सुरुवात करून दिली. उदयोन्मुख १७ वर्षीय सिंड्रेला दासने त्यानंतर कलसूम खानवर ११-६, ११-७, ११-५ असा विजय मिळवून २-० अशी आघाडी घेतली. सध्या आयटीटीएफ महिला एकेरी क्रमवारीत ९९ व्या स्थानावर असलेल्या सिंड्रेलाला देशांतर्गत क्रिकेटमधील तिच्या प्रभावी कामगिरीबद्दल आशियाई खेळांसाठी वरिष्ठ संघात स्थान मिळाले आहे. पुरुष संघाची जोरदार मुसंडी दिवसाच्या उत्तरार्धात, भारतीय पुरुष संघाने इराणविरुद्धच्या सलामीच्या सामन्यातील पराभवानंतर पाकिस्तानचा ३-० असा दणदणीत पराभव करत पुनरागमन केले. जागतिक क्रमांक ९७ व्या क्रमांकावरील हरमीत देसाईने सलामीच्या सामन्यात पाकिस्तानच्या मुहम्मद खानवर ३-० (११-४, ११-३, ११-५) असा विजय मिळवून भारताला विजयी सुरुवात करून दिली.

## मंगळवेढ्याचा जय भेंकी महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन संघात

**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**


चंद्रपूर येथे झालेल्या ४५व्या राज्य बॉल बॅडमिंटन स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याच्या संघाने सातवे स्थान पटकावले. या कामगिरीच्या बळावर मंगळवेढा येथील जवाहर विद्यालयाच्या जय राजेंद्र भेंकी याची २ ते ७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत छत्तीसगड येथे होणाऱ्या ४५ व्या राष्ट्रीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. सर्व खेळाडूंचे सोलापूर जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश भुतडा, सचिव राजेंद्र माने, शब्बीर शेख, मंगळवेढा एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक मिलिंद कुलकर्णी यांनी सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. सोलापूर संघ आणि मार्गदर्शक: श्रेयश शिवकुमार स्वामी (कॅप्टन), जय राजेंद्र भेंकी,अतिश संदीप भालेकर,स्वराज योगेश भगरे, जयदीप पांडुरंग गवळी, सृजन प्रशांत म्हेत्रे, शौर्य मामासाहेब गुंड, विवेक राजकुमार कोकरे, प्रतीक खंडू कोकरे, सिद्धार्थ विनायक बोमाण्णा, मार्गदर्शक : शिवकुमार स्वामी.



## आव्यन पुलगमची विभागीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि.२१ सप्टेंबर-**

शालेय शहर लॉन टेनिस स्पर्धेत इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलच्या आव्यन विनायक पुलगम याने १४ वर्षांखालील मुलांच्या वयोगटात चौथा क्रमांक संपादिला. या कामगिरीवर त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यास क्रीडाशिक्षक अजय चाबुकस्वार यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका मानसी जोशी, ममता बसवंती, यांनी अभिनंदन केले.





## के.एल.ई. स्कूलला तिहेरी मुकुट

**सोलापूर महानगरपालिका शालेय टेबल टेनिस स्पर्धा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

शालेय शहर टेबल टेनिस स्पर्धेत के.एल.ई. स्कूलने १४ वर्षांखालील मुले, मुली आणि १७ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद मिळवत तिहेरी मुकुट पटकावला.

मुळे पॅव्हेलियन टेबल टेनिस हॉल झालेल्या या स्पर्धेत शहरातून १४, १७ आणि १९ वर्षांखालील मुले व मुलींच्या २७ संघांनी सहभाग घेऊन आपले उत्कृष्ट क्रीडा कौशल्य दाखवले. सोलापूर महानगरपालिका क्रीडा अधिकारी नजीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा पार पडली. स्पर्धा पार पाडण्यासाठी सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे सचिव झेड. एम. पुणेकर, श्री. मुनोळी, श्री. गोवर्धन, श्री. मुंढे, श्री. माळवदकर, प्रथमेश हिरापुरे, नामदेव, भांडेकर यांचे सहकार्य लाभले.

**अंतिम निकाल**

**१४ वर्ष वयोगट मुले:** के. एल. ई. प्रशाला विजयी विरुद्ध एस. आर. चंडक विद्यालय ३-०. **मुली :** के. एल. ई. स्कूल विजयी विरुद्ध महेश इंग्लिश मीडियम स्कूल ३-०. **१७ वर्ष वयोगट मुले :** के. एल. ई. प्रशाला विजयी विरुद्ध सेंट जोसेफ प्रशाला ३-०. **मुली :** एस. आर. चंडक विद्यालय विजयी विरुद्ध के. एल. ई. प्रशाला ३-१. **१९ वर्ष वयोगट मुले:** एच. एन. कॉलेज ऑफ कॉमर्स विजयी विरुद्ध एस. आर. चंडक विद्यालय ३-१. **मुली :** एच. एन. कॉलेज ऑफ कॉमर्स विजयी विरुद्ध एस. आर. चंडक विद्यालय ३-१.

## शालेय वुशु स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजला सहा पदके

**पाच सुवर्ण व एक रौप्य पदकांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

शालेय शहर वुशु स्पर्धेत संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंनी सुवर्ण व एका खेळाडूने रौप्य पदक प्राप्त केले. या कामगिरीवर त्यांची जामखेड येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंना श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, शैक्षणिक सल्लागार प्रमोद दर्गोपाटील, प्र. प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



**कामगिरी : सुवर्ण :**

**मुले :** नैतिक ज्ञानेश्वर खुर्द (५६ किलो), वैभव बसवेश्वर कोळी (६५ किलो), अजय बाबू महाजन (६० किलो), **मुली :** रिया जाधव (५६ किलो), सफिना शेख (४८ किलो). **रौप्य:** शर्वरी गुरव (४५ किलो).

## संकटांशी झगडत घडलेला कुस्तीचा हिरा

### अफाट जिद्द, कष्टाची परंपरा व कुस्तीची निष्ठा

*''जिथे जिद्द आणि चिकाटी असते, तिथे यशालाही मानच खेळावा लागतो.''*

महाराष्ट्राची भूमी ही संतांची, शूरवीरांची आणि कुस्तीच्या मातीशी इमान राखणाऱ्या पैलवानांची भूमी म्हणून ओळखली जाते. सोलापूर जिल्ह्याला तर कुस्तीची समृद्ध परंपरा लाभली आहे. याच मातीत घडलेले आणि रुस्तुम-ए-हिंद पै. हरिश्चंद्र मामा बिराजदार यांचे हुकमी एक्का ठरलेले उपमहाराष्ट्र केसरी तथा हिंदकेसरी (७४ किलो गटात) सुवर्ण पदक विजेता पै. भरत किसनराव मेकाले यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे.



पै. भरत मेकाले

***बालपण आणि कुस्तीचे धडे***

सोलापूर येथे २२ सप्टेंबर १९७५ रोजी जन्मलेला पै. भरत मेकाले यांचा परिवार तसा संघर्षमय होता. पाच भावंड आणि एक बहीण असा त्यांचा परिवार होता. वडील किसनराव मेकाले गुरुजी मिलमध्ये काम करत असत आणि मिलमधील कामगारांच्या मुलांना स्वतः शाळा शिकवत होते. गुरुजी स्वतः चांगले पैलवान होते.

घरच्या परिसरातील नारायण तालीम येथे वस्ताद सुभाषवीर यांच्याकडे पै. भरत मेकाले यांच्या कुस्तीची सुरुवात झाली. त्यानंतर त्यांनी हनुमान व्यायाम शाळा, नवी पेठ, सोलापूर येथे कै. वस्ताद तुकाराम लकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचे धडे गिरवले.

''**घसून आणि घाम गाळल्याशिवाय हिरा चकाकत नाही**'' या न्यायाने त्यांनी लहानपणापासूनच कष्टाची तयारी ठेवली. १९८८च्या अमरावती येथील राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत त्यांनी सुवर्णपदक मिळवले. त्याच काळात सोलापूर परिसरातील विविध कुस्ती मैदानांमध्ये त्यांनी आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला.

***पुणे व गोकुळ तालीमीशी संबंध आणि मामांचे मार्गदर्शन***

१९८८ मध्ये सोलापूर येथे झालेल्या कामगार केसरी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवल्यानंतर, रुस्तुम-ए-हिंद पै. हरिश्चंद्र मामा बिराजदार यांच्या हस्ते त्यांना बक्षीस मिळाले. पुढे २२ जुलै १९९२ रोजी ते पुण्याच्या प्रसिद्ध गोकुळ वस्ताद तालीम येथे सरावासाठी दाखल झाले. मामांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा सराव अधिक तीव्र झाला.

१९९४ मध्ये पार्क स्टेडियम, सोलापूर येथील स्पर्धेत ६२ किलो वजन असताना ६८ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला. हे यश पाहून मामांनी त्यांच्या वडिलांना सांगितले की, ''तुझा मुलगा मोठा पैलवान होईल.'' त्यानंतर महाराष्ट्रातील कुस्ती मैदानांमध्ये मामा त्यांना स्वखर्चाने सोबत घेऊन जात असत. पै. भरत मेकाले यांनी १९९४ ते २००५ पर्यंत महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत सलग ११ वर्षे सुवर्ण व रौप्यपदक पटकावून आपल्या अफाट कौशल्याची चुणूक दाखवली.

***भारतीय नौदल आणि सुवर्णयश***

शिक्षणासोबतच कुस्ती सुरू ठेवत देशसेवेच्या भावनेने ते १५ फेब्रुवारी १९९८ रोजी भारतीय नौदलात पी.टी. ऑफिसर पदावर रुजू झाले. नौदलात असताना त्यांनी कुस्ती क्षेत्रात अभूतपूर्व यश संपादन केले.

भारतीय नौदलमध्ये सर्विसेस कुस्ती स्पर्धेत सलग अकरा वर्षे सुवर्ण व रौप्य पदक मिळवून उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार व नौसेना विशेष सेवा मंडळ गौरव प्राप्त केला.

राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेमध्ये सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कामगिरी करून एकूण १५ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी व आंतरराष्ट्रीय पैलवानांच्या बरोबर अटीतटीच्या कुस्त्या करून त्यांनी सोलापूरचे नाव संपूर्ण देशात उज्ज्वल केले.

''**खरा खेळाडू पराभवाने खचत नाही, तर नव्या उमेदीने उभा राहतो,**'' या उक्तीप्रमाणे त्यांनी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील अनेक मानाच्या कुस्त्या जिंकल्या, ज्यामध्ये प्रमुख मैदाने याप्रमाणे गाजवली. अखिल भारतीय बेळगाव महापौर केसरी, डबल ठाणे महापौर केसरी, सिद्धेश्वर केसरी व लातूर सिद्धेश्वर केसरी, सोलापूर मीरा-भाईंदर केसरी, मुंबई महापौर केसरी, जालना केसरी, प्रथम भगवंत केसरी (बार्शी). या त्यांच्या उल्लेखनीय क्रीडाकार्याबद्दल त्यांना जिल्हा प्रशासनाकडून हुतात्मा गुणवंत खेळाडू पुरस्कार तसेच इतर अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

**** श्रीकृष्ण कुस्ती केंद्राची स्थापना आणि क्रीडायोगदान ****

कुस्तीच्या क्षेत्रातून निवृत्ती घेतल्यानंतर, पै. भरत मेकाले यांनी सोलापूरच्या युवा पिढीला घडवण्याचा विडा उचलला. ''**आपले मूळ आणि संस्कृती कधीही विसरू नये,**'' या विचाराने त्यांनी २०१३ मध्ये डोणगाव रोडवर स्वतःच्या जागेत गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर श्रीकृष्ण कुस्ती केंद्राची स्थापना केली.

येथे मल्लांनी शिक्षणाबरोबरच कुस्तीमध्ये आपले करिअर घडवावे यासाठी त्यांनी निवासी कुस्ती केंद्र उभे केले. आजवर त्यांनी ५०० पेक्षा जास्त मल्ल तयार केले आहेत, जे राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सोलापूरचे नाव उज्ज्वल करत आहेत. किरण जाधव, राजेंद्र राजमाने, विजय माने, किरण कदम, समाधान पाटील, सचिन पाटील, योगेश पवार, बालाजी यलगोडे, बाळासाहेब सपाटे, मल्लिनाथ खोबण, आकाश ढेरे, सनी देवकते, रविराज सरवदे हे त्यातील काही प्रमुख मल्ल असे आहेत. पैलवान दिल आणि धाडसाचे नामांकित भरत मेकाले पैलवान यांनी वाढदिवसानिमित्त असेच नवोदित मल्लांना घडवत रहावे, यासाठी शुभेच्छा.

**अजितकुमार संगवे**
भ्र. ९८८११३३१०३

# दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी जेरबंद; १०.२९ लाखांचा मुद्देमाल जप्त

### सोलापूर शहर गुन्हे शाखेची कारवाई

### पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि हत्यारांसह आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर -**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांची गस्त सुरू असतानाच, गुन्हे शाखेच्या पथकाने एक मोठी आणि धाडसी कारवाई करत दरोड्याचा कट उधळून लावला आहे. शहरात पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि विविध घातक शस्त्रांसह दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या एका सराईत आंतरराज्यीय ७ गुन्हेगारांच्या टोळीला शिताफीने सापळा रचून जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी पिस्तूल, वाहने आणि इतर हत्यारांसह तब्बल १० लाख २९ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी आज सोमवार रोजी सायंकाळी पत्रकार परिषदेत दिली.



मनदीपसिंग संघू (वय ४३, रा. नांदेड), बलप्रीतसिंग खैरा (वय २५, रा. नांदेड),अंकुर प्रताप सिंह (वय २८, रा. तारवा, जि. पटना, बिहार) ,लक्ष्मण जगताप (वय ३५, रा. भागगाव, औरंगाबाद), सुखदेवसिंग गिल (वय ४२, रा. वैरोवाल, जि. तरनतारण, पंजाब),दिलीपसिंग पवार खालसा (वय ३४, रा. ब्रम्हसिंग नगर,नांदेड) आणि राजेश राठोड (वय ४४, रा. नरसिंग नगर, मुळेगाव रोड, सोलापूर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस आयुक्त यांनी दिलेल्या सूचनेनुसार गुन्हे शाखेचे पथक एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत होते. दरम्यान, पो.शि. अमोल यादव यांना गुप्त बातमीदाराकडून मुळेगाव रोडवरील अमर ज्योति नगर भागात काही संशयित तरुण घातक शस्त्रे आणि वाहनांसह दरोडा घालण्याच्या तयारीत एकत्र आल्याचे समजले. त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना तातडीने कल्पना दिली. पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन वेढा घातला. तेव्हा काळ्या रंगाची गाडी व एका मोटारसायकलजवळ ७ इसम संशयास्पदरीत्या थांबलेले दिसून आले. पोलिसांनी शिताफीने सापळा रचून या सर्वांना ताब्यात घेतले.

आरोपींकडे देशी बनावटीचे पिस्तूल आणि ५ जिवंत काडतुसे, तलवारी, ३ खंजीर, २ कटावणी, १ छन्नी, १ लांब दोरखंड, जोडी हँडग्लोज, २ नंबर प्लेट, १ कलर स्प्रे बॉटल, मोबाईल हँडसेट, महिंद्रा ५०० चारचाक व यामाहा कंपनीची मोटारसायकल मिळून आले. पोलिसांनी विचारणा केली असता आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसी खाक्या दाखवताच आरोपी राजेश राठोडने रात्रीच्या वेळी सोलापूर शहरात दरोडा टाकून लुटमार करण्याची योजना आखल्याची कबुली दिली. अटक आरोपींवर यापूर्वी खून, खुनाचा प्रयत्न, दरोडा, घरफोडी, जबरदस्तीने चोरी आणि हत्यार कायद्यांतर्गत गंभीर गुन्हे दाखल आहेत. याप्रकरणी पो.शि. अमोल यादव यांच्या फिर्यादीवरून एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सर्वांना अटक केली आहे. ही कामगिरी पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/वि.शा.) डॉ. अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त दिलीप पवार, शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने, स.पो.नि. भरत चंदनशिव, स.पो.नि. निलेश सोनवणे, पो.उप-नि. विजय बनसुडे, पो.उप-नि. मनोज मोरे यांच्यासह अंमलदार अंकुश भोसले, नंदराम गायकवाड, जावीद जमादार, विजय वाळके, तात्यासाहेब पाटील, वाजीद पटेल, बापू साठे, योगेश बर्डे, आबाजी सावळे, धीरज सातपुते, अमोल यादव, विठ्ठल यलमार, गणेश शिंदे, अभिजित पवार, शंकर याळगी, सुभाष मुंडे, सैपन सय्यद, वसीम शेख, युवराज गायकवाड, भारत पाटील, विशाल कुलकर्णी, मच्छिंद्र राठोड (सायबर पो. ठाणे) आणि चालक शाम सुरवसे, परबत, राजशेखर पाटील यांनी पार पाडली आहे.

## महत्वाचे...



## अनुजा खटके-पाटील यांची महसूल सहाय्यक अधिकारीपदी निवड

**टेंभुर्णी, दि. २१ सप्टेंबर-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महसूल विभागातील सहाय्यक अधिकारीपदी अनुजा खटके-पाटील यांची निवड झाल्याबद्दल तांबवे (टे.) येथे ग्रामस्थांतर्फे स्वागत व सत्कार सोहळा झाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माढा तालुका पंचायत समितीचे माजी सभापती विक्रम सिंह शिंदे होते. प्रास्ताविकात माढा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नागेश खटके-पाटील यांनी अनुजा यांचे अभिनंदन केले. यावेळी विक्रम शिंदे, बंडू ढवळे, सागर ढवळे आदींनी अनुजा यांच्या यशाचे कौतुक केले. कार्यक्रमास माढा तालुका खरेदी-विक्री संघाचे चेअरमन बंडू ढवळे, हरिदास मरकड, सागर ढवळे, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे नूतन संचालक ब्रह्मदेव मरके, संजय पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र चौधरी, माजी सरपंच सागर ढवळे, तांबवे येथील नेते नागनाथ खटके, डॉ. भीम पवार, कल्याण अनपट, दत्तात्रय ढवळे, संग्राम देशमुख, नानासाहेब ढवळे उपस्थित होते.

## राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रा. ठोंबरे यांचे यश

**सांगोला, दि.२१ सप्टेंबर-**

भारतीय लोक प्रशासन संस्था, महाराष्ट्र प्रादेशिक शाखा मुंबई यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय बी.जी.देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा २०२५-२६ मध्ये सांगोला येथील प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. मंत्रालय, सहावा मजला येथील परिषद सभागृहात आयोजित कार्यक्रमात नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओंकार पवार तसेच विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. स्पर्धेत ३०० हून अधिक स्पर्धकांनी आपले निबंध सादर केले होते. प्राप्त निबंधांमधून ७४ अत्युत्कृष्ट निबंधांची निवड करण्यात आली. ज्यातून अंतिम ४ विजेत्यांची निवड करण्यात आली. प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी सोशल मीडिया: आव्हाने आणि संधी (मराठी) या विषयावर निबंध सादर केला होता. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.





## सांगोला विद्यामंदिरच्या ६ खेळाडूंची विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**सांगोला, दि. २१ सप्टेंबर -**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कुर्डूवाडी (ता. माढा) येथे झालेल्या जिल्हा शालेय बॉक्सिंग स्पर्धेत सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. स्पर्धेत १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या गटात साक्षी संतोष केदार, माधुरी अंकुश नरळे आणि साक्षी शंकर रोकडे यांनी आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला. तसेच १७ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या गटात सिद्धेश्वरी लालासो काशीद, बरकत अली इरफान मुलाणी आणि सोहम सचिन चव्हाण यांनीही दमदार कामगिरी करत आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक मिळविला. या सर्व प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांची आगामी पुणे विभागीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्था अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी खजिनदार शंकरराव सावंत, प्राचार्य चारुदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक काकासो नरूटे, मार्गदर्शन शिक्षक उपस्थित होते. यशस्वी खेळाडूंना सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजचे प्रा.सचिन चव्हाण, प्रशाला क्रीडा विभाग प्रमुख सुनील भोरे, ज्युनिअर कॉलेज क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डी. के. पाटील, क्रीडा शिक्षक नरेंद्र होनराव, सुभाष निंबाळकर व प्रा. संतोष लवटे, स्नेहल देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्था उपाध्यक्ष ॲड विजयसिंह चव्हाण, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे,सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके,संस्था कार्यकारिणी सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके सर्व संस्था सदस्य, पर्यवेक्षक शुभांगी घोंगडे, मकरंद अंकलगी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खेळाडूंचे अभिनंदन करुन विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## निधन वृत्त...


### कृष्णा बाबर



**सांगोला, दि.२१ सप्टेंबर-**

मानेगाव (ता.सांगोला) येथील कृष्णा बाबर (वय-९०) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी दि. २१ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. रिटायर्ड मेजर माणिक बाबर यांचे ते वडील होते.

### निलाबाई स्वामी



**अक्कलकोट, दि. २१ सप्टेंबर-**

येथील पुकाळे प्लॉट मधील निलाबाई रेवणय्या स्वामी (वय ९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा मंगळवारी (दि. २२) सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे. येथील बँक ऑफ बडोदा चे कर्मचारी मल्लिनाथ स्वामी यांचे त्या मातोश्री व मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्रा. मयुर स्वामी यांचे त्या आजी होत.

## तब्बल ४५ दिवसांनंतर पावसाचे पुनरागमन

### पिकांसाठी आणखी दमदार पावसाची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर -**

सोलापूर जिल्ह्यात सोमवारी दि. २१ सप्टेंबर रोजी उत्तरा नक्षत्राचा पाऊस पडला, तब्बल ४५ दिवसांनंतर पुनरागमन केलेल्या पावसाने खरीप पिकांना काही अंशी दिलासा मिळाला, तसेच रबी पेरणीची आशाही शेतकऱ्यांमध्ये निर्माण केली. मात्र अद्याप बराच चांगला पाऊस पडण्याची गरज आहे. सोलापूर शहरातही रात्रीच्या सुमारास काही भागात पावसाने हजेरी लावली.

दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे चिंतेत सापडलेल्या मंद्रूप आणि परिसरातील बळीराजाला उत्तरा नक्षत्राच्या पावसामुळे अखेर दिलासा मिळाला आहे. सोमवारी दि. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी रिमझिम पावसाने हजेरी लावली. आणखी काही असे दमदार पाऊस झाल्यास रब्बी पेरण्यांसाठी शेतकरी तयारीला लागतील असे बोलले जात आहे. आज सोमवारी दि. २१ सप्टेंबर रोजी संध्याकाळी अक्कलकोट परिसरात पावसाच्या हलक्या सरी पडल्या. अक्कलकोट शहर व नागनाळी, मातनाळी, बोरी उमरगा, इटगे, रामपूर, मिरजगी, हसापूर, निमगाव, कोळीबेट, सांगवी, बणजगोळ, कडबगाव, हंजगी, हैदा, नागणसूर भागात पावसाने हजेरी लावली.

पंढरपूर शहर व परिसरात सोमवारी (दि. २१ सप्टेंबर) पावसाने हजेरी लावली. दिवसभर ढगाळ वातावरण होते. दुपारनंतर काही भागांत पावसाच्या सरी कोसळल्या. वेळापूर (ता. माळशिरस) येथे आज सायंकाळी वरुण राजाने हजेरी लावली. सुमारे अर्धा तास चांगला पाऊस झाला.

वेळापूर अकलूज रोडवरील ग्रिन सिटी या ठिकाणी आजूबाजूच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा लोंढा एकत्रित आला. यामुळे येथील परिसरात काही काळ पूर सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.

### गौडगाव येथे वीज पडून एकाचा मृत्यू,एक जखमी



अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव बु येथे शेतात वीज पडून नामदेव राठोड (वय ४८, रा. जेऊरवाडी ता. अक्कलकोट ) या व्यक्तीचा मृत्यू झाला. इस्माईल मुल्ला (वय ३५ रा. कडबगाव, ता. अक्कलकोट) ही व्यक्ती जखमी झाली आहे. रात्री उशिरापर्यत घटनेची नोंद घेण्याची प्रक्रिया दक्षिण पोलीसाकडून चालू होती.

## भारत लवकरच महासत्ता बनेल

### माजी शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर

### अधिवक्ता परिषदेची व्याख्यानमाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, २१ सप्टेंबर -**

पुर्वी भारत परदेशाकडून शस्त्रे खरेदी करत होता. आज अब्जावधी डॉलर्सचे शस्त्रास्त्र निर्यात करणारा देश अशी भारताची ओळख झाली आहे. स्वदेशी संशोधनामुळे हे सर्व शक्य झाले आहे. लवकरच भारत देश महासत्ता बनेल असे प्रतिपादन संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डी. ओ. आर.डी.) चे माजी ज्येष्ठ शास्त्रज्ञ काशिनाथ देवधर यांनी केले.

अखिल भारतीय अधिवक्ता परिषद शाखा सोलापूर यांच्यावतीने आयोजित स्व. रंगनाथ विष्णु लळीत व्याख्यानमालेचे ३ रे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. हि. ने. वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात ''सशक्त भारत - स्वदेशी शस्त्रे'' या विषयावर ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा उपस्थित होते. प्रांत सचिव लक्ष्मीकांत गवई यांनी प्रास्ताविक केले. स्वदेशी तंत्रज्ञान आधारीत शस्त्रास्त्रांमुळे परकीय चलनाची मोठी बचत होत असल्याबाबतची आकडेवारी त्यांनी सादर केली.



**सोलापूर : स्व. रंगनाथ लळीत व्याख्यानमालेचा प्रारंभ करताना जिल्हा व सत्र न्यायाधीश मनोज शर्मा, काशिनाथ देवधर, धनंजय माने, लक्ष्मीकांत गवई, महेश अग्रवाल.**

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष धनंजय माने, शहराध्यक्ष महेश अग्रवाल, महामंत्री मल्लिनाथ शहाबादे, परमानंद जवळकोटे, निता मंकणी यांचेसह संघटनेचे विविध पदाधिकारी, सदस्य, कायदेतज्ञ, कायद्याचे अभ्यासक व नागरिक उपस्थित होते.

## पुढील पिढीच्या जडणघडणीत अंगणवाडी सेविकांची महत्वाची भूमिका

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**


समाजाची पुढील पिढी घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अंगणवाडी सेविका करतात. त्यांच्या कार्याचा गौरव करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.


शिवछत्रपती रंगभवन येथील सभागृहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्राथमिक स्वरूपात २५ अंगणवाडी सेविकांचा सन्मान केला. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी २०४७ पर्यंत विविध क्षेत्रांत सातत्याने काम करण्याची गरज आहे.



संयोजक मोहन डांगरे यांनीही अंगणवाडी सेविकांच्या कार्याचे कौतुक केले. नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनीही अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, प्रशांत फत्तेपूरकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, शिक्षणाधिकारी धनंजय ढेपे, शशिकांत चव्हाण, बाल विकास अधिकारी दीपक ढेपे यांच्यासह अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

## तालुका बुद्धिबळ स्पर्धेत सनराइज स्कूलच्या तिघांची जिल्हा स्पर्धेसाठी निवड







**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २१ सप्टेंबर-**

माढा तालुका बुद्धिबळ स्पर्धेतून सनराइज इंग्लिश मीडियम स्कूलच्या तिघांची जिल्हा स्पर्धेसाठी निवड झाली.


बुद्धिबळाच्या पटावर बुद्धिमत्ता, संयम आणि अचूक डावपेचांचे दर्शन घडवत आरुष तुपे याने प्रथम, सोहम कंगले याने तृतीय तर आयुष ढोकणे याने चतुर्थ क्रमांक मिळविला. त्यांना क्रीडा शिक्षक गणेश सर यांचे मार्गदर्शन तसेच त्याचे काका श्रीकांत आणि मावशी स्वाती दळवी यांचे सहकार्य लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष योगेश बोबडे, सचिव सुरजा बोबडे, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून जिल्हा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा, शिस्त, सातत्य हाच यशाचा मार्ग : डगळे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ सप्टेंबर -**

विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यश संपादन करण्यासाठी प्रेरणा, शिस्त आणि सातत्य या तीन सूत्रांचा अंगीकार करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन सहायक पोलिस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले.

गणेशोत्सवानिमित्त आयोजित लोकसंवाद २०२६ उपक्रमांतर्गत चिंचणी (ता.पंढरपूर) येथील वरदायिनी गणेशोत्सव मंडळ येथे शासनाकडून विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत उपलब्ध करुन दिलेल्या सुविधांबाबत डगळे यांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी केवळ गुणांमागे न धावता या तीन मूल्यांना आपल्या दैनंदिन जीवनाचा हिस्सा बनवावे, असा संदेश डगळे यांनी यावेळी दिला. चिंचणी या पुनर्वसित गावातील नागरिकांनी



गावाच्या विकासात्मक कामात सातत्य राखल्याने याठिकाणच्या नागरिकांना तसेच बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांना उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. चिंचणी गावाने केलेल्या विकासामुळे राज्य शासनाचे विविध पुरस्कार प्राप्त झाले असल्याचे गौरवोद्गार देखील त्यांनी काढले.

कार्यक्रमास मोहन अनपट, शशिकांत सावंत, चंद्रकांत पवार, शरद सावंत तसेच चिंचणी ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## आंदोलनातून शेतकरी दुष्काळाचे लाभ मिळवतील : कॉ.ठोंबरे

### किसान सभेतर्फे बार्शीत मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि २१ सप्टेंबर-**

अखिल भारतीय किसान सभेच्यावतीने आज सोमवारी दि. २१ सप्टेंबर रोजी बार्शी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. बार्शी तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी कॉ. तानाजी ठोंबरे यांनी सरकार दुर्लक्ष करत असले तरी शेतकरी आंदोलनातून दुष्काळ पदरात पाडून घेतील, असा विश्वास व्यक्त केला.

दुष्काळाच्या गंभीर परिस्थिती मोर्चाच्या घोषणांमधून दिसून आली. हा मोर्चा कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांचे नेतृत्वाखाली काढण्यात आला. मोर्चामध्ये संपूर्ण बार्शी तालुका दुष्काळ जाहीर करा आणि तातडीने प्रती हेक्टरी




५० हजार भरपाई द्या , २०२५ चा पीकविमा द्या, पिण्याच्या पाण्याची सोय करा, जनावरांच्या चाऱ्यासाठी अनुदान द्या, मागेल त्याच्या हाताला रोजगार हमी योजनेचे काम द्या, भ्रष्टाचारविरहित रेशनिंग व्यवस्था मजबूत करा, सरसकट कर्जमाफी करा, नियमित कर्ज भरणाऱ्यांना प्रोत्साहनपर म्हणून ५० हजार रुपये अनुदान द्या, विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची फी माफ करा, विनाअडथळा दिवसा वीज पुरवठा करा, खरीप हंगामाची गेलेली पिकाची नुकसान भरपाई द्या, येऊ घातलेल्या रब्बीसाठी मदत द्या, अल्पदरात बी-बियाणे, खते उपलब्ध करा, वाढती महागाई कमी करा, एमएसपी दराने शेतीमाल खरेदी करा, आत्महत्या शेतकरी व शेतकरी कुटुंबांना २५ लाख रुपयांची मदत करा.

मोर्चा तहसीलवर जातात येथे सभेमध्ये रुपांतर झाले. यावेळी कॉ. प्रा. तानाजी ठोंबरे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी जो आदर्श घालून दिलेला आहे तर तो आदर्श सरकार विसरले आहे. शेतकरी उध्वस्त झाला आहे. पिकाची राख रांगोळी होत आहे. परंतु सरकार दुष्काळ जाहीर करायला तयार नाही. शेतकरी सरकारची गुर्मी उतरवून दुष्काळ पदरात पाडून घेतील.

यावेळी लहू आगलावे, ए.बी. कुलकर्णी, राहुल भड, विलास बारबोले, मनोज मोरे, घोडके मामा, प्रविण मस्तुद , हरी पवार , प्रा. सतीश पाटील, मनोज डुरे पाटील, निर्मला सरवदे, पांडुरंग यादव, मुबारक मुलानी, दत्ता कदम, भारत भोसले, भरत चव्हाण, किसन मुळे, आनंद गुरव, प्रमोद मंडलीक, दत्तात्रय नेहरकर, रशिद इनामदार, कैलास माने आदी उपस्थित होते.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन ॲड.बसवराज सलगर, ॲड.निखिल गोदेपुरे, ॲड.आकाश गायकवाड, ॲड.मनिष सलगर, प्रकाश जाधव, राजकुमार सलगर यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, ॲड.चैतन्य पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, प्रकाशक दिलीप दुलंगे, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, व्यवस्थापक विनायक पुला आदी.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन नगरसवेक शिवाजी वाघमोडे व संभाजी आरमार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, प्रकाशक दिलीप दुलंगे, मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे, बाळासाहेब वाघमोडे.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र.कुलगुरु प्रा.डॉ.लक्ष्मीकांत दामा, 'म्हाडा'चे सुरज अजनाळकर, अभियंता राजेश उबाळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, प्रकाशक दिलीप दुलंगे, मुख्य संपादक प्रशांत माने, मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, उपसंपादक अविनाश गायकवाड आदी उपस्थित होते.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, प्रकाशक दिलीप दुलंगे, मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे, उपसंपादिका आरती कुसेकर, मयुरी तारे उपस्थित होते.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन शहर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अरविंद माने, 'महापारेषण'चे कार्यकारी अधीक्षक अभियंता नवनाथ चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने, उपसंपादिका आरती कुसेकर, मयुरी तारे, मुन्ना शेख, वामन बावडेकर उपस्थित होते.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन 'भाजपा'चे ज्येष्ठ नगरसेवक किसन जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी समूह मुख्य संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने, प्रकाशक दिलीप दुलंगे, मराठवाडा विभाग प्रमुख कुलभूषण तारे आदी उपस्थित होते.

## छायाचित्रातून...



बार्शी : भगवंत तरुण गणेश मंडळातर्फे (समर्थ व्यायाम शाळा) पर्जन्यवृष्टी व बार्शीकरांच्या सुखसमृध्दीसाठी आयोजित करण्यात आलेल्या दुर्वा अर्चना, अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाचे छायाचित्र.



सोलापूर : जुना विडी घरकुल परिसरातील राजर्षी शाहू प्राथमिक विद्यालय येथील नवनाथ गावडे यांच्या घरी गौरी-गणपतीसमोर करण्यात आलेली आकर्षक आरास.



सोलापूरः दावत चौक येथील श्री हाईट्स गणेश मंडळाचा देखावा.



सोलापूर शहरात गुरुवार पेठेतील बसवेश्वर सांस्कृतिक मंडळ श्रीशैल येथील मल्लिकार्जुन मंदिराचा देखावा उभा करण्यात आला आहे मंडळाचे ४९ वे वर्ष आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली गणरायाची पूजा

### श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाने दिला नागरी शिष्टाचार, सामाजिक समतेचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ सप्टेंबर-**

श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाने महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना गणरायाची पूजा करण्याचा मान देत नागरी शिष्टाचार, सामाजिक समतेचा संदेश दिला. यावेळी जगदीश हिरेहब्बू, सुभाष गुंदगी, शिवानंद सोन्ना, अजय येळमेली, बिपीन धुम्मा आदी उपस्थित होते. सोमनाथ सिध्दगणेश, संतोष उबाळे, प्रथम कांबळे, हनुमंतु म्हेत्रे, स्वप्निल सूर्यवंशी, श्याम कांबळे, मच्छिंद्र मोरे, मोहन सुरवसे, संकेत लोखंडे, महादेव सोनवणे, रिता गायकवाड, प्रमिला लोखंडे, पौर्णिमा नागटिळक, वसंत सांगे, कविता कापुरे, पविता चंदनशिवे, सावित्री महिंद्रकर, शांताबाई इंगळे, अर्चना कांबळे यांना हा मान मिळाला.



# ना.चंद्रकांत पाटील यांनी जाणून घेतल्या पद्मशाली शिक्षण संस्थेच्या अडीअडचणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री तथा संसदीय कार्यमंत्री ना.चंद्रकांत पाटील यांनी येथील पद्मशाली शिक्षण संस्थेला सदिच्छा भेट दिली. यावेळी पद्मशाली शिक्षण संस्था संचलित महिला महाविद्यालयसह संस्थेच्या विविध अडीअडचणी त्यांनी जाणून घेतल्या.

पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम यांनी त्यांचे स्वागत केले. सचिव दशरथ गोप यांनी पद्मशाली शिक्षण संस्थेशी ना.चंद्रकांत पाटील यांच्याशी असलेले ऋणानुबंध आणि संस्थेसमोरील अडीअडचणी याबाबत मनोगत व्यक्त केले.



पद्मशाली शिक्षण संस्था संचलित महिला महाविद्यालयात विडी उद्योगसह इतर उद्योगातील कामगारांची मुली शिकायला येतात. शासन व प्रशासन दरबारी संस्थेची अनेक कामे प्रलंबित आहेत. याकडे ना.चंद्रकांत पाटील यांचे लक्ष वेधण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.श्रीनिवास कोंडी, खजिनदार गोवर्धन कमटम, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, आई प्रतिष्ठानचे मोहन डांगरे यांच्यासह सुधा अळ्ळीमोरे, विजयकुमार गुल्लापल्ली, दिनेश यन्नम, व्यंकटेश आकेन, श्रीधर चिट्याल, मधुकर कट्टा, श्रीनिवास जोग, पांडुरंग दिड्डी, प्रभाकर आरकाल, श्रीनिवास गड्डम, रामदास इप्पाकायल, डॉ.राजेंद्र शेंडगे, मधुकर गवळी, अभिन भानप आदी उपस्थित होते.

# आरासमध्ये लावले पोलिसांच्या कार्याचे संदेश देणारे फलक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२१ सप्टेंबर-**

देगाव रोड परिसरातील न्यू लक्ष्मी चाळ येथील नलवडे परिवाराने गौरी-गणेशोत्सव आरासद्वारे पोलिसांच्या कार्याचे संदेश देणारे फलक लावले होते. यात २६/११ हल्ल्यासह अतिरेकी कसाबला पकडणारे शहीद तुकाराम ओंबाळे, शहीद अशोक कामटे यांची प्रतिमा व महाराष्ट्र पोलिस दलातील प्रथम महिला आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर आदी फलकांचा समावेश होता. हर्षद नलवडे याने केवळ १ हजार २०० रुपये खर्चून हा देखावा तयार केला होता.

गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी मनोज यादव यांनी या आरासचे कौतुक केले. यावेळी अरुण घुले, लहु गायकवाड, बिरजू नलवडे, अप्पु बिराजदार, दयानंद गुंड, सुरज झांबरे, विलास कोकितकर, देविदास वाघमोडे, राजु पवार, शाम घाडगे आदी उपस्थित होते.




# पूर्वविभाग ताता गणपतीच्या वतीने सामुहिक अथर्वशीर्ष पठण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ सप्टेंबर-**

मार्कंडेय चौक येथील पूर्वविभाग ताता गणपती मंडळाच्या वतीने मंगलमय व चैतन्यपूर्ण वातावरणात सामुहिक अथर्वशीर्ष पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वेणुगोपाळ जिल्ला व आत्माराम चिप्पा यांच्या नेतृत्वाखाली सुमारे दोन तास हा कार्यक्रम चालला. कुमारिका, महिलांनी यात मोठ्या संख्येने सहभाग घेतले होते.

यावेळी मंडळाचे विश्वस्तद्वय मुरलीधर आरकाल, उमेश मामड्याल, अध्यक्ष सुहास



पोला यांच्यासह राजेंद्र द्यावरकोंडा, संदीप कन्ना, सत्यनारायण आरकाल, श्रीनिवास मडूर, बालाजी आरकाल, गिरीश श्रीगांधी, गोविंद केंची, संदीप संगा, रमेश आडम, विनायक धारा, गंगाधर बंडगर, नागेश भंडारी, नरेश संगा, कुमार भंडारी, ओंकारेश्वर बिद्री, सिध्देश्वर पुंजाल आणि मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रारंभ प्रतिष्ठानची गणेशमूर्ती आकर्षणाचे केंद्र

**सोलापूर, दि. २१ सप्टेंबर-**

जुळे सोलापूर परिसरातील प्रारंभ प्रतिष्ठानने यंदा १६ फूट गणेशमुर्तीची प्राणप्रतिष्ठापना केली. जुळे सोलापूरकरांसह समस्त सोलापूरकरांच्या दृष्टीने ही मुर्ती आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. 'सोलापूरचा महागणपती' असे या गणेशाचे नामकरण करण्यात आले आहे. नगरसेविका संगीता जाधव ह्या मंडळाच्या संस्थापिका आहेत. मंडळाचे यंदाचे १८ वे वर्ष आहे. ढोल-ताशा पथकासोबत ढाल-



तलवार पथक आणि झेंडा पथक हे यंदाच्या विसर्जन मिरवणुकीचे मुख्य आकर्षण असणार आहे, असे अध्यक्ष आकाश जाधव यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कोरडा दुष्काळ जाहीर करा; तुळजापूर खुर्दमध्ये वाळलेल्या पिकांची होळी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ सप्टेंबर -**
पावसाने प्रदीर्घ दडी मारल्याने खरीप पिके करपली असतानाही कोरडा दुष्काळ जाहीर करण्यास होत असलेल्या विलंबाच्या निषेधार्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेने रविवारी (दि. २०) तुळजापूर खुर्द येथे वाळलेल्या सोयाबीनच्या काडाची होळी करून आंदोलन केले.



तालुक्यात गेल्या ४० ते ४५ दिवसांपासून पावसाचा खंड असून सोयाबीन, मूग, उडीद यासह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शासनाने तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशी मागणी विभागीय अध्यक्ष रवींद्र इंगळे यांनी केली. दुष्काळ जाहीर होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला.

आंदोलनात तालुकाध्यक्ष गुरुदास भोजने यांच्यासह पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. तालुक्यातील गावागावांत वाळलेल्या पिकांची होळी करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### ‘अनुबंध’मधील भूमिकेबद्दल ॲड. जयश्री तेरकर यांचा सत्कार

**धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -**
‘अनुबंध’ या मराठी चित्रपटात भूमिका साकारण्याची संधी मिळाल्याबद्दल कवयित्री व लेखिका ॲड. जयश्री तेरकर यांचा खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ‘अनुबंध’ हा आपल्या आयुष्यातील पहिला चित्रपट असून, त्यात भूमिका साकारण्याची संधी मिळणे आणि त्यानंतर झालेला सत्कार हा कलाप्रवासातील विशेष अनुभव असल्याची भावना ॲड. तेरकर यांनी व्यक्त केली. पहिल्या चित्रपटाच्या आठवणी या सन्मानामुळे अधिक संस्मरणीय झाल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांनी ॲड. जयश्री तेरकर यांचे अभिनंदन केले.

### मतदार यादीतील नावासह मतदान केंद्राचीही खात्री करा

**धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -**
विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिम अंतर्गत मतदार यादीची पडताळणी व अद्ययावतीकरण सुरू असून, नागरिकांनी मतदार यादीतील नावासोबतच ईपीआयसी क्रमांक, भाग क्रमांक, मतदान केंद्राचे नाव व ठिकाण तपासावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. मृणाल जाधव यांनी केले आहे. मतदारांना निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळासह वोटर हेल्पलाईन व ईपीआयसी ॲपवर ही माहिती तपासता येणार आहे. नाव, पत्ता किंवा इतर तपशीलांत त्रुटी आढळल्यास संबंधित बीएलओ, तहसील कार्यालय किंवा निवडणूक विभागाशी संपर्क साधावा. पात्र नागरिकांचे नाव मतदार यादीत नसल्यास फॉर्म क्रमांक ६, तर तपशीलात दुरुस्तीसाठी फॉर्म क्रमांक ८ द्वारे अर्ज करता येईल. मतदानाच्या दिवशीची धावपळ टाळण्यासाठी मतदान केंद्राची माहिती आधीच तपासून ठेवण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.





### अल्पसंख्यांक शिक्षक कर्मचारी पतसंस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न

**धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -**
अल्पसंख्यांक शिक्षक कर्मचारी सहकारी पतसंस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २०) संस्थेच्या सभागृहात चेअरमन हाजी बशीर तांबोळी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सभेत सभासदांच्या हिताचे विविध निर्णय घेण्यात आले. सभासदांची कर्जमर्यादा १० लाखांवरून १५ लाख रुपये करण्याची घोषणा करण्यात आली. तसेच मयत सभासदांच्या कर्जापैकी ५० टक्के कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. सभासदांना यंदा ८ टक्के लाभांश देण्याची घोषणाही चेअरमन हाजी बशीर तांबोळी यांनी केली. सभेस अखिल शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष लालासाहेब मगर, सरचिटणीस अविनाश मोकाशे, सविता पांढरे, शिवाजी साखरे व सचिन ताकपिरे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे पदाधिकारी, संचालक, कर्मचारी,सभासद उपस्थित होते.

### ५२१ कारवाया; ४.३४ लाखांचा दंड वसूल

**धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -**
शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांकडून १९ सप्टेंबर रोजी महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध ५२१ कारवाया करण्यात आल्या. या कारवायांमधून ४ लाख ३४ हजार रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

# सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेचे १३ महिन्यांचे मानधन रखडले!

## धाराशिवमधील ६,०८६ गरजू बालकांना १७.८० कोटींची प्रतीक्षा; कुटुंबांवर आर्थिक संकट

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -**
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातील तब्बल ६ हजार ८६ लाभार्थ्यांचे ऑगस्ट २०२५पासूनचे मानधन रखडले आहे. सुमारे १३ महिन्यांपासून मानधन न मिळाल्याने अत्यंत गरजू बालकांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. एप्रिल, मे, जून आणि जुलै २०२५ या चार महिन्यांचे मानधन जुलै-ऑगस्ट २०२६मध्ये जमा झाले; मात्र ऑगस्ट २०२५पासून निधीअभावी मानधन प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे.

या योजनेअंतर्गत एका लाभार्थ्यास दरमहा २ हजार २५० रुपये मानधन दिले जाते. त्यानुसार जिल्ह्यातील ६,०८६ लाभार्थ्यांचे एका महिन्याचे मानधन सुमारे १ कोटी ३६ लाख ९३ हजार ५०० रुपये होते. १३ महिन्यांची रक्कम प्रलंबित असल्याने सुमारे १७ कोटी ८० लाख १५ हजार ५०० रुपये रखडल्याचे सांगण्यात येत आहे.



निधी उपलब्ध झाल्यानंतर चार-पाच महिन्यांचे मानधन एकत्रित जमा केले जाते. पुढील मानधन दिवाळीपर्यंत जमा होण्याची शक्यता असून, त्यासाठीची प्रक्रिया सुरू असल्याचे संबंधितांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्षात मानधन कधी जमा होणार, याबाबत लाभार्थ्यांमध्ये संभ्रम कायम आहे.

अनाथ, एक पालक असलेली बालके, आई-वडिलांपैकी कोणी दुर्धर आजाराने ग्रस्त असलेली मुले, मतिमंद किंवा दिव्यांग बालके तसेच आई-वडील अपंग असलेल्या कुटुंबातील बालकांना या योजनेचा लाभ मिळू शकतो. एका कुटुंबातील दोन लाभार्थ्यांनाही योजनेचा लाभ मिळण्याची तरतूद आहे. नवीन लाभार्थ्यांची यादी मंजुरीसाठी बाल कल्याण समितीकडे पाठविली जाते. मंजुरीनंतर ती पुढील कार्यवाहीसाठी आयुक्त कार्यालयाकडे पाठविली जाते. मानधनाच्या प्रतीक्षेत असलेले लाभार्थी आणि त्यांचे पालक जिल्ह्याच्या ठिकाणी संबंधित कार्यालयात वारंवार पाठपुरावा करीत आहेत. दैनंदिन गरजा, शिक्षण, औषधोपचार यांसह अन्य खर्च भागविताना त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रलंबित मानधनामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

महिला व बालविकास विभागांतर्गत येणाऱ्या या योजनेच्या प्रलंबित मानधनाची महिला व बालकल्याण मंत्र्यांनी तत्काळ दखल घेऊन ६,०८६ लाभार्थ्यांची थकीत रक्कम तातडीने वितरित करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# शेतकऱ्याच्या नशिबी दुष्काळात तेरावा महिना!




**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ सप्टेंबर -**
पावसाने दडी मारल्याने सोयाबीनसह खरीप पिके करपून गेल्याने शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला असताना, आता अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने अडचणीत आणखी भर घातली आहे. २० सप्टेंबर रोजी तालुक्यात काही भागांत झालेल्या हलक्या पावसासोबत आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी उभा ऊस आडवा पडला.

ऊस आडवा झाल्याने त्याची तोडणी करण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त मजुरीचा खर्च करावा लागणार आहे. खरीप पिकांचे नुकसान झाल्याने आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांवर या अतिरिक्त खर्चाचा बोजा पडणार आहे.

पाऊस नाही म्हणून पिके करपली आणि पाऊस आला तर वादळी वाऱ्याने ऊस आडवा केला, अशी व्यथा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

दुष्काळी परिस्थितीत खरीप पिकांचे नुकसान आणि त्यातच उसाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या नशिबी ‘दुष्काळात तेरावा महिना’ अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे.

## सांगवीतून ५० वर्षीय व्यक्ती बेपत्ता; अपहरणाचा संशय

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -**
सांगवी, ता. जि. धाराशिव येथून ५० वर्षीय व्यक्तीचे अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याची तक्रार बेंबळी पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

दत्तात्रय चंद्रकांत दहीभाते (वय ५०, रा. सांगवी, ता. जि. धाराशिव) हे ३१ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातून बाहेर गेले. त्यानंतर अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी त्यांना अपहरण करून नेल्याची तक्रार त्यांच्या पत्नी रेखा दत्तात्रय दहीभाते (वय ४२) यांनी पोलिसांत दिली.

या तक्रारीवरून १९ सप्टेंबर रोजी बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## गणवेशातील कर्तव्य अन् मैदानातील जिद्द; रवी भागवत यांची २१ किमीची यशस्वी धाव





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ सप्टेंबर -**
गणवेशातील कर्तव्य, शरीराची तंदुरुस्ती आणि धावण्याची आवड यांचा सुंदर समतोल साधत तुळजापूर पोलीस ठाण्यांतर्गत कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी रवी भागवत यांनी आपल्या फिटनेस प्रवासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मॅरेथॉनमध्ये सहभागी होत त्यांनी जीवनातील पहिली २१ किलोमीटरची हाफ मॅरेथॉन अवघ्या १ तास ५४ मिनिटांत पूर्ण केली.

पोलीस दलातील नोकरी म्हणजे सततची धावपळ. कायदा-सुव्यवस्था, बंदोबस्त, नागरिकांच्या तक्रारी आणि अचानक येणाऱ्या जबाबदाऱ्यांमध्ये स्वतःच्या फिटनेससाठी वेळ देणे आव्हानात्मक असते. मात्र, रवी भागवत यांनी या व्यस्त दिनचर्येतून वेळ काढत धावण्याला आपल्या जीवनशैलीचा भाग बनविला आहे. धावणे हा त्यांच्यासाठी केवळ व्यायाम न राहता आनंद, ऊर्जा आणि स्वतःला सातत्याने आव्हान देण्याचा मार्ग बनला आहे. विविध धावण्याच्या आणि क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होत त्यांनी आपली फिटनेसची पातळी सातत्याने उंचावली. याच सरावाच्या जोरावर त्यांनी २१ किलोमीटरच्या हाफ मॅरेथॉनचे आव्हान स्वीकारले आणि ते यशस्वीपणे पूर्ण केले. तुळजापूर परिसरात पोलीस सेवेसोबतच क्रीडा आणि फिटनेस क्षेत्रातील आवडीमुळे रवी भागवत परिचित आहेत.

स्वतःला सातत्याने आव्हान देण्याची त्यांची वृत्ती अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या या कामगिरीमागे एका दिवसाचा चमत्कार नसून सराव, सातत्य, शिस्त आणि आत्मविश्वास यांचा आधार आहे.

‘वेळ नाही’ म्हणून थांबण्यापेक्षा स्वतःसाठी थोडा वेळ काढून धावण्यास सुरुवात करा आणि फिटनेसला जीवनशैलीचा भाग बनवा, असा संदेश त्यांच्या कामगिरीतून अधोरेखित होत आहे.

### ‘फिटनेस’चा संदेश देणारा पोलीस...

आजच्या डिजिटल युगात तरुणांचा मोठा वेळ मोबाईल आणि सोशल मीडियावर खर्च होत असताना मैदानी व्यायाम, धावणे, चालणे आणि नियमित शारीरिक कसरतीला जीवनशैलीचा भाग बनविण्याची गरज आहे. रवी भागवत हे आपल्या कृतीतून त्याचा संदेश देत आहेत. फिट राहण्यासाठी महागडी साधने आवश्यक नसून इच्छाशक्ती असेल तर धावण्यापासूनही फिटनेसचा प्रवास सुरू करता येतो, हे त्यांच्या वाटचालीतून दिसून येते.

### मैदानापासून मॅरेथॉनपर्यंत...

उत्कृष्ट व्हॉलीबॉलपटू आणि गौरवपात्र पोलीस हवालदार म्हणून रवी भागवत यांची तुळजापूर परिसरात ओळख आहे. पोलीस सेवेत कर्तव्य बजावत असतानाही त्यांनी क्रीडा क्षेत्राशी असलेली नाळ कायम जपली आहे. व्हॉलीबॉलसोबतच तुळजापूर तसेच धाराशिव जिल्ह्यात आयोजित विविध मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न असतो.

## बुद्धिबळाच्या पटावर रणवीर हेबाडेचा ‘चेकमेट’; तालुक्यात प्रथम क्रमांक

### सर्व सहाही फेऱ्यांत विजय; जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ सप्टेंबर -**
उमरगा तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथील इयत्ता आठवीतील विद्यार्थी रणवीर राहुल हेबाडे याने उत्कृष्ट कामगिरी करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. सुपतगाव येथील प्रशालेत झालेल्या या स्पर्धेत रणवीरने सर्व सहाही फेऱ्यांमध्ये विजय मिळवत निर्विवाद वर्चस्व गाजवले.

या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर रणवीरची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. बुद्धिबळातील त्याच्या सातत्यपूर्ण सरावाचे आणि कौशल्याचे उपस्थितांनी कौतुक केले.




रणवीरच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व्यंकट अरगडे, उपाध्यक्ष युवराज गायकवाड, सचिव विशाल कोकरे, संचालक पद्माकर पाटील, उज्वल कारभारी, धनराज हावळे, चिदानंद माणिकशेटी, योगेश सूर्यवंशी, संजीवनी अरगडे, सुषमा कोकरे, जयश्री पत्रिके तसेच संतोष अरगडे, विक्रम कोकरे, वैभव धोत्रे, स्मिता पांढरे, प्राचार्य बी. पी. सिंग, उपप्राचार्य अतुल फावडे, विभावरी थिटे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

रणवीरच्या या यशाबद्दल शाळा व परिसरातून त्याचे कौतुक होत असून, आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेतही त्याने उल्लेखनीय कामगिरी करावी, यासाठी त्याला शुभेच्छा देण्यात आल्या.

## दुष्काळी परिस्थितीत सभासदांना ६ टक्के लाभांश



**भाऊसाहेब बिराजदार बँकेचा निर्णय**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ सप्टेंबर -**
भाऊसाहेब बिराजदार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी (दि. २०) शांताई मंगल कार्यालयात चेअरमन प्रा. सुरेश दाजी बिराजदार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. धाराशिव जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा शेतकरी सभासदांना फटका बसल्याने यंदा ६ टक्के लाभांश देण्यात येणार असल्याची घोषणा प्रा. बिराजदार यांनी केली.

बँकेच्या विस्ताराची माहिती देताना लातूर, सोलापूर, बीड व पुणे जिल्ह्यांत आगामी काळात शाखा सुरू करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात ४७ कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्ज वितरण केल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी आर. के. शहापुरे यांनी बँकेची आर्थिक स्थिती मांडताना १७९ कोटींच्या ठेवी, ८६ कोटींचे कर्ज वितरण आणि २.४१ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती दिली. धाराशिवमध्ये सात व लातूरमध्ये एक अशा आठ शाखा कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

सभेला संचालक, शाखाधिकारी, कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खामसवाडीतील सिद्धीविनायक ग्रीनटेकचा गळीत हंगाम सज्ज

### मिना कुलकर्णी यांच्या हस्ते बॉयलर अग्नी प्रदीपन; यंत्रसामग्री व तांत्रिक व्यवस्था पूर्ण...

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२१ सप्टेंबर -**
श्री सिद्धीविनायक ग्रीनटेक इंडस्ट्रीज लिमिटेड, खामसवाडी कारखान्याच्या सन २०२६-२७ च्या गळीत हंगामाच्या प्रारंभाच्या पार्श्वभूमीवर बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा आज धार्मिक वातावरणात पार पडला. श्री सिद्धीविनायक परिवाराचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मातोश्री श्रीमती मिनाताई कुलकर्णी यांच्या हस्ते विधिवत बॉयलर अग्नी प्रदीपन करण्यात आले.



आगामी गळीत हंगामासाठी कारखान्याची तयारी, यंत्रसामग्रीची सज्जता, तांत्रिक व्यवस्था तसेच विविध विभागांच्या कामकाजाचा यावेळी आढावा घेण्यात आला. हंगाम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली असून, नियोजनबद्ध पद्धतीने गळीत हंगाम राबविण्यासाठी कारखाना प्रशासन सज्ज असल्याचे सांगण्यात आले. ऊस उत्पादक शेतकरी हा कारखान्याच्या वाटचालीतील केंद्रबिंदू असून, शेतकऱ्यांचा विश्वास, कामगारांचे परिश्रम आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानातून आगामी हंगाम यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. सन २०२६-२७ च्या हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना चांगली सेवा देण्याबरोबरच कारखान्याचे कामकाज अधिक कार्यक्षम, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी सांगितले.

यावेळी बालाजी कोरे, दिनेश कुलकर्णी, गणेश कामटे, प्रतिक देवळे, मंगेश कुलकर्णी, प्रथमेश आवटे, अभयसिंह शिंदे, बालाजी जमाले, विकास उबाळे यांच्यासह कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## जुनी पेन्शनसाठी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकजूट; मुंबई आंदोलनात सहभागी होण्याचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ सप्टेंबर -**
१ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित आणि त्यानंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जुनी पेन्शन संदर्भातील तालुकास्तरीय सहविचार सभा १९ सप्टेंबर रोजी कल्याणसागर माध्यमिक विद्यालय, परंडा येथे झाली.



सभेच्या अध्यक्षस्थानी जय स्वामीनारायण विद्यालय, समुद्राळचे मुख्याध्यापक प्रताप कोकाटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून स्नेहलता देशमुख कन्या प्रशाला, ढोकीचे मुख्याध्यापक संजय कळकुंबे उपस्थित होते. जुनी पेन्शनच्या मागणीसाठी कोणतेही गट-तट किंवा पक्षीय भेद न ठेवता एकजुटीने लढा देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

जुनी पेन्शन हा हक्क असून उतारवयात सन्मानाने जगण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याने आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रताप कोकाटे यांनी सांगितले. तसेच २८ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदान येथे होणाऱ्या बेमुदत धरणे आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

सभेला तालुक्यातील जुनी पेन्शन पीडित मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जुनी पेन्शनच्या लढ्यात स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन आंदोलन यशस्वी करण्याचा संकल्प करण्यात आला.

## संक्षिप्त...

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या गणरायाची भावपूर्ण आरती



तभा वृत्तसेवा

**दैठणा दि. २१ सप्टेंबर : लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या गणेशोत्सवानिमित्त गणरायाची भावपूर्ण आरती करण्यात आली. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व्यंकटरावजी बिरादार यांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली. यावेळी गणरायाच्या चरणी परिसरात समाधानकारक पाऊस पडू दे, राळा-लिंबू यांसह खरीप पिके जोमाने बहरू देत आणि शेतकरी राजाच्या जीवनात सुख-समृद्धी नांदू दे, अशी मनोभावे प्रार्थना करण्यात आली.**

**यावेळी बँकेचे संचालक शिरसाट तसेच दैठणा येथील रामराव पाटील विद्यालयाचे माजी शिक्षक विठ्ठलराव कदम यांनीही आरतीमध्ये सहभागी होत गणरायाचे दर्शन घेतले. शेतकरी, शेती आणि ग्रामीण जीवनाशी निगडित असलेल्या या प्रार्थनेतून बळीराजाच्या सुख-समृद्धीची भावना व्यक्त झाली. गणरायाच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात आरती संपन्न झाली.**

### ११ दिवसांच्या शिवपाठाने चन्नबसवेश्वर गणेश मंडळ परिसर भक्तिमय



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ : गणेशोत्सवानिमित्त श्री चन्न बसवेश्र्वर गणेश मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ११ दिवसांच्या नियमित शिवपाठ कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दररोज होणाऱ्या या धार्मिक उपक्रमामुळे मंडळ परिसरात भक्तीमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

शिवपाठाच्या माध्यमातून महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, भक्तिमय वातावरणात सामूहिक पठण केले जात आहे. शि. भ. प. राम पानगावे, शि. भ. प. उमाकांत चाकोते, शरद धुमाळे, युवा कीर्तनकार पंकज शिंदाळकर व अभय जळकोटे यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली आहे.

गणेशोत्सवाच्या प्रत्येक दिवशी नियमितपणे शिवपाठाचे आयोजन करून मंडळाने धार्मिक परंपरेसोबत सामूहिक भक्तीचा उपक्रम सुरू ठेवला आहे. शिवपाठाच्या वेळी भाविक भक्तीत तल्लीन होत असल्याचे चित्र पाहायला मिळत असून, या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

### परमेश्वर सातपुते यांचा भागवत वंगे यांच्याकडून सत्कार



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २१ सप्टेंबर : उबाटा सेनेचे तालुकाध्यक्ष भागवत वंगे यांच्याकडून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे लातूर जिल्हा लोकसभा मतदारसंघाचे नूतन जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून परमेश्र्वर सातपुते यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या वतीने सत्कार करण्यात आला.

लातूर येथील रेस्ट हाऊस येथे निलंगा विधानसभा मतदारसंघ व शिरूर अनंतपाळ तालुक्याच्या वतीने हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी सातपुते यांचा सत्कार करून त्यांच्या नूतन जबाबदारीबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी निलंगा तालुकाप्रमुख अविनाशदादा रेशमे, शिरूर अनंतपाळ तालुकाप्रमुख भागवत वंगे, शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. आण्णासाहेब मिरगाळे, शहरप्रमुख सुनील नाईकवाडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### आमदनी अठ्ठन्नी खर्चा रूपय्या टोमॅटो बाजारातील दराच्या चढ उतारात बागायतदार गारद

# बाजारात भाव मिळत नसल्याने फवारणी करून उभी बाग संपवली

तभा वृत्तसेवा/सुधीर गंगणे

औसा दि.२१ सप्टेंबर : यावर्षी निसर्गाच्या तडाख्यातून कोरडवाहू,फळ बागायतदार शेतकऱ्यांसह भाजीपाला बागायतदार शेतकरी सुध्दा सुटले नाहीत.यंदा अत्यंत कमी पाऊस आणि रोगराई वर्षापेक्षा अधिक असल्याने रासायनिक औषधांचा खर्च दुप्पट झाला. असून बाजारात मिळणाऱ्या सहाशे सातशे रूपयांच्या दरापासून पन्नास रूपये कॅरेटच्या पडत्या दरामुळे आमदनी अठ्ठणी खर्चा रूपय्या अशी परिस्थिती झाली आहे.शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळतील. अशी शासनाची कोणतीही ठोस योजना आजतरी उभी नसल्याने एकरात उत्पादन घेण्यासाठी खर्च लाख रूपयांपेक्षा जास्त करून उत्पन्न ४० हजार हातात आले आहे. यामुळे ओसा तालुक्यातील आशिव येथील शेतकरी रसूल गफूरभाई शेख यांना चार एकर टोमॅटो शेतीतून भांडवली पाच लाख रूपयांपेक्षा अधिक नुकसान झाले आहे.



निसर्गाच्या असमतोलामुळे कोरडवाहू, बागायतदार आणि भाजीपाला बागायतदारांना नेमके कोणते पीक घ्यावे.हे आजपर्यंत शेतकऱ्यांना कळाले नाही.पारंपरिक पध्दतीला संकरीत वाणांची जोड देत कृषी सल्लागारांच्या मदतीने वाणांची आणि उत्पादनाची सांगड घालून शेती करण्याची पध्दत आज विकसीत झाली आहे.कोणत्या वर्षी अधिक पाऊस,कोणत्या वर्षी कमी, कोणत्या वर्षी अवेळी तर कोणत्या वर्षी अत्यंत कमी पाऊसमान होत आहे.यातून उत्पादनाचा गाडा सुरळीतपणे चालायचं सोडा फिरत पण नाही.सोयाबीन,उडीद,मुग,तूर,गहू,हर भरा,ऊस अशा पारंपरिक पध्दतीला आशिव येथील शेतकरी रसुल शेख यांनी बगल देत वांगे,मिरची,भेंडी,भोपळा,पेरू, फुलकोबी,शेवगा, बीट या भाजीपाला वर्गीय शेतीकडे आपला मोर्चा वळवला.यावर्षी दोन एकर टोमॅटो ची लागवड करण्यासाठी नांगरणी,रोटर करून जमिनीची मशागत केली.एकरी आठ हजार रोपे प्रमाणे दोन एकरासाठी ३०हजार रूपयांचा रासायनिक खतांचा डोस टाकून १६हजार रोपांची लागवड केली. यानंतर ठिंबक बसवून घेतले.७०हजार रूपयांचे वेळू, बांधणीसाठी तार व सुतळीसाठी २५ हजार रूपये खर्च केला.उत्पादन चांगले व्हावे. यासाठी ३०हजार रूपयांचा लिक्विड खतांचा वापर करण्यात आला.

गेल्या तीन महिन्यांपासून उन्हाळ्यातील ऊणापेक्षा अधिक उष्णता आणि अधूनमधून पडणाऱ्या जेमतेम पावसामुळे यावर्षी फवारणीचा खर्च दुपटीने वाढला.पण बाग टिकवून उत्पादन मिळवायचे अशी खुणगाठ मनाशी बांधून बाग जगविर्णाय़ा शेतर्क़यांवर अखेर नुकसानीचीच वेळ आली आहे. बाजारात मिळणाऱ्या २०ते२५ किलोच्या एका कॅरेटला ८०,१००,१२०,१४०,१५०,१७० रूपयांमुळे तोडीची मंजूरी व लागणारा मजुरीचा खर्च कमी होईना. तसेच बाजारात भाव कमी झाल्याने लागर्णाय़ा रासायनिकऔषध व खतांचे भाव कमी होईनात यामुळे दोन एकरात केवळ १२०० कॅरेटचे उत्पादन घेऊन दोन एकरात ८३ हजार हातात आले.आणि खर्च दोन लाख रूपयांपेक्षा अधिक झाला आहे. होर्णाय़ा खर्चाचा आणि उत्पन्नाचा ताळमेळ टोमॅटो बागेतून होत नसल्याने सात लिटर राऊंड अपची फवारणी बागेवर करून उभी टोमॅटो ची बाग करपावून टाकली आहे. तर दोन एकर शेवग्यातील टोमॅटो च्या बागेतील सुरू असलेला तोडा केवळ बाजारात मिळणाऱ्या भावामुळे बंद करण्यात आला आहे. यामुळे एका पाठोपाठ दोन बागेतून भांडवली पाच लाख रूपयांपेक्षा अधिक नुकसान झाले आहे.यामुळे आता शेती कशी करावी.आणि पीके कोणती घ्यावी.हा मोठा प्रश्र्न निर्माण होत आहे.

## औसा शहरातील स्वच्छता ठप्प; नागरिक त्रस्त एमआयएमचा तीव्र आंदोलनाचा इशारा

तभा वृत्तसेवा

औसा दि.२१ सप्टेंबर : औसा शहराच्या स्वच्छतेचा प्रश्र्न गंभीर बनला असून गेल्या १० ऑगस्टपासून स्वच्छतेचे काम ठप्प असल्याचा आरोप करून नगर परिषदेच्या हद्दीतील शहराची स्वच्छता तात्काळ सुरू करून सुरळीत करावी.अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा एमआयएमचे औसा प्रमुख सय्यद मुजफ्फरअली इनामदार यांनी मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.



औसा शहरातील स्वच्छतेचे काम ठेकेदार पद्धतीने करण्यात येत होते. संबंधित ठेकेदारांचा ठेका संपल्यानंतर १० ऑगस्टपासून स्वच्छतेचे काम बंद झाले आहे. त्यामुळे शहरातील प्रभागांसह मुख्य रस्ते आणि शहरात येणाऱ्या मार्गांवर ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. सुट्टीच्या दिवशी स्वच्छता कर्मचारी उपलब्ध नसल्याने काही ठिकाणी कचरा तसाच पडून राहत असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या साचलेल्या कचऱ्यांमुळे नागरिकांना तसेच लहान मुलांना त्रास सहन करावा लागत आहे.शहरातील अस्वच्छतेमुळे डासांची उत्पत्ती होऊन माफीच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे.यातूनडेंग्यूसारख्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.अशी चिंता निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.शहरात पसरलेल्या या घाणीच्या साम्राज्यामुळे शहरवासी अनेक दिवसांपासून रस्ते व परिसराच्या नियमित स्वच्छतेची प्रतीक्षा करीत असल्याचेही त्यात म्हटले आहे.

नगर परिषद प्रशासनाने शहरातील स्वच्छतेची तातडीने दखल घेऊन सर्वच प्रभाग व प्रमुख रस्त्यांची स्वच्छता करून घ्यावी, अशी मागणी सय्यद मुजफ्फरअली इनामदार यांनी केली आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास औसा नगर परिषद प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## बोरोळ ग्रामस्थांचा ग्राम पंचायत कार्यालयावर घागर मोर्चा



तभा वृत्तसेवा

देवणी दि. २१ सप्टेंबर : महाराष्ट्रातील विविध ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाई, अनियमित पाणीपुरवठा आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाविरुद्ध संताप व्यक्त करण्यासाठी ग्रामस्थ आणि महिला कडून बोरोळ ग्रामपंचायत कार्यालयांवर 'घागर मोर्चा' काढण्यात आला.

सध्या लातुर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पाऊस झाला नसल्याने दुष्काळ सर्दस्य परिस्थितीत अनेक गावांमध्ये मुबलक जलसाठा किंवा पाणी योजना असूनही नळांना पाणी येत नाही, ज्यामुळे महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे.संतप्त महिला व ग्रामस्थ हातात हंडे, घागरी घेऊन पाणी द्या, नाहीतर खुर्ची खाली करा अशा घोषणा देत ग्रामपंचायतीवर मोर्चा काढण्यात आला. मोर्चानंतर ग्रामपंचायत पदाधिकारी आणि सरपंच यांच्याशी मोर्चा करांचा खडाजंगी झाली. लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्र्वासन सरपंच कृष्णा पाटील यांनी मोर्चे करांना दिले.

मराठवाड्यात पाऊस झाला नसल्याने मोठ्या प्रमाणावर दुष्काळाला सामोरे जावे लागले आहे. मोठे साठवण तलाव पुर्ण पणे आटली आहेत.जुन महिन्यापासून पाऊस पडला नसल्याने नदी, नाले, बोर आणि विहिरी आटल्यांने पाणी प्रश्र्न गंभीर बनत गेला आहे. यातच बोरोळ येथील महिला व ग्रामस्थांनी घागर मोर्चा काढून ग्राम पंचायतीवर तीव्र नाराजगी व्यक्त केली. हा मोर्चा सकाळी ०९:३० ते ११:३० असा तब्बल दोन तास गोंधळ मय परिस्थितीत झाला.या मोर्चाचे नेतृत्व देवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य माधवराव बालुरे आणि तंटामुक्ती अध्यक्ष काशीनाथ मामा शेंडगे यांनी केले.

## विविध मागण्यांसाठी नगरपंचायतीवर नागरिकांचा धडक मोर्चा



तभा वृत्तसेवा

प्रभाग क्रमांक ६ मधील ६० ते ७० महिला-पुरुषांचा सहभाग; मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाचे लक्ष वेधले शिरूर अनंतपाळ : शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील विविध प्रलंबित नागरी समस्यांकडे नगरपंचायतीचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांच्या वतीने हलगी वाजवत नगरपंचायतीवर धडक मोर्चा काढण्यात आला. जिल्हा परिषद शाळेपासून समतानगरमार्गे नगरपंचायत कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चात सुमारे ६० ते ७० महिला व पुरुष नागरिक सहभागी झाले होते.

प्रभाग क्रमांक ६ मधील बंद असलेल्या स्ट्रीट लाईटची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, गेल्या वर्षभरापासून सुरू असलेली पाण्याची समस्या सोडवून नियमित पाणीपुरवठा करावा, तसेच प्रभागातील सर्व तुंबलेल्या गटारी तातडीने साफ करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

मोर्चावेळी लक्ष्मी मल्लिशे, रब्बाना शेख, भागुबाई माडीबोने, यशोदा धडे, गोपिका नवरखेले, सविता आवले, पार्वती आवले, सुरेखा धुमाळे, हमीद तांबोळी, सूर्यकांत गलबले, बस्वराज सोनटक्के, पांडुरंग म्हेत्रे, सचिन गुगळे, रोहित हरणे, आकाश भोसले, हणमंत कांबळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)चे माजी शहराध्यक्ष संदिप धुमाळे, असिफ उजेडे, मधुकर धुमाळे यांच्यासह समतानगर व शहरातील नागरिक उपस्थित होते.

## उदगीरात जयपूर फूट, हात मोजमाप शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद रोटरी क्लब सह अन्य संस्थाचा पुढाकार

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २१ सप्टेंबर : येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या पुढाकारातून दिव्यांग बांधवासाठी जयपूर फूट हात व पाय मोजमाप शिबीर शनिवारी येथील उपजिल्हा रुग्णालयात पार पडले. या शिबिरात एकूण ९० दिव्यांग बांधवाच्या हात व पायाचे मोजमाप घेतले असून लवकरच एका कार्यक्रमात सदरील जयपूर फूट हात व पायाचे वाटप करण्यात येणार आहे.



रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल यांच्या पुढाकारातून व रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, लातूर, श्री नवयुवक व्यापारी गणेश मंडळ, उदगीर, सक्षम दिव्यांग सेवा केंद्र, उदगीर, रोट्रॅक्ट क्लब ऑफ स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ नर्सिंग, उदगीर यांच्या सहयोगाने दिव्यांग बांधवासाठी जयपूर फूट हात व पाय मोजमाप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात गुडघ्या खालील पायाचे ३५ दिव्यांग, गुडघ्या वरील पायासाठी १७ दिव्यांग, हातासाठी ०५ दिव्यांग, कॅलिपर साठी ०१ दिव्यांग आणि ३० दिव्यांगाना कुबडे देण्यात आले.

यावेळी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी भारत कांबळे, उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत देशपांडे, रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलचे अध्यक्ष ॲड. विक्रम संकाये, उपाध्यक्ष विजयकुमार पारसेवार, सचिव डॉ. सुधीर जाधव, प्रोजेक्ट चेअरमन विशाल जैन, सक्षम संस्था उदगीरचे रविकिरण बेळकुंदे, प्रशांत मांगुळकर, संतोष फुलारी, प्रमोद शेटकार, मोतीलाल डोईजोडे, डॉ. दत्तात्रय पाटील, महानंदा सोनटक्के, प्रा. मंगला विश्र्वनाथे, सरस्वती चौधरी, विशाल तोंडचिरकर, निशांत धवलशंख, रामभाऊ सोनटक्के, रामदास जळकोटे, नारायण वाकुडे, तानाजी वाकुडे, व्यंकट कणसे, विद्या पांढरे, उदय धुर्वे, अजय अंबेसंगे, कमलेश पेठे, रत्ननिधी फाउंडेशनचे राजेश माने यांच्यासह रोटरॅक्ट क्लब ऑफ स्वामी विवेकानंद नर्सिंग , रोटरेक्ट क्लब ऑफ स्वामी विवेकानंद फार्मसीचे पदाधिकारी, रोटरी सदस्य उपस्थित होते.

## वलांडीच्या आरोग्य केंद्रात उपचारा ऐवजी समस्यांचीच गर्दी

### ४० गावांचा आरोग्य भार एका अधिकाऱ्यावर; रिक्त पदे, औषधांचा तुटवडा अन् प्रसूती सेवांचा बोजवारा


तभा वृत्तसेवा

वलांडी दि. २१ सप्टेंबर : कर्नाटक सीमाभागासह सुमारे ४० गावांतील नागरिकांच्या आरोग्याचा आधार असलेल्या देवणी तालुक्यातील वलांडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कारभारच सध्या आजारी पडल्याचे चित्र आहे. दररोज २०० हून अधिक रुग्णांची तपासणी, तर शुक्रवारी आठवडी बाजाराच्या दिवशी सुमारे ४०० रुग्णांची गर्दी होत असतानाही केंद्रातील रिक्त पदे,अपुरे मनुष्यबळ, औषधांचा तुटवडा आणि आवश्यक सुविधांचा अभाव कायम आहे. परिणामी उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांनाच गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.

वलांडी, जवळगा, धनेगाव, कवठाळा, वडमुरंबी आणि दवणहिप्परगा या उपकेंद्रांसह परिसरातील नागरिक या केंद्रावर अवलंबून आहेत. वलांडी हे कर्नाटक सीमेवरील प्रमुख बाजारपेठ असल्याने सीमाभागातील नागरिकही उपचार, प्रसूती आणि इतर आरोग्य सेवांसाठी येथे येतात. एवढा मोठा आरोग्यभार असतानाही तीन वैद्यकीय अधिकारी पदांपैकी एक महिला वैद्यकीय अधिकारी प्रसूती रजेवर असल्याने सध्या एका वैद्यकीय अधिकाऱ्यावरच मोठा कारभार येऊन पडला आहे.

आरोग्यसेविका, शिपाई, तंत्रज्ञ यांसह विविध पदे रिक्त असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे. विशेषतः रक्त तपासणीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने रुग्णांना बाहेरील खासगी यंत्रणांचा आधार घ्यावा लागत आहे. रोजच्या रुग्ण तपासणीवर त्याचा थेट परिणाम होत असून, उपचारासाठी आलेल्या गरीब आणि सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांचीही गैरसोय होत असल्याच्या तक्रारी आहेत. प्रसूतीनंतर घडलेल्या काही दुर्घटनांमुळे महिला आणि नवजात बाळांना त्रास सहन करावा लागल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रसूती सेवांबाबत सुरक्षितता आणि आवश्यक मनुष्यबळाचा प्रश्र्न ऐरणीवर आला आहे. कुटुंब कल्याणाच्या शस्त्रक्रियाही मोठ्या प्रमाणात होत असताना मूलभूत सुविधांकडे होणारे दुर्लक्ष गंभीर ठरत आहे.



औषधांचा तुटवडाही रुग्णांच्या जखमेवर मीठ चोळणारा ठरत आहे. आवश्यक औषधांची मागणी केल्यानंतर 'सध्या एवढीच औषधे उपलब्ध झाली आहेत', असे उत्तर दिले जात असल्याची नागरिकांची तक्रार आहे. सरकारी आरोग्य केंद्रात मोफत उपचाराच्या अपेक्षेने येणाऱ्या रुग्णांना औषधे व तपासण्यांसाठी खासगी केंद्रांचा आधार घ्यावा लागत असल्याने 'सरकारी आरोग्यसेवा नेमकी कोणासाठी?' असा प्रश्र्न उपस्थित होत आहे.

# काजू खा...बदाम खा...पण शेतकऱ्यांना मदत करा : आ. रोहित पवार
## शेतकऱ्यांच्या बांधावर, शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार मदत करा...!

**अंबाजोगाई :** "काजू खा... बदाम खा... पण शेतकऱ्यांना मदत करा," अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी देवेंद्र फडणवीस सरकारकडे केली.

अंबाजोगाई तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणी दरम्यान रविवारी (दि. 20 सप्टेंबर) त्यांनी दगडवाडी येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यावेळी माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, मराठवाड्यात दुष्काळाचे विदारक चित्र आहे. सोयाबीनचे पीक 100 टक्के वाया गेले असून खरीपातील इतर पिकांची अवस्थाही गंभीर आहे. संपूर्ण खरीप हंगाम वाया गेले असून पाऊस नसल्याने रब्बी हंगामाचीही आशा राहिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तातडीची मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी माध्यमांशी बोलताना रोहित पवार म्हणाले की, मराठवाड्यात दुष्काळाचे विदारक चित्र आहे. सोयाबीनचे पीक 100 टक्के वाया गेले




असून खरीपातील इतर पिकांची अवस्थाही गंभीर आहे. संपूर्ण खरीप हंगाम वाया गेला असून पाऊस नसल्याने रब्बी हंगामाचीही आशा राहिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी 50 हजार रुपये तातडीची मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**5 ऑक्टोबरपर्यंत वाट पाहू नका...! :** सरकार दुष्काळ जाहीर करण्याबाबत वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. "कर्नाटक सरकारने शेतकऱ्यांसाठी योग्य पावले उचलून दुष्काळ जाहीर केला आहे. मात्र, महाराष्ट्र सरकार अजूनही 5 ऑक्टोबरची वाट पाहत आहे.परतीच्या पावसाने परिस्थिती बदलेल आणि सरकारचे पैसे वाचतील, अशी अपेक्षा सरकारला आहे. परंतू, तोपर्यंत शेतकरी देशोधडीला लागलेला असेल, असे ते म्हणाले. त्यामुळे कोणाचीही वाट न पाहता राज्य सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली.

**24 सप्टेंबरला बीडमध्ये शेतकऱ्यांचा मोर्चा :** बीड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांच डोक ठिकाणावर आणण्यासाठी 24 सप्टेंबर रोजी बीड येथे शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती रोहित पवार यांनी दिली. या मोर्चात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. आमदार रोहित पवार यांच्या दुष्काळी पाहणी दौऱ्यात आमदार संदीप क्षीरसागर, राजेसाहेब देशमुख, माजी आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.नरेंद्र काळे, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, तालुकाध्यक्ष अमर देशमुख शहराध्यक्ष ॲड. ईस्माइल चौधरी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## अनिल गलांडे व सचिन साखरे झुंजार पत्रकार संघात




**केज! प्रतिनिधी :** केज येथील झुंजार पत्रकार संघ हा अल्पावधीत नावारुपास आलेल्या संघ आहे , झुंजार पत्रकार संघामध्ये दै.तरुण भारत चे केज तालुका प्रतिनिधी अनिल गलांडे आणि सचिन साखरे यांची झुंजार पत्रकार संघात निवड करण्यात आली आहे.


पत्रकारितेच्या क्षेत्रातील त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान, सामाजिक बांधिलकी विचारात घेऊन झुंजार पत्रकार संघाचे ज्येष्ठ सतीश केजकर ,व महादेव दळवे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल बोलताना वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, "दोन्ही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या अनुभवाचा फायदा झुंजार पत्रकार संघास मजबूत करण्यासाठी आणि पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी निश्चितच होईल."

आपल्या निवडीनंतर अनिल गलांडे व सचिन साखरे यांनी झुंजार पत्रकार संघाचे आभार मानले. "पत्रकारांच्या न्याय्य हक्कासाठी लढा देणे आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध राहणे हेच आमचे प्राथमिक ध्येय असेल," असा विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

या निवडीचे वृत्त समजताच पत्रकारिता, राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून अनिल गलांडे आणि सचिन साखरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यावेळी झुंजार पत्रकार संघाचे वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी संस्थापक अध्यक्ष दशरथ चवरे,सचिव रमेश इतापे, जेष्ठ पत्रकार सतीश केजकर,महादेव दळवे, विनायक ठोंबरे, दत्तात्रय हंडिबाग, नंदकुमार मोरे, दिनकर राऊत मुबशीर खतीब, दादासाहेब आगे, आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

## DYSP वेंकटराम पथकाचा पहाटे जुगाऱ्यांना दणका !
### 14 जुगारी ताब्यात; 4 लाख 22 हजार 170 रुपयांचा मुद्देमाल जप्त

बीड (प्रतिनिधी)बीड शहरातील अवैध धंद्यांविरोधात DYSP वेंकटराम यांच्या पथकाने कारवाईचा धडाका सुरूच ठेवला आहे.हिरालाल चौक परिसरातील पांडे गल्ली येथे सुरू असलेल्या पत्त्यांच्या जुगार अड्ड्यावर दिनांक 21 सप्टेंबर सोमवार रोजी पहाटे छापा टाकून पोलिसांनी तब्बल 14 जणांना ताब्यात घेत त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या कारवाईत रोख रक्कम, जुगाराचे साहित्य व इतर साहित्य असा एकूण 4 लाख 22 हजार 170 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.




शहरातील हिरालाल चौक पांडे गल्ली,बीड परिसरातील एका ठिकाणी काही इसम पत्त्यांवर पैशांची हार-जीत लावून जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा करून DYSP वेंकटराम यांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा मारला.

या कारवाईमध्ये रोख रक्कम, पत्ते आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ₹4,22,170 किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 0295/2026 नुसार महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, 1887 मधील कलम 4 व 5 अन्वये 14 जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरु आहे.

अवैध धंद्यांविरोधात पथकाची मोहीम सुरूच.

डीवायएसपी वेंकटराम यांच्या पथकाकडून मागील काही महिन्यांपासून जुगार अड्डे, विनापरवाना वाळू वाहतूक व साठा यांसह विविध अवैध धंद्यांविरोधात सातत्याने कारवाया करण्यात येत आहेत. यापूर्वी शिवाजी नगर,पेठ बीड सह बीड बायपास रोडवरील संभाजी राजे चौक परिसरातील एका शेताजवळील घरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावरही कारवाई करण्यात आली होती.

शहरातील जुगार आणि इतर अवैध धंद्यांविरोधातील कारवाई अधिक तीव्र करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. कारवाईनंतर पुन्हा त्याच ठिकाणी अवैध धंदे सुरू होणार नाहीत, यासाठी पोलिसांनी सातत्याने कारवाया कराव्यात तसेच बीड शहर, ग्रामीण व जिल्ह्यातील "परवानाच्या" नावाखाली, नियमाची पायमल्ली करणाऱ्या व रात्रंनदिवस चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर देखील कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि डीवायएसपी वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत PSI सय्यद, पोलीस हवालदार राहुल शिंदे, अशोक दराडे तसेच पोलीस अंमलदार अविनाश सानप, कुलदीप औसरमल, शशिकांत ढाकणे आणि विशाल जगताप सहभागी झाले.

## सावरकर महाविद्यालयात आज 'अ‍ॅकेडमीक बँक ऑफ क्रेडिट' कार्यशाळा

बीड (प्रतिनिधी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड यांचे संयुक्त विद्यमाने आज दि. 22 सप्टेंबर रोजी बीडमध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.पीएम उषा प्रकल्पांतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या अनुषंगाने उच्च शिक्षणातील विद्यार्थी केंद्रित व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी 'अकॅडमी बँक ऑफ क्रेडिट' आणि 'मल्टिपल एंट्री मल्टिपल एक्झिट' या संकल्पनावर प्राचार्य व कर्मचाऱ्यांना प्राचार्य संजय चाकणे, प्रोफेसर विलास खंदारे हे मार्गदर्शन करणार आहेत. उदघाटनाला भाशिप्र संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र अलूरकर, महाविद्यालय समिती अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे यांची उपस्थिती राहणार आहे. तर समारोप सत्राला संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष डॉ.पी.के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे हे उपस्थीत राहणार आहेत. या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रकल्प समन्वयक डॉ. सय्यद अझरुद्दीन, प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले आहे.

## दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जलस्रोत वाचवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जगताप यांची न.प.कडे मागणी

**किल्ले धारूर, :** किल्ले धारूर शहरात आगामी शुक्रवारी (२५ सप्टेंबर) होणाऱ्या गणेशमूर्ती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पाणी प्रदूषण टाळण्यासाठी नगर परिषदेने तातडीने कृत्रिम विसर्जन तलाव उभारावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जगताप यांनी केली आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे असल्याने ही सुविधा उपलब्ध करून देण्याची विनंती त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

सूर्यकांत जगताप यांनी नगर परिषदेच्या नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना सादर केलेल्या अर्जात नमूद केले आहे की, शहरात सध्या तीव्र पाण्याचा तुटवडा असून नैसर्गिक जलस्रोतांमधील पाण्याची पातळी घटली आहे. अशा परिस्थितीत मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्रोतांमध्ये झाल्यास पाणी दूषित होऊन नागरिक, जनावरे आणि स्थानिक पर्यावरणावर गंभीर विपरीत परिणाम होऊ शकतात.



"नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी सर्व गणेश मंडळांना आणि गणेशभक्तांना सुरक्षित विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची सुविधा मिळणे आवश्यक आहे. यासोबतच प्रशासनाने जलप्रदूषण टाळण्याबाबत गणेश मंडळांमध्ये लेखी सूचना देऊन जनजागृती करावी," असे प्रतिपादन सूर्यकांत जगताप यांनी आपल्या अर्जात केले आहे.

किल्ले धारूर येथे दुष्काळी परिस्थिती असल्याने पाण्याचे व्यवस्थापन हा अत्यंत संवेदनशील विषय बनला आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शहरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होतो आणि मोठ्या संख्येने मूर्तींचे विसर्जन केले जाते. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी व उपलब्ध पाण्याचे संवर्धन करण्यासाठी कृत्रिम तलाव उभारण्याचा निर्णय तातडीने घेणे गरजेचे असल्याचे अर्जात नमूद केले आहे. दरम्यान, प्रस्तावित कृत्रिम विसर्जन तलावाच्या ठिकाणी प्रशासनाने पुरेशी प्रकाशयोजना, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वयंसेवक तसेच विसर्जनानंतर मूर्ती व निर्माल्य व्यवस्थापनाची योग्य सोय उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धेत कार्तिकी मिसाळ हिची निवड झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठान कडून सन्मानित



**बीड (प्रतिनिधी ) :**ब्राझील येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी ' वर्ल्ड स्कूल गेम्स 2026' ची राष्ट्रीय तायक्वांदो पदक विजेती,

राज्यातील एकमेव महिला खेळाडू, पोद्दार इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी कु. कार्तिकी संदीप मिसाळ हिची मुलींच्या 68 किलो वरील वजन गटामध्ये भारतीय संघात निवड झाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने दि. 19 सप्टेंबर 2026 शनिवार रोजी तिचा सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब जायभाये यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन राज्यस्तरीय क्रीडा रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.यावेळी पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, लक्ष्मण चाटे, बाजीराव ढाकणे, कुंडलिक पालवे, गोरखनाथ मिसाळ, कार्तिकीचे पालक सौ. शितल मिसाळ व श्री संदीप मिसाळ आदींची उपस्थिती होती.

**सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अजिंक्य शिराळे मातृभूमी प्रतिष्ठान कडून सन्मानित बीड(प्रतिनिधी) :** मोरया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने सालाबादप्रमाणे याही वर्षी जिल्ह्यातील सर्वात उंच 19 वा भगवाधारी गणेश मूर्तीची स्व:खर्चाने स्थापन करून रक्तदानासह, विविध सामाजिक उपक्रम राबवीत असल्याबद्दल मोरया सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अजिंक्य भैय्या शिराळे यांचा मित्रनगर चौक येथे दि. 20 सप्टेंबर 2026 रविवार रोजी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी त्यांचा पुष्पगुच्छ,सन्मानपत्र देऊन समाज रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात आला.यावेळी पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, संदीप उबाळे, अशोक शेजवळ,भगवान जाधव दिनेश ठेंगे,लक्ष्मण चाटे आदींची उपस्थिती होती.

## अमली पदार्थांच्या विळख्यातून बीडला मुक्त करणार; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा कठोर पवित्रा!

**बीड, दि. 21 (जिमाका):** जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या वापराला आळा घालण्यासाठी आणि क्षेत्रीय स्तरावरील ही समस्या समूळ नष्ट करण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अमली पदार्थ प्रतिबंधात्मक समितीची महत्त्वाची बैठक पार पडली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासकीय यंत्रणेला अमली पदार्थांच्या विरोधात 100 टक्के कडक कारवाया करण्याचे आदेश दिले असून, व्यसनमुक्तीसाठी संबंधित यंत्रणेने आता पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर येणे गरजेचे असल्याचे स्पष्ट केले.




* **कठोर कारवायांचे आदेश:** शाळा आणि महाविद्यालयीन परिसरामध्ये अमली पदार्थांच्या विरोधात 100 टक्के कडक कारवाया करण्याचे यंत्रणेला स्पष्ट निर्देश.
* **COTPA अंतर्गत कारवाई:** कोटपा (COTPA) कायद्याचे कठोर पालन करून जास्तीत जास्त तंबाखूजन्य व अमली पदार्थ जप्त करण्यावर भर.
* **शैक्षणिक संस्थांचा सहभाग:** शासन निर्णयानुसार मुख्याध्यापक, गट शिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुखांवर अमली पदार्थ विरोधी कारवायांची मोठी जबाबदारी.
* **जनजागृती आणि ॲक्शन मोड:** शाळांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबवून संशयितांवर व समाजकंटकांवर कायदेशीर बडगा उगारण्याचे निर्देश.

बैठकीच्या सुरुवातीला बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी 'कोटपा' (COTPA) कायद्यांतर्गत जिल्ह्यात जास्तीत जास्त कारवाया करून अमली पदार्थ व तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्याच्या सूचना दिल्या. विशेषतः माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती मोहीम राबवण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

मुख्याध्यापक आणि शिक्षणाधिकाऱ्यांची भूमिका महत्त्वाची शासन निर्णयाचा संदर्भ देत जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, 10 जुलै 2023 च्या आरोग्य विभागाच्या शासन निर्णयानुसार सर्व केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी, शिक्षण अधिकारी आणि मुख्याध्यापकांना अमली पदार्थ तसेच तंबाखू विरोधी कारवाया करण्याचे अधिकार व सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता केवळ प्रशासनावर भिस्त न ठेवता, मुख्याध्यापकांनीदेखील या समाजसुधारणेच्या कामात हिरिरीने पुढे यावे. विद्यार्थ्यांना व्यसनाधीन बनवणाऱ्या प्रत्येक समाजकंटकाविरुद्ध एकजूट होऊन सक्त कायदेशीर कारवाया करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

अमली पदार्थांचे सेवन तरुण पिढीला उद्ध्वस्त करत असून, याला वेळीच वेसण घालण्यासाठी पोलीस प्रशासन, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाने समन्वय साधून संयुक्त मोहीम राबवावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या बैठकीत केले.

## कोल्हेवाडी, जीवाचीवाडी, तरनळी येथे सोयाबीन कापणी, मळणी, साठवणूक प्रशिक्षण संपन्न



केज - पुढील खरीप हंगामा करिता शेतकऱ्यांनी घरचे बियाणे वापरून उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीने दर्जेदार बियाणे निर्मितीसाठी कृषी विभागामार्फत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, उपविभागीय कृषी अधिकारी राहुल गायकवाड, तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (एनडीकेएसपी) अंतर्गत कोल्हेवाडी, जीवाचीवाडी तरनळी येथे सोयाबीन पिकाची शेतीशाळा घेऊन उपविभागीय तंत्रज्ञान समन्वयक शिवप्रसाद येळकर यांनी दर्जेदार सोयाबीन बियाणे निर्मितीसाठी शेतकऱ्यांना बुरशीजन्य रोगग्रस्त झाडांची निरीक्षणे दाखवून काढणी करताना रोगग्रस्त, पाण्या किंवा चिखलामध्ये बुडून खराब झालेले झाडे निवडू नयेत, दोन वेगवेगळ्या जातींचे सोयाबीनचे ढीग वेगवेगळे करणे, सोयाबीन काढणी करताना झाड उपटून घेतल्यामुळे मुळांना माती चिटकून येते त्यामुळे शेतमालामध्ये मातीचे प्रमाण वाढून भाव कमी मिळतो त्यामुळे काढणी करताना व्यवस्थित विळ्याच्या साह्याने सोयाबीनचे झाड कापून घ्यावे. मळणी करताना बियाणे फुटू नये यासाठी मळणी यंत्राची गती ३०० ते ३५० फिरे प्रतिमिनिट ठेवावी, बियाणे उन्हामध्ये वाळवून ओलाव्याचे प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी करून सुतळी पोत्यांमध्ये हवेशीर जागेत ठेवावे. थप्पी ७ फुटांपेक्षा जास्त उंच ठेवू नये याची माहिती दिली. तसेच ठिबक व तुषार सिंचनासाठी आगाऊ अनुदान पद्धतीबाबत माहिती देऊन पाण्याचा काटकसरीने वापर करून दुष्काळी परिस्थितीत रब्बी पिकांची जोपासना करण्यासाठी सूक्ष्म सिंचनाचे महत्त्व स्पष्ट केले.

## हरिहर तीर्थ कोरडे... आता गणेशमूर्तींचे विसर्जन कसे करायचे? भक्तांसमोर प्रश्न



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी :**

श्री गणेश विसर्जनाला अवघे पाच दिवस शिल्लक असताना ज्योतिर्लिंग प्रभू श्री वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागील पुरातन श्री हरिहर तीर्थ कोरडे ठाक पडले आहे. त्यामुळे यंदा मोठ्या गणेशमूर्तींसह घराघरांत प्रतिष्ठापना केलेल्या गणेशमूर्तींचे विसर्जन कसे करायचे, असा प्रश्न गणेशभक्तांसमोर निर्माण झाला आहे. गणेश विसर्जनासाठी प्रशासनाने तातडीने योग्य, सुरक्षित आणि पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

परळी शहरात यंदा विविध गणेश मंडळांनी मोठ्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे. त्याचबरोबर असंख्य नागरिकांनी आपल्या घरांमध्येही गणरायाची स्थापना केली आहे. गणेश विसर्जनाच्या दिवशी या लहान-मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी योग्य ठिकाणी पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. मात्र, हरिहर तीर्थातच पाणी नसल्याने गणेशभक्तांसमोर विसर्जनाचा प्रश्न उभा राहिला आहे. "हरिहर तीर्थात पाणी नसल्यामुळे मोठ्या गणेशमूर्तींसह घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन कसे करायचे, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने विसर्जनासाठी तातडीने सुरक्षित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक पर्यायी व्यवस्था करावी," अशी मागणी ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

पावसाचे पाणी हरिहर तीर्थाकडे वळविण्याची मागणी

मागील काही दिवसांपासून परळी शहर परिसरात पावसाला सुरुवात झाली आहे. डोंगरदऱ्यांतून वाहून जाणारे पावसाचे पाणी योग्य पद्धतीने हरिहर तीर्थाकडे वळविल्यास त्यात पाणीसाठा होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने उपलब्ध वेळेचा विचार करून याबाबत तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणीही ॲड. संकाये यांनी केली आहे.

विसर्जनासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करा

गणेश विसर्जनासाठी आता अवघे काही दिवस शिल्लक असल्याने प्रशासनाने विलंब न करता विसर्जनस्थळ निश्चित करावे. तेथे पुरेसे पाणी, सुरक्षा व्यवस्था, प्रकाशयोजना तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे. हरिहर तीर्थाचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन भविष्यात येथे कायमस्वरूपी पाणीसाठ्याची व्यवस्था करण्याबरोबरच यंदाच्या गणेश विसर्जनाचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.

## सण-उत्सवाच्या ट्रॅव्हल्सचालकांची दरोडेखोरी; बीडमधून पुणे, मुंबईचे भाडे दुप्पट

बीड, ता. २१ : मी पुण्यात एका खासगी कंपनीत जेमतेम दहा हजारांची नोकरी करतो. वर्षभर हाडाची काडं करून सणाला बायको-पोरांना घेऊन गावी, आपल्या बीडला जायचं म्हणजे आमच्यासाठी एक मोठा आनंदाचा क्षण असतो. पण, हाच आनंद आता या ट्रॅव्हल्सवाल्यांनी अक्षरशः हिरावून घेतलाय. काल मी तिकिट काढायला गेलो, तर नेहमी जे ५०० रुपयांचे तिकीट असते, ते थेट १२०० रुपये सांगण्यात आले. कुटुंबातील चार माणसांचे नुसते जाण्याचे पाच हजार रुपये लागतील. एवढे पैसे कुठून आणायचे? एसटी बसमध्ये पाय ठेवायला जागा नसते, एसटीचे बुकिंग महिनाभर आधीच फुल्ल झालेले असते. याचाच थेट गैरफायदा हे खासगी ट्रॅव्हल्सवाले घेतात. पैसे द्या, नाहीतर दुसरी गाडी बघा, अशी उद्धट उत्तरे त्यांच्या एजंटकडून ऐकावी लागतात. सणाला घरी जाऊन चार घास सुखाचे खावे, तर प्रवासातच आमचं दिवाळं निघतंय. गोरगरिबांनी सण साजरे करायचेच नाहीत का? मायबाप सरकार आणि अधिकारी या उघड लुटीवर गप्प का आहेत? ही अत्यंत प्रातिनिधिक आणि विदारक व्यथा आहे, बीड जिल्ह्यातून कामानिमित्त पुण्या-मुंबईत गेलेल्या हजारो सामान्य चाकरमान्यांची! सण-उत्सवाच्या तोंडावर ट्रॅव्हल्स चालकांच्या या दरोडेखोरीमुळे सर्वसामान्यांचे डोळे पाणावले आहेत.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'महाविस्तार एआय' ॲपमुळे कृषी विषयक माहिती आता एका क्लिकवर : लोखंडे

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २१ सप्टेंबर : राज्याच्या कृषि विभागाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'महाविस्तार एआय' प विकसित केले आहे. या ॲपमुळे शेतकर्यांना शेती विषयी अचूक माहिती आणि मदत एकाच क्लिकवर मिळणार असल्याचे कृषि विभागाचे सूर्यकांत लोखंडे यांनी सांगितले.

गणेशोत्सवानिमित्त माहिती व जनसंपर्क विभागाच्या जिल्हा माहिती कार्यालयामार्फत औसा तालुक्यातील बोरफळ येथील चौकातला राजा गणेश मंडळाच्या सहकार्याने लोकसंवाद २०२६ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे डॉ. ऋषिकेश खारोळकर, कौशल्य विकास अधिकारी गिरीश महामुनी, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, विभागीय माहिती कार्यालयातील सहायक अधीक्षक अशोक माळगे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

पीक वाढीच्या टप्प्यानुसार पीक सल्ला, पीक प्रमाणित कार्यपद्धती, हवामानाचा अचूक अंदाज, खत मात्रा गणक, कीड - रोग ओळख व यावर उपाय, पिकांचे बाजारभाव, यशस्वी शेतकऱ्यांच्या यशोगाथा, गोदाम उपलब्धता याविषयीची माहिती 'महाविस्तार एआय' पवर एकाच ठिकाणी शेतकऱ्यांना उपलब्ध होते. यातील चॅटबॉटद्वारे शेतकऱ्यांनी तोंडी विचारलेल्या प्रश्नांना अचूक व अधिकृत उत्तरे मिळतील, असे लोखंडे यांनी सांगितले.



## विविध वृत्त.....

## झेडपी अध्यक्षांच्याच बंगल्यात चोरी सोन्यासह १६ लाखांचा ऐवज लंपास



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : ज्यांच्या खांद्यावर जिल्ह्याच्या विकासाची धुरा, त्यांचाच बंगला असुरक्षित निघाला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष उषा संभाजी पाटील तळेगावकर यांच्या शासकीय बंगल्याचे कुलूप तोडून चोरट्यांनी १२ लाखांची रोकड आणि चार तोळे सोन्याचे दागिने, असा एकूण १६ लाखांचा ऐवज लंपास केला. एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल - झाला आहे.

१८ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० ते - २० सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजेदरम्यान ही चोरी झाल्याचे तक्रारीत नमूद आहे.. अध्यक्षांचे कुटुंबीय बाहेरगावी गेले असताना चोरट्यांनी शासकीय वसाहतीतील बंगल्याच्या मुख्य दरवाजाचे कुलूप उचकटले. आत शिरून बेडरूमचा दरवाजा तोडला आणि लोखंडी कपाटातील लॉकर फोडून रोकड व दागिने लंपास केले. चोरीला गेलेल्या दागिन्यांत झुमके, सरपाळे आणि चार अंगठ्यांचा समावेश आहे. सकाळी सुमारे ११.१० वाजता वाहनचालक लक्ष्मण राठोड यांनी स्वीय सहायक प्रमोद ज्ञानेश्र्वर साबणे यांना फोनवरून बंगला फोडल्याचे कळवले.

# प्रवाशांच्या सोई - सुविधेकडे बघितले तरच महामंडळ फायद्यात ...





तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. २१ सप्टेंबर : महाराष्ट्रात आता एस टी महामंडळात नवीन अत्याधुनिक२०० व्होल्वो बस सामील होणार असल्याच्या बातम्या वाचल्या . या बसमध्ये१७० आसनी आणि३० शयनयान बस असणार आहेत . दर्जेदार सुविधा आणि एसटी वरील विश्र्वास यांच्या बळावर लांब पल्ल्याच्या प्रवासी सेवेत लालपरी आता दमाने, नव्या रूपात पाहायला मिळेल , अशी माहिती परिवहन मंत्र्यांनी दिली तसेच ते म्हणाले की, विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदा एसटी महामंडळाच्या टप्प्यामध्ये व्हाल्वो बसेस समाविष्य होत असून लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी सध्या अनेक प्रवासी अधिक भाडे देऊन खाजगी आराम बससेवे ला पसंती देतात . वातानुकूलीत आरामदायी आसन व्यवस्था, कमी प्रवास वेळ यामुळे खाजगी बससेवेचा स्वतंत्र प्रवासी वर्ग निर्माण झाला असून या प्रवाशांना एसटी कडे आकर्षित करण्यासाठी केवळ पर्याय उपलब्ध करून प्रवाशांच्या अपेक्षा पूर्ण करणारी सेवा देण्याचे उद्दिष्ट एसटी ने ठेवले आहे

या बसमध्ये दिवसा आरामदायी तर रात्री शयनयानाची सुविधा असून २५० किलोमीटर पेक्षा अधिक अंतराच्या किमान पाच ते सहा तासांच्या प्रवासासाठी आरामदायी४५ आसनी बस तर रात्रीच्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी३० किंवा४५ शयनयान क्षमतेच्या बसेस उपलब्य करून देण्यात येणार आहेत . या बसचे डिजीटल पद्धतीने सहज आरक्षण करता येणार आहे

प्रवाशांना केवळ आरामदायी बसच नव्हे तर हाय एंड प्रवासी सेवांचा अनुभव मिळावा यासाठी नव्या व्होल्वो बसमधील आतिथ्य व्यवस्थापनासाठी खाजगी संस्थेची मदत घेण्यात येणार आहे .

वरील गोष्टींचे स्वागत केले पाहिजे कारण एसटी महामंडळाच्या ताफ्यात नवीन अत्याधुनिक२०० बस येणार आहेत पण एक बाब परिवहन मंत्र्याच्या लक्षात आणून द्यावी वाटते . ती अशी की, सर्वसामान्य प्रवाशांना या बस चे भाडे परवडणारे असणार का ? आणि या बससाठी खाजगी एजन्सी कशासाठी ? मंडळातील काही निवडक लोकांची एक टिम तयार करून त्यांच्या कडून हे काम करून घेता येणार नाही का?

आजकाल मंडळाच्या कोणत्याही बसमधील कंडक्टर च्या कामावर लक्ष देण्याची गरज आहे असे आमचे म्हणणे आहे कारण हे कंडक्टर प्रवाशांची अरेरावीची भाषा वापरतात, त्यांच्या शी असभ्य वर्तन केल्याच्या घटना नवीन नाहीत .

साधे लातूर - औसा या मार्गाचा विचार केला तर बरेच लक्षात येईल . या मार्गावर शिवाई आणि सोलापूर कडे जाणाऱ्या बसेच बऱ्याच असल्यातरी औशाच्या प्रवाशांना बसमध्ये चढू दिले जात नाही कारण सांगितले जाते की, ही बस जादा आहे . जादा बसमध्ये प्रवाशांनी चढायचे नाही का ? ज्या मार्गाने बसेस जाणार आहेत त्या मार्गातील थांब्यावर बस थांबणार नसल्यामुळे प्रवासी मिळणार नसल्याने महामंडळाचेच नुकसान होत असते हे कर्मचाऱ्यांच्या लक्षात कसे येत नाही . याचा विचार होणे आवश्यक असून केवळ अत्याधुनिक बस ताफ्यात आल्याने मंडळ फायद्यात थोडेच येणार आहे .

## मुरुड येथे 'लोकसंवाद २०२६' कार्यक्रमात आरोग्य विभागाच्या योजनांविषयी मार्गदर्शन



तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २१ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'लोकसंवाद २०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मुरुड येथे महाराज गणेश मंडळाच्या कार्यक्रमात आरोग्य विभाग, खादी ग्रामोद्योग महामंडळाच्या योजनांची माहिती देण्यात आली.

एकत्रित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व नागरिकांना युनिव्हर्सल हेल्थ कव्हर पुरवले जात आहे. या योजनेअंतर्गत कुटुंबातील एक किंवा सर्व सदस्यांना प्रतिवर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत आरोग्य कव्हरेज दिले जात असून, मूत्राशय किंवा मूत्रपिंड (किडनी) प्रत्यारोपणासाठी ४.५ लाख रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाते. याशिवाय, ज्येष्ठ नागरिकांना वैयक्तिकरित्या ५ लाख रुपयांपर्यंतचा अतिरिक्त लाभ दिला जातो, तसेच रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या रुग्णांना पी. एम. राहत निधीतून १.५० लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत तातडीने वैद्यकीय उपचार पुरवले जातात, अशी माहिती आरोग्य विभागाचे धनंजय नवगिरे आणि गोविंद सुरवसे यांनी दिली.

या योजनेमध्ये लाभार्थ्यांसाठी एकूण २,३९९ आजारांवर मोफत उपचार व शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध असून, त्यात शासकीय रुग्णालयांसाठी २२३ वैद्यकीय प्रक्रिया राखीव ठेवण्यात आल्या आहेत. तसेच हृदय, फुफ्फुस आणि यकृत प्रत्यारोपणासारख्या अत्यंत गंभीर व दुर्धर आजारांच्या उपचारासाठी सहाय्य दिले जात आहे. रुग्णांना सुलभ मदत आणि मार्गदर्शन करण्यासाठी आरोग्यमित्र नियुक्त करण्यात आले आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी लातूर जिल्ह्यात १६ शासकीय रुग्णालये, ५० प्राथमिक आरोग्य केंद्रे, ५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ४८ खाजगी रुग्णालये अशी एकूण ११९ रुग्णालये अंगीकृत करण्यात आली असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मधाचे गाव आणि प्रधानमंत्री विश्र्वकर्मा योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप यांनी लोकसंवाद उपक्रमाचा हेतू विशद केला.

यावेळी मुरुडचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश ठोंबरे यांच्यासह अभिषेक सहालुगडे, विकास सूर्यवंशी, शुभम जेलेवाड, विशाल कणसे, ओमकार करपे, अजिंक्य माळी, सौरभ सापसोड, रवी देशमुख, आकाश सुरवसे, गजानन वडगणे , सौरभ गायकवाड, गणेश वडगणे , ऋषभ हरंगुळकर, ऋषी राऊत, कदादा लांडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## राजर्षी शाहू महाविद्यालयात जनजागृतीचा अनोखा उपक्रम



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी सायबर पोवाड्याचे अनोखे सादरीकरण करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गड-किल्ल्यांची राखण करण्यासाठी मावळे सज्ज असायचे, तर आजच्या डिजिटल युगात आपल्या डिजिटल जगाची राखण करण्यासाठी सायबर योद्धे सज्ज आहेत, ही संकल्पना पोवाड्यातून मांडण्यात आली. पूर्वी शत्रूंकडून गड-किल्ल्यांना धोका निर्माण होत असे, तर आज सायबर गुन्हेगारांकडून मोबाईल, सोशल मीडिया खाती, वैयक्तिक माहिती आणि डिजिटल व्यवहारांना धोका निर्माण होऊ शकतो, हा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

हा सायबर पोवाडा सायबर वॉरिअर अविष्कार कांबळे, नरेश पंडित, आयुष जोशी, प्राची भोसले व गायत्री मायकर यांनी सादर केला. पारंपरिक पोवाड्याच्या माध्यमातून आधुनिक सायबर सुरक्षेचा विषय विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावी आणि मनोरंजक पद्धतीने पोहोचविण्यात आला.

पोवाड्यातून ऑनलाइन फसवणूक, संशयास्पद लिंक, ओटीपीची सुरक्षितता, मजबूत पासवर्ड, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, सोशल मीडिया सुरक्षा तसेच डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी याबाबत जनजागृती करण्यात आली.

आजचे सायबर वॉरियर्स ही संकल्पना विद्यार्थ्यांसमोर मांडत डिजिटल जग सुरक्षित ठेवण्यासाठी प्रत्येकाने जागरूक व जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचे आवाहन करण्यात आले. या अनोख्या सादरीकरणाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## खा. डॉ. शिवाजी काळगे यांनी केली दुष्काळग्रस्त भागातील पिकांची पाहणी



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : देवणी तालुक्यातील लासोना, वडमुरंबी, दवणहिप्परगा तसेच निलंगा तालुक्यातील झरी येथे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी आज पिक पाहणी दौरा करून दुष्काळामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी व नुकसानीची माहिती जाणून घेतली.

पावसाअभावी पिकांवर झालेला विपरीत परिणाम आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक संकट लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या कृषी मंत्र्यांकडे पाठपुरावा करून शेतकऱ्यांना आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्र्वासन खा. डॉ. काळगे यांनी दिले. यावेळी कॉँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके, पंचायत समिती सदस्य सगर, जिल्हा परिषद सदस्य औदुंबर पांचाळ, अजित माने, प्रा. बंडगर, प्रा. चिद्रे यांच्यासह लासोना, देवणी परिसरातील कॉँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रिंगरोडवरील पथदिवे बंद; नागरिक त्रस्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : शहरातील रिंगरोडवरील पथदिवे अनेक ठिकाणी बंद आहेत. त्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळी अंधारातून प्रवास करावा लागत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी लाखो रुपये खर्चुन पथदिवे उभारले असतील तर ते सुर करण्याची आणि नियमित देखभाल करण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल उपस्थित होत

आहे. छत्रपती चौक ते खाडगाव, चौकमार्गे पीव्हीआर रेणापूर नाका या मार्गावर दिवसेंदिवस वाहतूक वाढत आहे. शहरातील अंतर्गत वाहतूक कमी करण्यासाठी बाह्यवळण मार्गाचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. मात्र, रात्रीच्या वेळी रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याने वाहनधारकांसह पादचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

## माऊली शैक्षणिक संकुलात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात संपन्न



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २१ सप्टेंबर : गुरुवारी रोजी येथील अंबेजोगाई रोडवरील माऊली शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर द्वारा संचलित माऊली बालक मंदिर, माऊली विद्यार्थी विकास केंद्र व माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल ,लातूर येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिन अतिशय नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे संस्थेचे कोषाध्यक्ष मा. श्री तानाजी बेवनाळे पाटील सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी संस्था सचिव श्री गंगाधर आरडले सर उपस्थित होते. यानंतर मान्यवरांच्या हस्ते श्री गणेशाची आरती संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गाडेकर सर यांनी केले. विद्यालयातील बालवाडी ते दहावी सेमी व इंग्रजी माध्यमातील अनेक विद्यार्थ्यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त उत्कृष्ट भाषणे सादर केली. तसेच इतिहास शिक्षक श्री पालकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली माऊली इंटरनॅशनल मॉडेल स्कूल १०ींह क्लासच्या विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण ऐतिहासिक क्षेत्रभेट वळीश्रिरू लेरीव तयार केला व रझाकारास भारतीय सैन्याने रणगाड्याखाली चिरडण्याचे उत्कृष्ट वर्किंग मॉडेल द्वारे सादर करून सर्व उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी स्वतः इतिहास शिक्षकांसोबत लातूर येथील अनेक ऐतिहासिक स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील माहिती गोळा करून त्याविषयी थ्रीडी वॉल प्रोजेक्ट ही तयार केला .या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या प्राचार्या सौ.कविता आरडले मॅडम व उपप्राचार्या काळे मॅडम व प्रमुख पाहुण्यांनी भरभरून कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कला शिक्षिका भाग्यश्री उबाळे यांनी केले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी शिक्षक वृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी व्यवस्थापक श्री गोपाळ करडिले व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.